मा. वेज बोर्डाने सुचविल्याप्रमाणे आधार घेऊन युनियनच्या मागणीचा विचार केला तर बँकेवर दिनांक १-१-१९९५ पासून अरिअर्स पोटी रुपये ८.५१ कोटीचा जास्तीचा बोजा पडण्याची शक्यता आहे. तसेच वेज बोर्डाने सुचविल्याप्रमाणे पगारवाढ चालू करण्यासाठी जादीचा मासिक बोजा रुपये ७.१६ लाख व वार्षिक बोजा रुपये ८५.९३ लाख पडेल व त्यामुळे बँकेची मॅनेजमेंट कॉस्ट अंदाजे ०.३० टक्क्यांनी वाढेल. नाबार्डच्या धोरणानुसार मॅनेजमेंट कॉस्ट २ ते २.५ टक्के पर्यंत सिमीत असणे आवश्यक आहे.

युनियनने १९९५ मध्ये पगारवाढीबाबत केलेल्या मागणीवर त्यांचेशी चर्चा करण्यांत आली. परंतु त्यांनी मागणी केलेली पगारवाढ ही त्यावेळच्या ताळेबंदाला न झेपणारी होती व चर्चेत बँकेला सोसेलशी पगार वाढ देण्याची देण्याची तयारी दर्शवूनही युनियनने ती मान्य न केल्यामुळे करारनामा होऊ शकला नाही. व युनियनने वेज बोर्डाकडे वरील प्रकरण दाखल केले. बँकेने सदर प्रकरणांत बँकेची संपूर्ण भुमीका १९९५ पासूनचे ताळेबंद, इतर जिल्हा बँकेच्या पगाराबाबत तुलनात्मक तक्ता साक्षी पुरावे इत्यादि सादर केली. १९९५ पासून झालेले नफातोटा व व्यवस्थापन खर्च ह्यांचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| सन | नफा-तोटा (रु. लाखांत) | व्यवस्थापन खर्च |
|---|---|---|
| ९५-९६ | २५२.८६ | ३.६६% |
| ९६-९७ | २८१.८३ | ३.४४% |
| ९७-९८ | २९०.०९ | ३.२८% |
| ९८-९९ | १०६.७२ | २.७७% |

वरील वर्षाचा नफा व व्यवस्थापन खर्च ह्यांची तुलना केली तरी वेज बोर्डाने सन ९५ पासून दिलेली वाढ ही त्या त्या वर्षाच्या ताळेबंदाला न झेपणारी आहे व जर संपूर्ण अरिअर्स दिले तर नाबार्डच्या धोरणाचे उल्लंघन होऊन बँकेवर जादाचा आर्थिक बोजा रुपये ८.५१ कोटीचा पडेल.

बँकेने मा. वेज बोर्ड मुंबई ह्यांनी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्यासंबंधात दिलेल्या निकालावर चर्चा करून व्यवस्थापन व कर्मचारी ह्यांचे हिताचे दृष्टीने निर्णय घेण्याबाबत युनियनचे मा. अध्यक्ष व सचिव ह्यांना संयुक्तरित्या त्यांना अनेकदा चर्चेला बोलावले व चर्चेतून सदर प्रश्न निकालांत काढण्याचे दृष्टीने प्रयत्न केले. परंतु मान्यताप्राप्त युनियनचे अध्यक्ष व सचिव संयुक्तरित्या चर्चेला हजर झाले नाही, त्यामुळे त्याबाबत धोरणात्मक चर्चा होऊ शकली नाही.

विषयावर सविस्तर चर्चा झाली. श्री. बबनराव तायवाडे संचालक ह्यांनी मा. वेज बोर्डने दिलेला निर्णय लागू केल्यानंतर हा कालावधी किती वर्षाचा राहिल हे स्पष्ट होत नसल्यामुळे तसेच अरिअर्स लागू केल्यास बँकेवर रुपये ६.५१ कोटीचा भार पडल्याने बँकेचे आर्थिक संतुलन बिघडण्याची शक्यता आहे त्यामुळे युनियनशी वाटाघाटी करून पगारवाढ देण्याची कार्यवाही करावी, परंतु तत्पुर्वी युनियनशी करारनामा केल्यावरच त्याची अंमलबजावणी करावी व सदर करारनामा हा पांच वर्ष कालावधीसाठी करावा असे मत प्रदर्शित केले त्यास श्री पलासे व श्री गुजर संचालक यांनी दुजोरा दर्शविला. ह्यावर मा. अध्यक्षांनी सभेला सांगितले की, मा. श्री. तायवाडे ह्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांशी मी सहमत असून कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्या मान्य करावयाच्या झाल्यास करारनामा करून त्यावर युनियनच्या मा. अध्यक्ष व सचिव ह्यांच्या स्वाक्षऱ्या होणे आवश्यक आहे. कारण बँकेच्या मा. संचालक मंडळाने १९९५ मध्ये वेज बोर्डकडे प्रलंबित असलेल्या युनियनच्या केस मध्ये कर्मचाऱ्यांचे हित लक्षात घेता स्वखुशीने त्या वेळच्या ताळेबंदाला झेपेल व व्यवस्थापन खर्चात फारशी वाढ होणार नाही अशी व्यवस्थापन व कर्मचारी ह्यांच्यात समतोल साधणारी पगारवाढ लागू करण्यांत आली: पण त्याचा विचार युनियनने कुठेही केलेला नाही. व त्यांनी आपले भूमिकेत व्यवस्थापनाशी तडजोड घेण्याची तयारी दर्शविली नाही त्यामुळे करारनामा झाल्याशिवाय पगारवाढीवर अंमलबजावणी करण्यांत येवू नये! तसेच सदर करार ५ वर्षे कालावधीसाठी असावा व त्यावर युनियनचे अध्यक्ष व सचिव ह्यांचे दोघांच्याही स्वाक्षऱ्या असाव्यात. कर्मचारी प्रतिनिधी श्री विजय मोहोणे यांनी करारावर युनियनचे अध्यक्ष व सचिव सह्या करतील असे सांगितले.

बँकेचे मा. अध्यक्ष यांनी बँकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करून वेज बोर्डने सुचविल्यानुसार मान्यताप्राप्त युनियनचे अध्यक्ष व सचिव ह्यांचेशी संयुक्तरित्या चर्चा करून करारनामा कमीत कमी ५ वर्षे कालावधीचा करावा तसेच सदर करारनाम्यावर युनियनचे अध्यक्ष व सचिव ह्यांची स्वाक्षरी घ्यावी. कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीबाबत होणाऱ्या करारनाम्यावर संचालक मंडळाचे वतीने युनियनशी संयुक्तपणे चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्याचा तसेच करारनामा ५ वर्षे कालावधीसाठी करण्याबाबत मा. अध्यक्ष महोदय यांना अधिकार देण्यांत येत असून करारनामा झाल्यावरच पगारवाढीबाबतची कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ३:- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.
ठराव क्रमांक ३:- मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक     अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नागपूर.

बँकेच्या मा॰ संचालक मंडळाची सभा मंगळवार दिनांक ६.६.२००० रोजी बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात "बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा॰ सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. गो. बंग | संचालक |
| ४. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ५. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ६. | मा. श्री. व. भा. वांढे | " |
| ७. | मा. श्री. चं. ल. कोल्हे | " |
| ८. | मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ९. | मा. श्री. स. लि. चोरे | " |
| १०. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| ११. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| १२. | मा. श्री. ना. र. जांभकाटे | " |
| १३. | मा. श्री. वि. ज्ञा. राऊत | " |
| १४. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १५. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १६. | मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १७. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १८. | मा. श्री. व. भा. नायवाडे | " |
| १९. | मा. श्री. मु. भि. पलासे | " |
| २०. | मा. श्री. अ. शं. धामीके | " |
| २१. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २२. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २३. | मा. सौ. मिताताई कुंभारे | संचालीका |
| २४. | मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| २५. | मा. श्री. एल. जी. चौधरी | कर्मचारी प्रतिनिधी |
| २६. | मा. श्री. कि. जि. शहाणे | " |
| २७. | मा. श्री. एम. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

- अनुपस्थित -

१. मा. श्री. र. पां. गावंडे संचालक
२. मा. श्री. अ. य. गुजर ”
३. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर
४. मा. प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई.
५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
६. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (बँक) नागपूर.
७. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
८. मा. विभागीय अधिकारी म. रा. सह. बँक मर्या. विभागीय कार्यालय, नागपूर

सभेचे सुरुवातीला मा. श्री. र. पां. गावंडे, संचालक व माननीय श्री. अ. य. गुजर संचालक यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली. व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांनी विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेची कार्यवाही सुरू केली.

विषय क्रमांक १ :- मागील दिनांक ३०.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील सभेतील मा. वेज बोर्डाने दिलेल्या निवाड्याबाबत विषयावर चर्चा करतांना माननीय श्री. व. भा. तायवाडे संचालक म्हणाले की, मान्यताप्राप्त कर्मचारी युनियनचे अध्यक्ष व सचिव संयुक्तरित्या चर्चेला येत नसतील तर व करार करत नसतील तर उर्वरित पदाधिकाऱ्याशी चर्चा करुन हा प्रश्न निकाली काढण्यांत यावा किंवा बँकेचे सर्वच कर्मचाऱ्यांना बोलावून त्यांचेशी विचार विनिमय करुन प्रश्न निकाली काढावा. या गोष्टीस संचालक सर्वश्री व. क. पाराशिवनीकर, धार्मिक, नि. वि. निमजे, र. व्यं. निमजे, पनासे, शाहीर, कोल्हे व इतर सर्व संचालकांनी दुजोरा दिला. यावर मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, कायदेशिर बाबी तपासून योग्य निर्णय संबंधी प्रशासनात लागू करावा. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ३०.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते मान्य करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक २ :- मागील सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ :- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक ८.४.२००० व दिनांक १०.६.२००० चे मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाही बाबत मा॰ सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ :- बँकेचे सन १९९९-२०००चे नफातोटा पत्रक व दिनांक ३१.३.२००० रोजीचे ताळेबंद पत्रक मंजूर करणे.

ठराव क्रमांक ३ :- मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेने सन १९९९-२०००चे नफा-तोटा पत्रक व दिनांक ३१मार्च २००० रोजीचे ताळेबंद पत्रक कार्यालयाने तयार केले आहे. सभेचे माहितीस व मान्यतेस ठेवण्यांत आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे सन १९९९-२०००चे नफातोटा पत्रक व दिनांक ३१ मार्च २००० रोजीचे ताळेबंद पत्रक मंजूर करण्यांत आले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ :- पीक कर्ज मंजूरी अंतर्गत वस्तुरूप (बी-बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके) कर्जाचे परमीटस् संस्थांनी वाटप करतांना कोणकोणत्या यंत्रणांना द्यावे याबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्रमांक ४ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्ह्यातील सर्व सेवा/विविध कार्यकारी संस्थाने सभासदांना खरीप कर्जाचे वाटप सुरू असून, त्यांना वस्तुरूप कर्ज वितरित देण्यांत येणाऱ्या परमीटवर लिहून दिलेल्या संस्थेमधून मालाची उचल घ्याव्यात असे अपेक्षित असून बंधनही आहे. परंतु परमीटवर माल पुरविणाऱ्यांचे नांव नसतांनाही काही सहकारी संस्था, कृषि सेवा केंद्र, सभासदांना मालाचा पुरवठा करतात. व अशा परमिट बीलांच्या जमाखर्च घेण्यास्तव बँकेकडे पाठपुरावा करीत असतात. ही बाब गंभीर स्वरूपाची असून गैर आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन परमीटवर नांव नसतांना मालाचा पुरवठा करणे व अशा परमीट बीलांचा जमाखर्च घेणेसाठी बँकेकडे पाठपुरावा करणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून, गैर असल्यामुळे सदर गैरप्रकार थांबविण्यासाठी परमीट जमाखर्चाबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

अ) सभासदांना परमीटवर मालाचा पुरवठा करण्यासाठी ज्या सहकारी संस्थेने

कृषि सेवा केंद्राचे नांव परमिटवर लिहिण्यांत आले असेल त्याच संस्थेला / कृषि सेवा केंद्राला त्या परमिटवर मालाचा पुरवठा करण्याची मुभा राहील. परमिटवर नांव नसतांना मालाचा पुरवठा केल्यास अशा परमिटचा जमाखर्च घेतल्या जाणार नाही. परंतु कांही कारणास्तव माल पुरवठा करणाऱ्या संस्थेचे नांवात बदल करण्याचा अधिकार विशेष वसुली अधिकारी व बँक निरिक्षकास राहील.

ब) सहकारी संस्थांनी / कृषी सेवा केंद्रांनी त्यांचे नांव परमिटवर असल्यास त्यांचे कार्यक्षेत्रातील शेतकरी सभासदानाच त्यांचे परमिटवर मालाचा पुरवठा करावा. परंतु कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांना बँकेची पुर्वपरवानगी घेतल्यानंतरच मालाचा पुरवठा करावा. बँक परवानगी नसतांना मालाचा पुरवठा केल्यास अशा परमिट बीलाच्या जमाखर्च घेण्यात येणार नाही.

क) सहकारी संस्थांनी / कृषि सेवा केंद्रांनी परमिटवर नांव असलेल्या शेतकरी सभासदांनाच मालाचा पुरवठा करण्यांत यावा. परमिट धारक मालाचा उचल करण्यास येवु शकत नसल्यास परमिटधारकाचे अधिकार पत्र परमिट सोबत आणणाऱ्यास याबाबत संस्थेनी खात्री करुन मालचा उचल देण्यांत यावा. व बँकेला परमिट बील बँकेस जमाखर्च घेणेकरिता सादर करतांना सोबत परमिट धारकाने दिलेले अधिकार पत्र सुध्दा सादर करावे. अधिकार पत्र नसलेली व परमिटवरील नांवाव्यतीरिक्त व्यक्तीस मालाचा उचल दिल्याचे आढळल्यास अशा परमीटच्या जमाखर्च घेतल्या जाणार नाही.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ - श्री संत गुलाबबाबा शिक्षण संस्था, उमरेड यांच्या अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे इमारत बांधकामासाठी आलेल्या मुदती कर्ज मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, श्री संत गुलाबबाबा शिक्षण संस्था, उमरेड यांच्या मौजा उमरेड येथील अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासकीय भवन व स्व. भैय्याजी सभागृहाचे बांधकाम संस्था करीत असून, या कामाकरिता रुपये १२.०० लाख खर्च अपेक्षित आहे. संस्थेने सदर बांधकामास सुरुवात केली असून त्यावर अंदाजे रुपये ६.०० लाखाचे काम झालेले आहे. उर्वरित बांधकाम करण्यासाठी शाखा उमरेड मार्फत रुपये ८.०० लाख मुदती कर्ज मंजूरीकरिता बँकेकडे मागणी अर्ज सादर केला

आहे. संस्थेने दिनांक १८.६.९९ चे कार्यकारिणीचे सभेत बँक संस्थेकडून कर्ज घेणेबाबत ठराव करून श्री रणधीर सिंहजी भदोरिया संस्था सचिव यांना आवश्यक कागदपत्रावर तसेच करारावर सह्या करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, उमरेड (१९५०पासून) अशोक गर्ल्स हायस्कूल, उमरेड (१९८६पासून) आणि श्री एस. भदोरिया हायस्कूल, बेलूर (१९८७पासून) ह्या शाळा संस्थेच्या मालकीच्या जागेत चालू आहेत. याकरिता संस्था भाडे आकारीत आहे. वरील शाळेपैकी अशोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, उमरेड ह्या एकाच शाळेला अनुदान प्राप्त आहे. उर्वरित दोन्ही शाळांना सद्य:स्थितीत अनुदान प्राप्त नाही. या वर्षीपासून शासनाकडून अनुदान प्राप्त होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड शाळा इमारतीपासून भाडे व शासकीय अनुदानामधून ६ वर्षात २४ तिमाही हप्त्यांत करणार असून, सवलतीचा काळ म्हणून एक वर्षाचा राहणार आहे. या काळात दिलेल्या कर्जावरील व्याजाची १९% द.सा.द.शे. प्रमाणे रक्कम जमा करणार आहे. सन २०००-२००१ मध्ये व त्यापुढे संस्थेला शासनाकडून मिळणारे अनुदान रुपये ३२५०००/- व इमारती पासून मिळणारे भाडे रुपये २५०,०००/- असे मिळून रुपये ५७५०००/- उत्पन्न अपेक्षित आहे. इमारतीपासून मिळणारे भाडे रुपये २५००००/- व शासकीय अनुदानापैकी २५% रुपये ८१२५०/- अशी एकूण रक्कम रुपये ३३१२५०/- ही रक्कम दरवर्षी कर्जाचे हप्ते व्याजासह फेडण्यास उपलब्ध राहणार आहे. संस्थेच्या कर्ज परतफेडीचा व्याजासह प्रथम तिमाही हप्ता रुपये ७०,०००/- राहणार असून त्याची वार्षिक रक्कम रुपये २.८० लाख राहील. सदर प्रकल्प अहवाल बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकाउंटंट यांनी केलेला असून, प्रकल्प अहवाल आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या सक्षम असल्याचा अहवाल दिलेला आहे. कर्ज सुरक्षिततेकरिता संस्थेने अस्तित्वात असलेल्या संस्था मालकीच्या इमारती सह तारण ठेवण्यास संमती आहे. कर्जास तारण दिलेल्या स्थायी मालमत्तेपैकी उमरेड वार्ड नं.६ मंगळवारी येथील नगर परिषद संपत्ती क्रमांक ४४२६ च्या बँकेच्या पॅनेलवरील वकिलांनी सर्च घेतला असून सदर संपत्ती बोजा विरहीत आहे व बँकेचे पॅनेलवरील व्हॅल्युअरनी मूल्यांकन करून दिलेल्या अहवालानुसार या इमारती क्रमांक १ व २ चे जमिनीसह एकूण ~~मुल्क~~ मुल्य रुपये १४.८५ लाख आहे.

विषयावर चर्चा करतांना श्री पन्नासे यांनी शिक्षण संस्थांना बांधकामाकरिता द्यावयाचे कर्जाबाबत धोरण ठरविण्यात यावे असे सांगितले असता शिक्षण संस्थांना बांधकामाकरिता द्यावयाच्या कर्जाबाबत धोरण ठरविण्याकरिता श्री पन्नासे संचालक यांचेकडून माहिती घ्यावी असे माननीय

अध्यक्ष म्हणाले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री संत गुलाबबाबा शिक्षण संस्था, उमरेड यांनी दिलेली स्थायी संपत्ती कर्जाचे सुरक्षीततेकरिता तारण म्हणून गहाणांत घेण्यांत यावी. संस्थेचे बँक खाते आपले बँकेशिवाय कोठेही राहणार नाही अशी अट घालण्यांत यावी व संस्थेला प्रशासकीय भवन व स्व. भैय्याजी सभागृहाचे बांधकामाकरिता कर्जपरतफेड ६ वर्षात (२४ तिमाही हप्तांत) सुरुवातीच्या १ वर्ष सवलतीचा काळ विचारांत घेऊन १५% व्याज दराने रुपये ८.०० लाख मुदती कर्ज निधी उपलब्ध करून देण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ :- १ जुलै ते ३१ ऑगष्ट या पावसाळी हंगामात मध्यम मुदती कर्जा अंतर्गत नविन विहिर, विहिर दुरुस्ती, मळणीयंत्र, शेतघर, ट्रॅक्टर इत्यादि कर्ज प्रकरणे तुर्तास स्थगित ठेवण्याबाबत.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, जुलै ते ऑगष्ट हा कालावधी पावसाळी हंगामाचा असल्यामुळे ह्या काळांत विहिरीचे व शेत घराची कामे होऊ शकत नाही. मळणी यंत्राकरिता पिकांचा हंगाम संपलेला आहे. ट्रॅक्टरची शेती व्यतिरिक्त इतर कामे पावसामुळे थांबलेली असतात. यामुळे पावसाळ्याचे वरील कालावधीत सभासदांना नविन विहिरी, विहिर दुरुस्ती, शेतघर, मळणीयंत्र व ट्रॅक्टरकरिता नविन कर्ज प्रकरणे करून कर्जवाटप करू नये व सभासदांवर व्याजाच्या भुर्दंड बसू नये म्हणून वरील कारणाकरिता पावसाळ्यांत कर्ज प्रकरणे तुर्तास स्थगित ठेवावे. १ सप्टेंबर पासून पूर्ववत कर्जपुरवठा सुरू करण्यांत यावा.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन १ जुलै ते ३१ ऑगष्ट ह्या पावसाळ्याचे हंगामात मध्यम मुदती पत्र व ट्रॅक्टर इत्यादि स्थळ तपासणी घेऊन आवश्यक असल्यास जूने प्रकरणांत कर्ज पुरवठा करण्यांत यावा व वरील कारणांकरिता करावयाचे कर्ज पुरवठ्याची नविन प्रकरणे तुर्तास स्थगित ठेवण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७ :— बँकेच्या कर्मचाऱ्यांना घर बांधणीकरिता अविकसित प्लॉटवर कर्ज मागणी बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतील कर्मचाऱ्यांना घर कर्ज सुविधा योजनेनुसार स्वतंत्र

घर बांधण्यासाठी कर्ज पाहिजे असल्यास कर्मचाऱ्यांना स्वतःचे नांवाने असलेल्या प्लॉटवरील नागपूर सुधार प्रन्यास/कार्पोरेशन अगर म्युनीसिपालीटी अगर स्थानिक स्वराज संस्थेने मंजूर केलेल्या घराचे प्लॅन व बांधण्याकरिता इंजिनियरने केलेल्या एस्टीमेटनुसार मुख्याधिकारी ते चपराशी श्रेणी पर्यंतचे कर्मचाऱ्यांना रु.१.५० लाख पासून रु. ७० हजारापर्यंत श्रेणीनुसार विकसीत प्लॉटवर घरबांधकाम करण्यास कर्ज उपलब्ध करून देत आहे. परंतु बँकेच्या कांही कर्मचाऱ्यांकडे त्यांचे नांवाने अविकसीत प्लॉट आहे त्यांनाही घर बांधण्याकरिता कर्जउपलब्ध करून देण्यांत यावे. तसेच घर बांधण्याकरिता लागणाऱ्या साहित्य, मजूरी व आनुषंगिक खर्चात झालेली वाढ विचारांत घेऊन घर कर्ज मर्यादा वाढवावी अशी मागणी आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे कर्मचाऱ्यांना अविकसीत व विकसीत प्लॉटवर घर बांधकाम करणेकरिता एस्टीमेटचे ८०% किंवा खालील प्रमाणे निर्धारीत केलेली मर्यादा यातील कमी असलेल्या रकमेपर्यंत कर्जपुरवठा करण्यांत यावा असे ठरले.

व्यवस्थापक/मुख्याधिकारी/विभागीय अधिकारी श्रेणी -- रु.५.०० लाख.
अ वर्ग अधिकारी व ब वर्ग अधिकारी . . . . . . . . . . . . -रु.३.५० लाख
लिपिक व टायपीस्ट श्रेणी - - - - - - - - - - - - - रु.२.५० लाख
ड्रायव्हर व चपराशी श्रेणी - - - - - - - - - - - - रु.२.०० लाख.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८ :- किसान कार्ड योजना राबविणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, शासनाचे निर्णय क्रमांक डी.सी.बी १२९८/प्र.क्र.२३४/२स दिनांक २० फरवरी १९९९-चे पत्रानुसार बँकेने किसान कार्ड योजना सन १९९९-चे खरीप हंगामापासून प्रायोगिक तत्वावर लागू केलेली आहे. व जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थांचे ५००० सभासदांना किसान क्रेडीट कार्डवर खरीप/रब्बी उपलब्ध करून देण्यांत आले आहे. परंतु किसान कार्ड योजना राबविण्यांत बँकेला तांत्रिक स्वरूपाच्या अडचणी आलेल्या आहेत त्यापैकी प्रमुख अडचणी म्हणजे अ) सभासद सेवा स्तरांवरील कर्जाचे हिशेब शाखा स्तरावर ठेवावे लागतात. व हे हिशेब योग्य पध्दतीने संस्था स्तरावर ठेवले जात नाहि. बँकेने वेळोवेळी घेतलेल्या कर्जवाटप व कर्जवसुलीचे हिशेब संस्था स्तरावर पाठविणे शक्य होत नाही त्यामुळे अशा नोंदीचे वेळीच समायोजन न झाल्यामुळे संस्था स्तरावरील सभासदांचे हिशोबाची कर्ज मागणी पत्रके वेळेवर तयार होत नाहीत. तसेच ज्या सभासदांकडे ओलिताची साधने

आहेत किंवा दुबार पीके घेण्यासाठी ओलिताची व्यवस्था आहे अशा शेतकऱ्यांना वेळोवेळी लागणारी कर्ज रक्कम उपलब्ध करुन देणे किंवा वेळोवेळी भरणा केलेल्या रकमेवर वेळोवेळी हंगाम पिक कर्ज मर्यादेवर उचल देता येत नाही म्हणजेच भरलेल्या रकमेवर परत उचल देता येत नाही. त्यामुळे "फिरता चक्री पत पुरवठा" योजनेची मुळ संकल्पना साध्य होत नाही. यानंतर बँकेचे मा० अध्यक्ष यांनी सभेला अशी माहिती दिली की, किसान क्रेडिट कार्ड योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या १००% नगदी स्वरुपाच्या रकमेमुळे वस्तुरुप कर्ज वितरण संकल्पनेचा मुख्य उद्देश सफल होत नाही. कारण नगदी स्वरुपाची रक्कम हाती आल्यावर अपेक्षेप्रमाणे वस्तुरुप माल खरेदी करणे टाळल्या जाते. पर्यायाने शेतीला आवश्यक खते/किटकनाशके उपलब्ध न झाल्यास उत्पन्नात घट होते. व याचा कर्जवसुलीवर परिणाम होतो. तसेच शासनाने सुरु केलेल्या "बिझीनेस डेव्हलपमेंट प्लॅन" अंतर्गत विविध सेवा सहकारी/खरेदी विक्री सहकारी संस्थांना सक्षम करण्याचे दृष्टीने चालविलेल्या कृषि मालाच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सेवा सहकारी/विविध कार्यकारी/खरेदी विक्री संस्थांचे शेती पुरक व्यवसाय संपुष्टात येवून या सहकारी संस्था आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे प्रयत्न निष्फळ होतील व त्यामुळे त्रीस्तरीय कृषि पत पुरवठ्यातील अंतिम स्तर दुर्बल होऊन नष्ट होण्याची भिती नाकारता येत नाही. बँकेनी/सेवा संस्थांनी दिलेल्या कर्जाची परत फेड करण्यासाठी सभासदाला बँकेत यावे लागते. या योजने अंतर्गत कर्जवसुलीची रक्कम संस्थेत भरण्याची सोय नाही त्यामुळे गटसचिवांना वेळीच कर्जवसुली मागणी केल्यास कर्जवसुली संस्थास्तरावर घेण्याचे प्रयोजन नाही त्यामुळे सभासदांचे हाती आलेली शेतमाल विक्रीची रक्कम दुसऱ्या कामाकडे वापरली गेल्यास कर्ज वसुली तर होणार नाहीच परंतु मोठ्या प्रमाणावर शेतकरी थकित होण्याची संभावना आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली सविस्तर चर्चेनंतर "किसान कार्ड योजना" राबविण्याबाबत फेरविचार करण्यासाठी विनंती प्रस्ताव सर्व संबंधितांकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९ : बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०चे कलम १५६ अंतर्गत पुढील आदेशापर्यंत वसुलीचे अधिकार मिळणेकरिता मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना

विनंती करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी दिनांक २८.१०.१९९९ चे पत्राप्रमाणे बँकेच्या थकित कर्जाची वसुली करणे करिता बँकेच्या अधिकाऱ्यांना प्रदान केलेल्या अधिकाराची मुदत दिनांक ३०.६.२००० पावेतो आहे.

मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक २१ मार्च २००० चे प्रमाणे थकित कर्जाची वसुली करण्याकरिता बँकेचे अधिकारी व विशेष वसुली अधिकारी यांना वसुलीची कारवाई करणेकरिता कालमर्यादा न घालतां अधिकार मिळणेबाबत मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करायची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन थकित कर्जाची वसुली करण्याकरिता बँकेचे अधिकारी व विशेष वसुली अधिकारी यांना वसुलीची कारवाई करणेकरिता मा० सहकार आयुक्त व निबंधक, पुणे-१ यांचे पत्राप्रमाणे अधिकाराबाबत कालमर्यादा न घालता खालील अधिकाऱ्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या कार्यक्षेत्राशी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६(१) व (२), महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० चे कलम २ (एच) व (जे) तसेच नियम १०७ खालील उप नियम (३), (५), (६), (७), (९), (१०), (११) (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतुद वगळून) (१२), (१३), (१४), (१७), (१९), व २० तसेच कलम १०१ व कलम (१३७) नुसार अधिकार प्राप्त होणेसाठ मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे विनंती करावी लागेल.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | हुद्दा | मुख्यालय | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक | मु. का. नागपूर | नागपूर जिल्हा |
| २. | श्री. एस. एस. गोडे | प्र. व्यवस्थापक | " | " |
| ३. | श्री. सी. एन. डोईफोडे | मुख्या. (वसुली) | " | " |
| ४. | श्री. ए. बी. देशमुख | मुख्या. (कर्ज) | " | " |
| ५. | श्री. ए. आर. गवळी | मुख्या. (तपा.) | " | " |
| ६. | श्री. एस. बी. निकम | ज्य. वर्ग अधिकारी | " | " |
| ७. | श्री. एन. डी. कडू | " | " | " |
| ८. | श्री. एस. ए. हुणे | " | " | " |
| ९. | श्री. एस. आर. धंद्रे | " | हिंगणा | " |
| १०. | श्री. एन. ए. देशमुख | " | नागपूर (गणेशपेठ) | " |
| ११. | श्री. ए. जी. चरडे | अ. वर्ग अधिकारी | धापेवाडा | " |
| १२. | श्री. एस. एम. बोरकी | " | कुही | " |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | श्री. सी. एन. काकडे | ब वर्ग अधिकारी | कोंढाळी | नागपूर जिल्हा |
| १४. | श्री. यु. जे. पुरी | —"— | काटोल | —"— |
| १५. | श्री. जे. जी. गायकवाड | अ वर्ग अधिकारी | नरखेड | —"— |
| १६. | श्री. एस. आर. बरोकर | ब वर्ग अधिकारी | नरखेड | —"— |
| १७. | श्री. व्ही. बी. सुने | —"— | नरखेड | —"— |
| १८. | श्री. व्ही. एन. पोंडे | अ वर्ग अधिकारी | सावनेर | —"— |
| १९. | श्री. जी. के. अखंड | ब वर्ग अधिकारी | पारशिवनी | —"— |
| २०. | श्री. आर. जी. पाटील | अ वर्ग अधिकारी | उमरेड | —"— |
| २१. | श्री. बी. डी. उरकुडे | —"— | भिवापूर | —"— |
| २२. | श्री. एस. आर. वरुडकर | ब वर्ग अधिकारी | कामठी | —"— |
| २३. | श्री. आर. डी. मेश्राम | अ वर्ग अधिकारी | मौदा | —"— |
| २४. | श्री. एी. एन. घोडे | ब वर्ग अधिकारी | मौदा | —"— |
| २५. | श्री. पी. एन. धर्माधिकारी | —"— | खात | —"— |
| २६. | श्री. एम. आय. मडावी | अ वर्ग अधिकारी | रामटेक | —"— |
| २७. | श्री. पी. एन. उल्लेवार | ब वर्ग अधिकारी | कळमेश्वर | —"— |
| २८. | श्री. पी. एन. कामडी | निरिक्षक | मु.का. नागपूर | —"— |
| २९. | श्री. जी. एस. गोरखले | ब वर्ग अधिकारी | कुही. | —"— |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १० - बँकेच्या अद्यावत कर्ज वसुली व कर्जवाटपाचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक १० - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देताना सांगितले की, बँकेची सन १९९९-२००० ची कर्ज मागणी थकित रु. ५६६०.९० लाख चालु रु. ४३७१.५८ लाख अशी एकूण रु. १००३२.४८ लाख होती त्यापैकी माहे मे अखेरपर्यंत थकित रु. २०९५.३३ लाख, चालू रु. ६३१.९९ लाख अशी एकूण रु. २७२७.३२ लाख कर्जवसुली झालेली आहे. बँकेने संचालक मंडळाने मान्य केलेल्या कर्ज वसुलीच्या कृती कार्यक्रमाप्रमाणे कर्ज वसुली मोहीम राबवून देखील पिकांची परिस्थिती समाधानकारक नसल्याने बँकेची कर्जवसुली समाधानकारक झालेली नाही. मागील वर्षीच्या १९.७४% चे तुलनेत यावर्षी कर्ज वसुली २७.१०% झाली आहे. या वर्षी जुन अखेर बँकेची कर्जवसुली ४०% पर्यंत पोहचेल असा मानस आहे.

बँकेनी या वर्षी खरीप कर्ज वाटप अंतर्गत ३१ मे २००० अखेर नगदी रुपात रु. १२२०७.३७ लाख, वस्तुरुप रु. ७३२७.०० लाख असे एकूण.

रु.९९५१६.६६ लाख पतसंस्थांचे १७८४४५ सभासदांना कर्ज मंजूर केले आहे. चालू वर्षी खरीप व रब्बी हंगामा अखेर पिक कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या आतापर्यंत कर्जवसुली व कर्जवाटपा-च्या आढावा घेण्यात आला. याबाबत सभेत नोंद घेण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ११ :- बँकेनी तसेच बँकेविरुध्द दाखल करण्यात येणाऱ्या कोर्ट केसेस-मध्ये शपथपत्र तसेच साक्ष देण्याचे अधिकार संबंधित मुख्याधिकारी यांना प्रदान करणेबाबत.

ठराव क्रमांक ११ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन हा विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १२ - बँकेतील कर्मचारी कल्याण निधीचे सुधारित नियमांना मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १२ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक ३८.८.५० रोजीचे मा० संचालक मंडळाचे सभेतील निर्णयाप्रमाणे निर्माण केलेल्या व मंजूरी दिलेल्या कर्मचारी कल्याण निधीचे नियमांत औषधांच्या किंमती, डॉक्टरची फीस व अनुषंगिक कामासाठी खर्च वाढलेला आहे आणि वाढती महागाई विचारात घेता कर्मचाऱ्यांच्या गोळा करावया-च्या वर्गणीमध्ये वाढ करण्यासाठी, (नवहीच वर्गणी बँकेद्वारा जमा करावयाची आहे), कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या आर्थिक मदतीत वाढ करणेसाठी नियमांत सुस्पष्टता आणण्याचे दृष्टीने नियम क्र.५, ६(अ), (ब), (क) बदल करून व नविन क्र.१६ घालून नियमांत सुधारणा करण्याकरिता दिनांक ११-५-२००० रोजी झालेल्या मा० सेवक उपसमितीने मान्यता मिळणेसाठी शिफारस केलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्मचारी कल्याण निधीचे नियम क्र.५, ६(अ),(ब) (क) मध्ये बदल करून व नव्याने नियम १६ घालून सुधारित नियमास मान्यता देण्यात येत आहे. तसेच खालील प्रमाणे करण्यात आलेल्या बदलासह कर्मचारी कल्याण निधी नियमावली बँकेतील सर्व कर्मचाऱ्यांना माहिती करून देण्यात यावी व सुधारीत नियमाप्रमाणे शाखा व्यवस्थापकांनी कार्यवाही करणेकरिता कळविण्यात यावे असे ठरले.

| अ.क्र. | नियम क्रमांक | सुधारीत नियम |
|---|---|---|
| १. | ५. | कर्मचाऱ्यांना ह्या निधीस प्रतिमाह द्यावयाचे वर्गणी दर खालीलप्रमाणे राहतील.<br>अ) एकूण मासिक पगार रु.५०००/-पर्यंत रुपये ५/-<br>ब) एकूण मासिक पगार रु.५०००/-चे वर रुपये १०/- |
| २. | ६. | निधीची उपलब्धता विचारात घेऊन कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे आर्थिक मदत देण्याकरिता या निधीचा उपयोग करण्यात येईल.<br>अ) सेवेत असतांना कर्मचाऱ्यांचा मृत्यु झाल्यास त्यांचे कुटुंबियांना रुपये १०,०००/-<br>ब) कर्करोग, क्षयरोग, हार्ट ऑपरेशन, किडनी ऑपरेशन इ. गंभीर आजाराकरिता तसेच कर्मचाऱ्याला गंभीर अपघात झाल्यास ऑपरेशन, औषधी, कंसल्टींग फी, रुम चार्जेस इ. अनुषंगिक कारणांसाठी आलेल्या एकूण वैद्यकिय बिलाच्या ६०% किंवा रु.४०,०००/-यांतील कमी असलेली रक्कम. |
| ३. | १६. | वरीलप्रमाणे कर्मचारी निधी अंतर्गत देण्यांत येणारी आर्थिक मदत कर्मचाऱ्यास दोन वर्षातून एकदा व संपूर्ण सेवाकालावधित जास्तीत जास्त एकूण तीन वेळा उपभोगता येईल. |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १३ : नाबार्डचे अधिकारी यांचे दिनांक १.४.१९९७ ते ३१.३.१९९९ या कालावधीचे तपासणी संबंधात प्राप्त झालेल्या अहवालावरील पूर्तता अहवालास मंजुरी देणे.

ठराव क्रमांक १३ : मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नाबार्डचे अधिकाऱ्यांनी १.४.९७ ते ३१.३.९९ या कालावधीतील बँकेची तपासणी घेऊन बँकेस पाठविलेल्या तपासणी अहवालाची पुर्तता अहवाल ३ महिन्याचे आंत पाठविण्यास कळविले आहे. कार्यालयाने तयार केलेल्या पुर्तता अहवाल दिनांक ५.६.२००० चे मा. अंकेक्षण पुर्तता उपसमितीने मंजूर करुन मा. संचालक मंडळाची मान्यता घेऊन नाबार्डकडे पाठविण्याचा निर्णय घेतला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. अंकेक्षण पुर्तता उपसमितीने शिफारस केलेल्या सन ९७-९८ व ९८-९९ या कालावधीतील तपासणी

अहवालावरील पूर्तता अहवालास मान्यता देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १४. बँकेच्या सन १९९९-२००० च्या वार्षिक साधारण सभेची तारिख ठरविणे

ठराव क्रमांक १४ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे उपविधी क्रमांक २३ नुसार बँकेची वार्षिक साधारण सभा दरवर्षी १५ ऑगष्ट पूर्वी घेण्यांत यावी किंवा निबंधक, सहकारी संस्था यांनी वाढवून दिलेल्या तारखेपूर्वी घेणे आवश्यक आहे. सन १९९९-२००० ची वार्षिक साधारण सभा घ्यावयाची आहे. सभेची तारीख ठरविणेकरिता सभेने निर्णय घ्यावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन बँकेच्या वार्षिक साधारण सभेची तारीख ठरविण्याबाबत मा० अध्यक्ष यांना अधिकार देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १५ : मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १५ (१) - वार्षिक सामंजस्य करार (ॲन्युअल एम ओयू) अंतर्गत सन २०००-२००१ या वर्षाकरिता ठरवून दिलेली उद्दिष्टे तसेच कृती कार्यक्रमास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक १५ (१) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा० सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक २७.०५.२००० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयांत झालेल्या सभेत सामंजस्य करारा अंतर्गत बँकेला सन २०००-२००१ या वर्षाकरिता स्वनिधी, ठेवी, कर्जे व इतर बाबींचे उद्दिष्ट ठरवून देण्यांत आले आहे त्या दृष्टीने कराराची अंमलबजावणी करण्याकरिता कालबध्द विकासात्मक कृती कार्यक्रम नाबार्डने पुरस्कृत केलेला आहे. त्यानुसार बँकेच्या व्यवहारात वाढ करण्याच्या व कामकाजात सुधारणा करण्याच्या बँकेने प्रयत्न करावयाचा आहे.

विषयाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा होवून सामंजस्य करारा अंतर्गत (एम.ओ.यू.) बँकेला सन २०००-२००१ वर्षाकरिता नाबार्डने ठरवून दिलेले उद्दिष्ट तसेच कृती विकास कार्यक्रमास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली. तसेच करारावर सह्या करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक/प्र. व्यवस्थापक यांना देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७५(२) - बाबदेव तह० मौदा येथील बँकेची शाखा चाचेर तह मौदा येथे स्थानांतरीत करण्याबाबत मंजुरी मिळण्याचे संदर्भात सहकार खात्यास विनंती करण्याबाबत.

ठराव क्रमांक ७५(२) - मा० अध्यक्ष महोदय यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती दिली की, मौदा तालुक्यातील बाबदेव येथे दिनांक १.१०.५८ रोजी सहकार खात्याचे परवानगीनुसार श्रीराम सहकारी कारखान्याचे परिसरात बँकेची शाखा उघडण्यांत आली होती. सदर शाखा उघडण्यामागे मुख्यतः परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी वर्गाचे तसेच कर्जवाटप व ऊसाचे पेमेंट मधून वसुली करणे हा होता. या संदर्भात बँकेने वेळोवेळी कारखान्यास व कर्जास पात्र शेतकरी वर्गास कर्जवाटप करुन सहकार्य केले आहे. परंतु गेल्या ६-७ वर्षापासून सदर कारखाना बंद अवस्थेत असून, बँकेची मोठ्या प्रमाणा वरील कर्ज रक्कम शेतकरी व कारखान्याकडे थकित असून, वसुली बाबत न्यायालयीन कारवाई सुरु आहे. वरील बाबींचा विचार होऊन बँकेने दि. ६.११.७७ ला सदर शाखेतील कर्ज व्यवहार तालुका स्तरावर मौदा शाखेत स्थानांतरीत/विलीन केला. व याबाबत दिनांक २०.३.७८ रोजी पत्राद्वारे सहकार खात्यास कळविण्यांत आले होते.

सध्या मौदा तालुक्यातील चाचेर येथे बँकेने शाखा सुरु करावी अशा स्थानिक लोकांच्या मागणीवरुन वरील बाबींवर सविस्तर चर्चा होऊन मौदा शाखेत विलीन करण्यांत आलेल्या बाबदेव शाखेचा कर्ज व्यवहार चाचेर येथे स्थानांतरीत करुन चाचेर येथे शाखा सुरु करण्यास मंजुरीचे संदर्भात सहकार खात्याकडे विनंती करावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७५(३). बँकेचे भागधारकांना जास्तीत जास्त १५% दराने लाभांश वाटप करणेसाठी परवानगी मिळणेकरिता मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ७५(३) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे उपविधी क्र० ५७ अनुसार निव्वळ नफ्याचे २५% रिझर्व फंड व १५% मंडळ स्थायीकरण फंडाला तरतुद केल्यानंतर बँकेचे भागधारकांना १२% पर्यंत लाभांश वाटप करता येत असे आणि मा० निबंधकाचे परवानगीने १५% पर्यंत लाभांश वाटप करता येत. १९९७ पैकी १९९८ व २००० ला करावयाच्या एन.पी.ए.च्या तरतुदी मा वर्षी पूर्ण करण्यांत आल्यामुळे, बँकेचे भागधारकांना लाभांश वाटप करण्यांत

आलेला नाही. यावर्षी बँकेचा नफा विचारांत घेता बँकेचे भागधारकांना उपविधिप्रमाणे १५% लाभांश देता येईल. तथापि १५% पर्यंत लाभांश द्यावयाचा झाल्यास मा० जिल्हा उपनिबंधक / विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन यावर्षी बँकेचा नफा विचारांत घेता बँकेचे भागधारकांना १५% पर्यंत लाभांश वाटप करणेसाठी परवानगी मिळणेसाठी मा० विभागीय सह निबंधक, सह० संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७५(६) - नरखेड तालुका खरेदी विक्री सहकारी संस्थेनी केलेल्या कर्ज मागणी अर्जा संबंधि विचार विनिमय करणे.

ठराव क्रमांक ७५(६) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नरखेड तालुका खरेदी विक्री सह० संस्था, नरखेड ही संस्था बँकेची थकित कर्जदार असून या संस्थेचे बँकेचे व्यवहार बंद आहेत. यावर्षी बँकेच्या अथक प्रयत्नांनी व शेतकऱ्यांच्या सहकार्यांनी नरखेड तालुक्यातील बँकेची वसुली ४९% पर्यंत झाली आहे. तसेच पुनर्गठन योजना चालू करण्यांत आल्यामुळे फार मोठ्या प्रमाणांत शेतकरी वर्ग मुख्य प्रवाहांत येणार आहे. नरखेड तालुका खरेदी विक्री सहकारी संस्थांचे सर्व व्यवहार बंद असल्यामुळे व ही संस्था थकित कर्जदार असल्यामुळे शेतकरी सभासदांच्या शेतीविषयक सर्व गरजा भागविण्यासाठी बँक संस्थेला पुन्हा कर्ज देऊ शकत नाही.

या सर्व बाबींचा विचार करतां तेथील शेतकऱ्यांना त्यांच्या परस्थितीवर सर्व प्रकारचा माल मिळावा व खरेदी विक्री संस्थेवर नियंत्रण रहावे यासाठी बँकेने स्थानिक शाखेतील बँक अधिकाऱ्याची या संस्थेवर प्रशासक म्हणून नियुक्ती करुन संस्थेचे सर्व आर्थिक व्यवहार प्रशासकाचे मार्फत करण्याबाबत संस्थेवर बंधन घातले आहे.

शेतकऱ्यांना शेती विषयक गरजा भागविण्याकरिता रासायनिक खते बि-बियाणे पुरविण्याकरिता विदर्भ मार्केटींग संस्थेनी दिलेली हमी कमी पडत असल्याचे खरेदी विक्री संस्थेच्या संपूर्ण केंद्रावर ह्या सिझनमध्ये मालाचा पुरवठा करु शकत नाही. म्हणून संस्थेनी रु. ६.०० लाख रासायनिक खत व रु.३.०० लाख बियाणेकरिता कर्ज मागणी केली आहे. संस्थेकडे मागील कर्जाची थकित असल्यामुळे नविन कर्ज देण्यास अडचणी येत असल्या तरी संस्थेवर प्रशासक म्हणून नेमण्यांत आलेल्या बँकेच्या अधिकाऱ्याचे हातात व नियंत्रणा खाली आर्थिक व्यवहार असल्याने बँकेचे कर्ज वसुल होण्यास कोणतीही

अडचण येणार नाही असे वाटते. तरी संस्थेचे रासायनिक खताकरिता रुपये ६.०० लक्ष (रुपये सहा लाख) कॅश क्रेडीट व बि-बियाणे करिता रु.३.०० लाख कॅश क्रेडीट मिळण्याकरिता आलेल्या मागणीवर विचार करुन निर्णय घ्यावा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नरखेड तालुका खरेदी विक्री सहकारी संस्थेला शेतकऱ्यांना परमीटवर मालाचा पुरवठा करणेसाठी रासायनिक खता करिता रुपये ६.०० लाख, बि-बियाणे करिता रुपये ३.०० लाख कॅश क्रेडीट कर्ज मर्यादा मंजूर करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ७५(५) - सन १९९९-२००० करिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्पमुदती शेती पिक कर्ज मर्यादा रुपये १६.०० कोटी मंजूर आहे मंजूर पत्रातील नियम व अटी स्विकारुन कर्ज मर्यादेवर रुपये १०.०० कोटी उचल करण्याकरिता अधिकार देणे.

ठराव क्रमांक ७५(५) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. कडून सन १९९९-२००० करिता त्यांचे पत्र क्र. सीएफए / ओपीआर / एफ-२३/६६२/९९-२००० दिनांक ३ जुलै १९९९ प्रमाणे रु. १६.०० कोटी अल्पमुदत शेती कर्ज मर्यादा मंजूर असून, याबाबत राज्य बँकेने कळविलेल्या नियम व अटी स्विकृत करुन मंजूर मर्यादेवर रुपये १०.०० कोटी उचल करण्यासाठी ठराव पाठवावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

- RESOLUTION -

Resolved that the terms and conditions laid down by the Maharashtra State Cooperative Bank Ltd. (Incorporating the Vidarbh cooperative Bank Ltd.) Mumbai vide letter No. CFA/OPR/F-23/662/1999-2000, Dated 3rd July 1999 for the S.A.O. Credit limit of Rs.1600.00 lakhs (Rs. Sixteen hundred lakhs) only sanctioned to this Bank for financing seasonal Agricultural operations under poold Rate scheme for the year 1999-2000 be and are hereby accepted. The Bank will ensure S.T. (S.A.O) recovery above 40% by the end of June 2001.

Further resolved that anyone of the following office bearers from Group "A" alongwith anyone from officers from Group "B" are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of the loan from the limit of Rs. 1600.00 lakhs only sanctioned for Short-term seasonal Agricultural credit limit for the year 1999-2000.

Further resolved that anyone of the office bearers from Group "A" alongwith anyone from the following officer from Groups 'B' are hereby authorised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank Ltd., Nagpur creating first charge on the pronote of the Agricultural credit societies as custodian of the said pronotes on behalf of the Maharashtra State Cooperative Bank Ltd., (Incorporating the Vidarbh Cooperative Bank Ltd.,) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of this bank in favour of the Maharashtra State Cooperative Bank Ltd. (Incorporating the Vidarbh Cooperative Bank Ltd.,) Mumbai as collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this bank.

1) Chairman } Group 'A'
2) Vice chairman }
3) General Manager – Group 'B'

passed unanimously

विषय क्रमांक ७५(६) - पुनर्गठित योजने अंतर्गत मंजूर करावयाची गठनाची प्रकरणे व त्याबाबतची पुरवणी क.मं. पत्रके मंजूरीचे अधिकार सरव्यवस्थापक व्यवस्थापक व सर्व मुख्याधिकारी यांना देणेबाबत.

ठराव क्रमांक ७५(६) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, जिल्ह्यातील बँकेला संलग्न असलेल्या सेवा सहकारी संस्थाच्या ज्या सभासदांचे मुद्दल व व्याज बरोबरीत आले अथवा थकबाकीदार

सभासदांच्या कर्जाचे पुनर्गठन करुन यांना नव्याने कर्ज मंजूरी व वाटपाच्या निर्णय मा० संचालक मंडळानी दिनांक ८.६.२०००चे सभेत घेतलेला आहे. सदर निर्णयाचे अनुषंगाने पुनर्गठन प्रकरणांना मंजूरी देऊन कर्ज वितरणास वेग यावा व पुनर्गठनाची प्रकरणे त्वरित निकाली काढण्याचे दृष्टीने सेवा सहकारी संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या पुनर्गठन प्रकरणांना तसेच कमाल कर्ज मर्यादा पत्रकास मंजूरी देण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक, व्यवस्थापक व सर्व मुख्याधिकारी यांना देण्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. वरील प्रमाणे अधिकार दिल्यास कर्जवाटपात विलंब न होता प्रकरणे त्वरित निकाली निघून कर्जवाटप सुलभतेने हो[ईल]

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सेवा सहकारी संस्थाकडून प्राप्त होणाऱ्या पुनर्गठनाचे प्रकरणांना तसेच कमाल कर्ज मर्यादा — पत्रकास मंजूरी देण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक, व्यवस्थापक व सर्व मुख्याधिकारी यांना देण्यांत यावे. व पुनर्गठन प्रकरणांना मंजूरी मिळताच पुनर्गठित सभासदांना कर्जवाटपाची कार्यवाही सुरु केल्या[न] मंजूरी प्रदान केलेली प्रकरणे व क.म. पत्रके आवश्यक कागदपत्रासहीत अंतिम मान्यतेसाठी संबंधीत शाखांनी मुख्य कार्यालयास सादर करावी[त] असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा रविवार दिनांक २७.८.२००० रोजी दुपारी १२.०० वाजता "धनवटे नॅशनल कॉलेज काँग्रेसनगर, नागपूर" येथील "डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. | मा. श्री. र. गो. बेग | " |
| ५. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ६. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ७. | मा. श्री. व. आ. वाढे | " |
| ८. | मा. श्री. अ. व. गुजर | " |
| ९. | मा. श्री. चं. ल. कोल्हे | " |
| १०. | मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| ११. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| १२. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| १३. | मा. श्री. ना. र. जीभकाटे | " |
| १४. | मा. श्री. वि. आ. राऊत | " |
| १५. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १६. | मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १७. | मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १८. | मा. श्री. ब. मा. तायवाडे | " |
| १९. | मा. श्री. तु. भि. पन्नासे | " |
| २०. | मा. श्री. अ. शं. धार्मिक | " |
| २१. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २२. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २३. | मा. सौ. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २४. | मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| २५. | मा. श्री. एल. जी. चौधरी | कर्मचारी प्रतिनिधी |
| २६. | मा. श्री. व्हि. डी. शहाणे | " |
| २७. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

- अनुपस्थित -

१. मा. श्री. आ. र. देशमुख — संचालक
२. मा. श्री वि. वि. निमजे — "
३. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर
४. मा. श्री. सु. बा. देशमुख प्रतिनिधी, महा. राज्य सह. बँक म. मुंबई.
५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
६. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (बँक), नागपूर.
७. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
८. मा. विभागीय अधिकारी, म. रा. सह. बँक मर्या. विभा. कार्यालय, नागपूर.

---

सभेला मा. श्री. आ. र. देशमुख, संचालक, मा. श्री. वि. वि. निमजे, संचालक यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यात आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यात आली.

यानंतर सभेचे कार्यवाहीस सुरुवात करतांना मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, आजच्या बँकींग क्षेत्रातील स्पर्धात्मक परिस्थितीत बँकेचे अस्तित्व टिकवून ठेवून बँकेची प्रगती व्हावी ह्याकरिता पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांचेत समन्वय असणे आवश्यक आहे. याबाबतची जाणीव असावी व ह्याबाबतचे महत्व विचारात घेऊन बँकेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांची आज सभा बोलाविली आहे. असे सांगून सभेचे विषय पत्रिकेवरील विषयानुसार कार्यवाहीस सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ – मागील सभा दिनांक ६-६-२००० रोजी झालेल्या सभेचे प्रलिखित कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक ६.६.२००० रोजीचे सभेचे प्रतिवृत्तातील ठराव क्र. ४ वर चर्चा करतांना मा. श्री. र. गो. बेग म्हणाले की, शेतकऱ्यांना वस्तुरुप कर्जवाटपाचे परमीटवर रासायनिक खते इत्यादि माल पुरविण्याकरिता परवानगी देण्यात आलेल्या संस्थांची माहिती देण्यात यावी. मा. श्री. चे. तु. समर्थ, संचालक म्हणाले की, बँकेचे परमीटवर ज्या ठिकाणावरून माल रासायनिक खते इत्यादि उपलब्ध होत असेल त्या ठिकाणावरुन माल उचल करण्याची मुभा असावी. मा. चं. ल. कोल्हे म्हणाले की, सहकारी संस्थांमध्ये आवश्यक तो माल वेळीच उपलब्ध होत नाही. मा. अ. य. गुजर, संचालक म्हणाले की, बँकेचे परमिटवर सहकारी संस्थांनी मालाचा पुरवठा करतांना

सचिवाने गैरव्यवहार करु नये यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. मा. श्री. वि. रा. हुळके म्हणाले की, खरेदी विक्री संस्थामार्फत मालाचा पुरवठा वेळेवर व्हावा पाहिजे. यावर मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, सहकाराचे महत्व विचारात घेऊन सहकारातूनच प्रगती करण्याकरिता, सहकारी संस्थांना सक्षम करणेसाठी सहकारी संस्थामार्फतच बँकेने मंजूर केलेल्या वस्तुरूप रकमेच्या परमीटवर रासायनिक खते इत्यादि मालाचा पुरवठा झाला पाहिजे व यासाठी सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. जिल्ह्यातील खरेदी-विक्री संस्थाद्वारे शेतकऱ्यांना परमीटवर माल पुरविण्यांत येत आहे. कृषि सेवा केंद्रावर परमीटचे बिल फाडल्या जाते परंतु माल राहत नाही असा अनुभव आहे. ज्या सहकारी संस्थेत माल आहे, त्याबाबतीत संस्थेतून मालाचा उचल घेण्यांत यावा. ठराव क्र. ६वर चर्चा करतांना श्री आ. रा. गुप्ता यांनी ठरावांत पावसाळी हंगामात ट्रॅक्टरचे कर्जवाटप तूर्तास स्थगित ठेवण्यांत आले आहे" असे लिहिले आहे. या ऐवजी "ट्रॅक्टरकरिता नविन प्रकरणांत पूर्वीप्रमाणेच कर्जपुरवठा करण्यांत यावा" असे पाहिजे होते अशी सूचना केली. यावर मा० अध्यक्ष यांनी ट्रॅक्टरकरिता कर्ज प्रकरणे स्थगित न ठेवता पुर्वीप्रमाणेच कर्ज वाटप सुरु ठेवावे असे सांगून मागील प्रतिवृत्तांत श्री गुप्ता यांनी सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती घेण्यांत यावी असे सांगितले. ठराव क्रमांक ७९(२)वर चर्चा करतांना मा. श्री. अ. य. गुजर, संचालक म्हणाले की, यापूर्वी शाखा उघडण्यास मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था म. रा. पूणे यांची परवानगी घेण्यांत आली आहे. त्यानंतर येथे बाबदेव येथील शाखा तबदील करण्यासाठी सहकार खात्याची पुन्हा परवानगी आवश्यक आहे काय? यावर मा० अध्यक्ष यांनी सहकार खात्याची परवानगी लवकर मिळेल असे सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक ५.५.२०००रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्तात ठराव क्र. ६ मध्ये पावसाळी हंगामात ट्रॅक्टरचे कर्ज वाटप तूर्तास स्थगित ठेवण्यात आले आहे याऐवजी ट्रॅक्टरकरिता नविन प्रकरणांत पूर्वीप्रमाणेच कर्जपुरवठा करण्यांत यावा" अशी दुरुस्ती घेण्यांत यावी. असे ठरले. आणि मागील दिनांक ५.५.२०००चे सभेचे प्रतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारित झालेल्या ठरावाबाबत कार्यक्रमाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा० सरव्यवस्थापक

यांनी मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ३ - सन १९९९-२०००मध्ये बँकेला झालेल्या नफ्याचे विनियोग बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ३ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९९-२००० या वर्षात बँकेला रु.६५३७०८[illegible] निव्वळ नफा झालेला आहे. मागील वर्षीचा शिल्लक नफा रुपये ९३३२.०८ असून यावर्षी रुपये ६५३७०९६२.२८ नफा विनियोगास पात्र आहे. बँकेचे उपविधी क्रमांक ५७प्रमाणे निव्वळ नफ्याचे २५% रिझर्व फंडाला व १०% अ[illegible] स्थायिकरण फंडाला रक्कम विनियोजीत केल्यानंतर बँकेजवळ रुपये — ३७२२७०८९.५७ नफा शिल्लक राहतो. राहिलेल्या शिल्लक नफ्यातून बँकेने भागधारकांना लाभांश, कर्मचाऱ्यांना बोनस/एक्सग्रेशिया, इमारत निधी इत्यादि करिता विनियोग करावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ३१मार्च२०००चे ताळेबंदानुसार विनियोगासाठी शिल्लक असलेल्या नफ्याचा विनियोग करणेकरिता मा० अध्यक्ष यांना अधिकार देण्यात आले आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ - मा० अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ४(१) - राष्ट्रीयकृत बँक/सेवा/वि.का./आदिवासी संस्थांचे "नो ड्यु प्रमाणपत्र" न घेताच शेतकरी कर्ज वाटप करतात. यावर प्रतिबंध आणण्यासाठी जिल्हा उपनिबंधक/विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ४(१) - मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, जिल्हा बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्ह्याचे असल्यामुळे सर्व प्रकारच्या शेती कर्जाचा पुरवठा जिल्हा बँकेचे शाखांमधून सेवा सहकारी संस्था/विविध कार्यकारी संस्था माध्यमातून करण्यांत येतो. त्याचप्रमाणे राष्ट्रीयकृत बँका, अर्बन बँका सुद्धा अशा प्रकारच्या कर्जपुरवठा शेतकऱ्यांना करीत असतात. सेवा सहकारी/विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत जिल्हा सह. बँक शेतकऱ्यांना व ग्रामीण कारागिरांना कर्जवाटप करतांना अशा सभासदांकडे या कार्यक्षेत्रातील

राष्ट्रियकृत/अर्बन बँकांची कर्जबाकी आहे. किंवा नाही याबाबत खात्री करुन घेतात. त्यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात येवून त्यांचेकडे कर्जबाकी नसल्याची खात्री करुन घेतल्यानंतरच बँकेचे शाखेतून कर्जवाटप करण्यात येते रिझर्व बँकेच्या धोरणाप्रमाणे कुठल्याही बँकांनी कर्जवाटप करतांना त्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या इतर बँकांचे नोड्युज प्रमाणपत्र घेतल्याशिवाय कर्ज मंजूर करु नये असा नियम आहे. तथापी नागपूर जिल्ह्यातील कांही राष्ट्रीयकृत/अर्बन बँका कर्जवाटप करतांना सेवा सह०/वि.का.संस्था/आदिवासी सेवा सह.संस्था/जिल्हा सहकारी बँकेचे नो ड्युज प्रमाणपत्र न घेताच कर्जवाटप करित असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर सभासदांना दुहेरी कर्ज पुरवठा होत असल्याने थकितीचे प्रमाण वाढते व कर्जवसुलीवर अनिष्ठ परिणाम होतो.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नियमाप्रमाणे राष्ट्रीयकृत/अर्बन बँका यांनी कर्जवाटप करतांना जिल्हा सहकारी बँक/विविध कार्यकारी संस्था/सेवा सह०संस्था/आदिवासी सह०संस्था यांचेकडून नोड्युज प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे त्याप्रमाणे राष्ट्रीयकृत/अर्बन सह० बँकांनी नागपूर जिल्ह्याचे कार्यक्षेत्रात कर्ज मंजूर करतांना जिल्हा सहकारी बँक/विविध कार्यकारी संस्था/सेवा सह० संस्था/आदिवासी सह० संस्था यांचेकडून नो ड्युज प्रमाण पत्र घेऊनच कर्जवाटप करण्याचे बंधन राष्ट्रीयकृत व अर्बन बँकांना घालून तसे या बँकांना कळविण्याबाबत मा० जिल्हाधिकारी, मा० जिल्हा उपनिबंधक मा० विभागीय सह निबंधक, मा० सहकार आयुक्त, रिझर्व बँक, नाबार्ड व लिड बँक यांना विनंती करण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८(२) - मा० वेज बोर्डने लागू केलेली पगारवाढ व इतर सवलती देणेबाबत.

ठराव क्रमांक ८(२) - मा० अध्यक्ष यांचे परवानगीने बँकेचे संचालक प्रा.डि. व. प्रा. तायवाडे यांनी प्रश्न उपस्थित केला की दिनांक ६।५।२०००चे मा० संचालक मंडळाचे सभेत दिनांक १०।६।२०००चे सभेतील ठराव क्रमांक २ कायम करतांना चर्चा होऊन मान्यता प्राप्त कर्मचारी युनियनचे अध्यक्ष व सचिव संयुक्तरित्या चर्चेला येत नसतील तर उर्वरित पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन हा प्रश्न निकाली काढण्यात यावा किंवा बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना बोलावून त्यांचेशी विचार विनिमय करुन प्रश्न निकाली काढावा असे ठरले होते, तरी याबाबत झालेल्या कार्यवाहीविषयी कृपया

सभेला माहिती द्यावी. त्यांचे मतास मा० संचालक सर्वश्री ब.क.पारखि, श्रीमिर धार्मिक, नि.ना. निमजे, र.व्यं. निमजे, तु.श्रि. फलासे, ग.के. शाहिरे, चं.ल. कोल्हे यांनी दुजोरा दिला. व कर्मचाऱ्यांचे पगारवाढी बाबत युनियनच्या पदाधिकाऱ्यांशी प्रत्यक्षात चर्चा करुन संपूर्ण प्रकरण निकाली काढण्याचे दृष्टीने विलंब होत असल्यामुळे सर्वसाधारण कर्मचाऱ्यांचे मनात असंतोष निर्माण व्हायची शक्यता असून, त्याचा परिणाम बँकेच्या दैनंदिन व्यवहारावर पडू शकतो तसेच बँकेची सध्याची स्थिती पगारवाढ देण्याची असल्यामुळे युनियनच्या पदाधिकाऱ्यांशी वाटाघाटी होऊन संपूर्ण प्रकरण निकालात काढावयाच्या अगोदर दिनांक १-६-२००० पासून मा० वेज बोर्डाने नमुद केलेली पगारवाढ लागू करावी व उर्वरित आर्थिक थकबाकी बाबत युनियनशी करारनामा करुन हा प्रश्न निकाली काढावा असे मत व्यक्त केले.

यावर मा० अध्यक्ष महोदय यांनी सांगितले की, दि. १-६-२००० पासून मा० वेज बोर्डाने नमुद केलेली पगारवाढ व इतर सोयी सवलती बँकेने स्वत: देण्यास हरकत नाही. परंतु उर्वरित थकबाकीसाठी (अरिअर्स करिता) युनियनशी करारनामा करुन किंवा बँकेने औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या केसच्या निकालास अधिन राहूनच यावर अंमलबजावणी करण्यात येईल त्यास सर्व संचालकांनीही दुजोरा दिला. तसेच मा० वेज बोर्डाचा आदेश खारीज करण्यासाठी केस सुरु ठेवावा असे पण एकमताने ठरले.

यावर सविस्तर चर्चा होऊन दिनांक १-६-२००० पासून पुढील कालावधीसाठी मा० वेज बोर्डाने नमुद केल्यानुसार पगारवाढ व इतर सोयी सवलती बँकेने स्वत: लागू करण्यात याव्यात व युनियनचे पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन उर्वरित थकबाकीच्या प्रश्न निकालात काढणे बाबत योग्य तो निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यात येत आहे असे ठरले व प्रश्न निकालात न निघाल्यास अशाप्रकारची थकबाकी बँक देण्यास असमर्थ असल्याने केस सुरु ठेवावी असे सर्वानुमते ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर बँकेचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी यांना समन्वय सभेस उपस्थित राहणेसाठी विनंती करुन सभेला उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

मुख्यव्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दि.१८.७.२००० रोजी दुपारी २.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील 'सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा.श्री सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

— उपस्थित —

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा.सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा.श्री. र. गो. बंग | संचालक |
| ४. | मा.श्री. श्रा. चं. अहाणे | " |
| ५. | मा.श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ६. | मा.श्री. अ. य. गुजर | " |
| ७. | मा.श्री. चं. ल. कोल्हे | " |
| ८. | मा.श्री. आ. र. देशमुख | " |
| ९. | मा.श्री. सं. लि. चोरे | " |
| १०. | मा.श्री. शा. ग. धवड | " |
| ११. | मा.श्री. वि. रा. हुलके | " |
| १२. | मा.श्री. ना. र. अग्निकांटे | " |
| १३. | मा.श्री. वि. ना. राऊत | " |
| १४. | मा.श्री. वि. वि. निमजे | " |
| १५ | मा.श्री. रा. के. शाहिरे | " |
| १६. | मा.श्री. मो. त्रि. निमजे | " |
| १७. | मा.श्री. र. व्यं. निमजे | " |
| १८. | मा.श्री. ब. आ. तायवाडे | " |
| १९. | मा.श्री. मु. भि. पन्नासे | " |
| २०. | मा.श्री. अ. श्रं. धार्मिक | " |
| २१. | मा.श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २२. | मा.श्री. चं. तु. समर्थ | " |
| २३. | मा.सौ. स्मिताताई कुंभारे | संचालिका |
| २४. | मा.सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| २५. | मा.श्री. एल. जी. चौधरी | कर्मचारी प्रतिनिधी |
| २६. | मा.श्री. व्ही. जी. व्याहाणे | " |
| २७. | मा.श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक. |

- अनुपस्थित -

१. मा. श्री र. पां. गावंडे — संचालक

२. मा. श्री. व. आ. वांढे — "

३. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर.

४. मा. श्री सु. वा. देशमुख, प्रतिनिधी, महा. राज्य सह. बँक म. मुंबई.

५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

६. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग ३ सहकारी संस्था (बँक) नागपूर.

७. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.

८. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक लि. विभागीय कार्यालय नागपूर.

सभेला अनुपस्थित असलेले श्री. र. पां. गावंडे, व श्री. व. आ. वांढे संचालक यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर सभेला उपस्थितांचे स्वागत करून विषय पत्रिकेतील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा. अध्यक्ष यांनी सुरुवात केली.

विषय क्रमांक १ - मागील सभा दिनांक १८.६.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १८.६.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी मागील दिनांक १८.६.२००० रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती दिली. दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ३ - मागील वार्षिक साधारण सभेने मंजूर केलेल्या सन १९९९-२०००चे अंदाजपत्रकांतील तरतुदीपेक्षा ज्या बाबींवर अधिक खर्च झाला त्यास मंजूरी देवुन जादा झालेला खर्च व सन २०००-२००१ चे अंदाजपत्रकास वार्षिक साधारण सभेपुढे ठेवण्यास मंजूरी देणे.

मान्यता देण्यांत आली व सदर वार्षिक अहवाल बँकेच्या येणाऱ्या वार्षिक साधारण सभेत ठेवण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ - सन १९९८-९९ चे अंकेक्षण पुर्तता अहवालास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ५ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मा० विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सहकारी संस्था (बँक), नागपूर यांनी बँकेचे १९९८-९९ या वर्षाचे अंकेक्षण करून बँकेस पुर्तता करण्यासाठी अंकेक्षण अहवाल बँकेकडे पाठविला. कार्यालयाने १९९८-९९ चे अंकेक्षण अहवालावरील पुर्तता अहवाल तयार केला असून दिनांक १.७.२००० रोजी झालेल्या मा० अंकेक्षण पूर्तता उपसमितीने मान्यता दिलेली आहे. सदर अंकेक्षण पूर्तता अहवाल मा० विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, यांचेकडे पाठवावयाचा आहे. सभेचे माहितीस व मान्यतेस ठेवण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सन १९९८-९९ चे अंकेक्षण पूर्तता अहवालास अंतिम मान्यता देण्यांत आली व हा पुर्तता अहवाल संबंधीतांकडे त्वरित पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ - सेवा सहकारी सोसायट्यांना इमारत बांधणेकरिता कर्ज उपलब्ध करून देऊन बांधलेली इमारत बँकेचे शाखा कार्यालयासाठी किरायाने घेणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या नागपूर येथील मुख्य कार्यालयाचे इमारतीशिवाय नागपूर शहर, तालुका व इतर ठिकाणी बँकेच्या स्वमालकीच्या १७ इमारती आहेत व या इमारतीमध्ये बँकेची कार्यालय आहेत. उर्वरित शाखांची कार्यालय किरायाचे इमारतीमध्ये आहेत. बँकेच्या शाखा कार्यालयासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने पक्क्या बांधकामाची इमारत असणे आवश्यक आहे. दिनांक १०.६.२००० रोजी झालेल्या मा० इमारत देखरेख व बांधकाम उपसमितीचे सभेत बँकेच्या शाखा कार्यालयाकरिता इमारत किरायाने घेण्याऐवजी विविध कार्यकारी/सेवा सह. सोसायट्यांना इमारत बांधणेसाठी आपले बँकेतून कर्ज उपलब्ध करून द्यावे व बांधलेल्या इमारत

ठराव क्रमांक ३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देताना सांगितले की, मागिल वार्षिक साधारण सभेने मंजूर केलेल्या सन १९९९-२००० चे अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा वाहन खर्च, वार्षिक आमसभा खर्च, इमारत दुरुस्ती खर्च, किरकोळ खर्च व संचालक भत्ता याबर जास्त खर्च झालेला आहे. याबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

(रुपये (लाखांत)

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | १९९९-२००० चा अंदाज | १९९९-२००० मध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च | अंदाजापेक्षा जास्त झालेला खर्च १९९९-२००० |
|---|---|---|---|---|
| १. | वाहन खर्च | १०.०० | २४.०२ | ७.०२ |
| २. | वार्षिक आमसभा खर्च | ०.५० | ०.५४ | ०.०४ |
| ३. | इमारत दुरुस्ती खर्च | ६.०० | १०.७५ | ४.७५ |
| ४. | किरकोळ खर्च | ३५.०० | ४५.५८ | १०.५८ |
| ५. | संचालक भत्ता | ३.०० | ३.८७ | ०.८७ |

विषयावर चर्चा करताना मा. श्री. धार्मिक संचालक यांनी संचालकांच्या जनसंपर्क खर्च रुपये ७.०० लाखावरुन रुपये ५.०० लाख असावयास पाहिजे अशी सुचना केली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागिल वार्षिक साधारण सभेने मंजूर केलेल्या सन १९९९-२००० चे अंदाजपत्रकांतील तरतुदीपेक्षा वरील प्रमाणे जास्त झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सन २०००-२००१ चे अंदाजपत्रकात संचालकांच्या जनसंपर्क खर्च रुपये ५.०० लाख करुन सन २०००-२००१ चे अंदाजपत्रकास मंजूरी दिली. सन १९९९-२००० चे अंदाजपत्रकातील जादा झालेला खर्च व सन २०००-२००१ चे अंदाज पत्रक मंजूरीसाठी सन १९९९-२००० चे वार्षिक साधारण सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात यावे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ४ - बँकेच्या सन १९९९-२००० चे वार्षिक अहवालास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ४ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देताना सांगितले की, सन १९९९-२००० या वर्षातील बँकेच्या वार्षिक अहवाल कार्यालयाने तयार केला आहे. सदर अहवाल बँकेचे येणाऱ्या वार्षिक साधारण सभेत ठेवायचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सन १९९९-२००० या वर्षाकरिता तयार केलेला वार्षिक अहवालास मान्यता

इमारती बँकेच्या शाखा कार्यालयाकरिता किरायाने घेण्यांत यावयांत अशी चर्चा झाली. किरायाच्या रकमेतून दिलेल्या कर्जाची वसुली करून घेण्यांत यावी. यामुळे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीला स्वतःची इमारत होईल व अशा पक्क्या इमारतीमध्ये बँक शाखा कार्यालय देखील सुरक्षित राहील. यामुळे सोसायटीची आर्थिक स्थिती सुदृढ होईल. याकरिता मा. श्री. र. गो. बंग संचालक व मा. श्री. चं. तु. समर्थ, संचालक यांनी दुजोरा दिला.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन पक्क्या इमारती बांधणेकरिता सेवा सहकारी / विविध कार्यकारी सहकारी संस्थांना कर्ज उपलब्ध करून देण्यातयावे व बांधलेल्या पक्क्या इमारती बँकेच्या शाखा कार्यालयासाठी किरायाने घेण्यांत यावयात व कर्जाची रक्कम किरायाचे रकमेतून वसुल करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७ - नरसिंह आदिवासी सहकारी सुत गिरणी मर्या. खापाचे शेअर्स रक्कम परत करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग तथा अतिरिक्त निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे दिनांक २०.८.१९९५ चे आदेशाप्रमाणे नरसिंह आदिवासी "सहकारी सुत गिरणी" औद्योगिक सहकारी संस्था, मर्या. खापा तह. सावनेर या संस्थेचे रुपांतर नरसिंह आदिवासी औद्योगिक सहकारी संस्था मर्या. खापा, तह. सावनेर असे झाले असून त्यांचे आदेशानुसार सुतगिरणीचे अस्तित्व संपुष्टांत आल्यामुळे सदर सुत-गिरणीचे सदस्यत्व रद्द करावे व त्यांना शेअर्सची रक्कम परत करण्यांत यावी असा निर्णय मा. व्यवस्थापक समितीचे दिनांक २९.५.९९ चे सभेत घेण्यांत आला. सबब ह्या निर्णयाला मान्यता मिळावी याकरिता सभेचे माहितीस व मान्यतेस ठेवण्यांत आला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. व्यवस्थापक समितीचे दिनांक २९.५.९९ रोजीचे सभेत झालेल्या "नरसिंह आदिवासी सहकारी सुतगिरणी मर्या. खापा" चे बँकेचे सदस्यत्व रद्द करावे व शेअर्सची रक्कम त्यांना परत करण्यांत यावी. या निर्णयास मान्यता देण्यांत येत आहे असे ठरले. या निर्णया प्रमाणे नरसिंह आदिवासी सहकारी सुत गिरणी मर्यादित, खापा चे बँकेतील सदस्यत्व रद्द करून शेअर्सची रक्कम परत करण्यांत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८ - थकबाकीदार सभासदांना पीक विम्याचा हप्ता

भरण्यासाठी ह्या रकमेएवढे कर्ज देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, शासनाने राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप व रब्बी हंगामासाठी अधिसुचित केलेल्या पिकांसाठी अधिसुचित क्षेत्रासाठी राबविण्याचे ठरविले असून विविध वित्त संस्थांकडून पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना ही योजना सक्तीची केली आहे व इतरांना मात्र ऐच्छिक आहे. नैसर्गिक आपत्ती किंवा इतर विविध कारणामुळे शेतकरी सभासदास उत्पादन झाले नाही तर आर्थिक उन्नती होत नाही असा कर्जदार शेतकरी थकबाकीदार होतो व थकबाकीदार सभासदांना बँक कर्जपुरवठा करीत नाही. म्हणून थकबाकीदार सभासदांना पीक विम्याच्या रक्कमे एवढी रक्कम कर्ज म्हणून द्यावी असा प्रस्ताव मा० सहकार आयुक्त व निबंधक यांनी नाबार्डला मान्यतेसाठी पाठविला असता खालील अटी घालून मंजूरी दिली आहे.

१. सभासद जिराईत क्षेत्रातील अल्प व अत्यल्प भूधारक असावा व जाणिवपुर्वक थकबाकीदार नसावा.

२. या योजनेअंतर्गत लाभार्थी सभासदांनी पिक विमा योजनेअंतर्गत विम्यापोटी प्राप्त होणारी रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस कर्जापोटी वर्ग करण्याची लेखी हमी दिली पाहिजे.

३. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने या योजनेसाठी स्वनिधीतून स्वभांडवलातून कर्ज पुरवठा करणे आवश्यक आहे. योजनेअंतर्गत देण्यांत आलेल्या कर्जाची रक्कम नाबार्डकडून फेरकर्ज म्हणून उपलब्ध होणार नाही. या योजनेअंतर्गत चालु थकबाकी देखील नॉन ओव्हर डयु करता धरले जाणार नाही.

४. सदरची योजना ही कर्ज वसुलीच्या पुरोगामी धोरणास अवलंबून आखण्यांत आली आहे.

५. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्ज वसुलीची यंत्रणा यांनी योजनेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक लाभार्थींची संख्या पिकाखालील क्षेत्र व उत्पादन या आकडेवारीवर पूर्ण लक्ष देण्यांत यावे व पिक कर्जाची वसुली परिणामकारक होईल याकडे विशेष लक्ष द्यावे.

६. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थकबाकीदार सभासदांना संस्थामार्फत कर्ज उपलब्ध करून देण्याच्या प्रवाहांत आणण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करून सहकारी संस्थामार्फत पतपुरवठा होईल याकडे प्रयत्न करावा.

७. सदर योजनेत थकबाकीदार ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा समावेश करु नये.

सादर केलेल्या प्रस्तावास नाबार्डने दिलेल्या मंजूरीनुसार जिल्हातील

सर्व शाखा व सरकारी पतपुरवठा संस्थांना या योजनेसंबंधी कळवून नाबार्डने चालून दिलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा चालु खरीप हंगाम २००० मध्ये फायदा देण्यासंबंधी कार्यवाही करणेसाठी मा. सहकार आयुक्त व निबंधक यांनी कळविले आहे यावर मा. श्री. बेग संचालक म्हणाले की, या योजनेत सेंद्रीय पिकांचा सुद्धा समावेश करण्यात यावा. याअनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देताना सांगितले की, राष्ट्रीय पिक विमा योजनेमध्ये सेंद्रीय पिकांचा समावेश करण्याबाबत संचालक मंडळाचे ठरावासह शासनाला विनंती करण्यात येईल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन थकबाकीदार शेतकरी सभासदांना पिक विम्याचा हप्ता भरण्यासाठी पिक विम्याचे रकमेएवढे कर्ज शासनाचे धोरणाप्रमाणे देण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ९. सन १९९९-२००० या वर्षाची ऑडीट फी भरण्यास मंजूरी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे ऑडीट करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारावरील खर्च भागविण्याकरिता अंकेक्षण फी ची केलेल्या आकारणीएवढी रक्कम शासकीय खजिन्यांत भरावी लागते. सन १९९९-२००० या वर्षी शासकीय अंकेक्षण फी रुपये २३२६५२२/- एवढी आकारणी करण्यांत आली आहे. मागील वर्षी १९९८-९९ करिता ऑडीट फीची आकारणी रुपये १२३६६२९/- केली होती. १९९९-२००० करिता आकारणी केलेल्या ऑडीट फी पैकी रुपये १३३०००० चा भरणा शासकीय खजिन्यांत दिनांक ३१ मार्च २००० पर्यंत करण्यांत आलेला आहे. उर्वरित रक्कम रुपये ९९६५२२/- भरणे शिल्लक आहे. वाढलेल्या फी बाबत माहिती घेतली असतां पाचवे वेतन आयोगाचे कर्मचारी पगार वाढीमुळे ऑडीट फी वाढली असल्याचे अंकेक्षण विभागाकडून कळले. तसेच सदरची ऑडीट फी भरण्याकरिता वारंवार पाठपुरावा होत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन शासनाकडून १९९९-२००० या वर्षाकरिता आकारण्यात आलेली ऑडीट फी भरणे आवश्यक असल्याने उर्वरित रुपये ९९६५२२/- एवढी रक्कम शासकीय खजिन्यांत भरण्यास मंजूरी देण्यात येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १०. माहे जून २००० अखेर शेतकी कर्ज वसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ७० - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९९-२००० मध्ये शेतकी कर्जाची वसुली मोहिम प्रभावीपणे राबविण्यासाठी एक "वसुली कृती कार्यक्रम" तयार करण्यांत आला असून या कार्यक्रमांतर्गत संस्थावार सभासदांच्या याद्या कृषिउत्पन्न बाजार समिती कापूस संकलन केंद्र, एकाधिकार ज्वार खरेदी केंद्र, साखर कारखाना इत्यादी ठिकाणी पाठविण्यांत आल्या. कापूस संकलन केंद्रावर ग्रीन कार्ड उपलब्ध करून देण्यांत आले. थकबाकीदार सभासदांकडील कर्ज वसुली साठी सूचना पत्रे पाठविली. वसुली कामाच्या वेग वाढविण्याकरिता विशेष वसुली अधिकाऱ्यांना जीपगाडी देण्यांत आली. जिल्ह्यातील पीक परिस्थिती समाधानकारक नसल्याने याचा वसुलीवर विपरीत परिणाम झाला असे दिसून येताच मुख्य कार्यालय तसेच तालुकास्तरावर दरमहा वसुली सभा आयोजित करण्यांत आल्या. कर्ज वसुली मोहिम अत्यंत जोमाने राबविण्या करिता जिकरीचे प्रयत्न करण्यांत आले व कर्ज वसुलीकरिता वातावरण निर्मिती करण्यांत आली.

मागील वर्षी जून ९९ अखेर शेतकी कर्ज वसुलीचे प्रमाण २६.१५ टक्के होते व व्याज रुपये ८५६.२० लाख वसुल झाले होते. या वर्षी कर्ज वसुली मोहिम अधिक जोमाने राबविल्यामुळे माहे जून २००० अखेर वसुलीचे प्रमाण ३३.१९ टक्के असून व्याज रुपये १०५७.५८ लाख वसुल झाले आहे. मागील वर्षीचे तुलनेत कर्जवसुलीचे प्रमाण ७ टक्यांनी वाढले असले तरी नाबार्डचे धोरणाप्रमाणे माहे जून २००० अखेर ६० टक्के वसुली ची सिजनॅलिटी डिसीप्लीन मेन्टेन केली नसल्यामुळे वसुली समाधान कारक झाली असे म्हणता येणार नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन माहे जून २००० अखेर शेतकी कर्ज वसुलीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ७१ - अल्प मुदत पीक कर्ज मर्यादेत वाढ करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७१ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सध्याचे अल्प मुदत कर्ज वाटपाच्या धोरणानुसार कोरडवाहू पीकाकरिता प्रती सभासदास जास्तीत जास्त रुपये ५०,०००/- पीक कर्ज मर्यादा तर कोरडवाहू ओलीत मिळून पिकाकरिता प्रति सभासदास जास्तीत जास्त रुपये १.०० लाख पर्यंत पीक कर्ज मर्यादा मंजूर करता येते. दरवर्षी उत्पादनाकरिता

आवश्यक असणाऱ्या वस्तुंच्या महागाईमुळे वाढलेल्या किंमती विचारात घेवून पिक कर्जाचे दरांत वाढ करण्यासाठी तज्ञ समितीचे सभेत निर्णय घेतला जातो. उत्पादना करिता आवश्यक असणाऱ्या रासायनिक खते, बि-बियाणे व अनुषंगिक खर्चात वाढ झाल्यामुळे सभासदांनी जास्त कर्जाची मागणी करुनही त्यांच्या पिक कर्ज मर्यादा कमी पडत असल्यामुळे मागणीनुसार कर्जवाटप करता येत नाही. म्हणून अल्पमुदती कर्ज वाटपाच्या पिक कर्ज मर्यादा वाढवाव्या असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन पिक उत्पादना करिता आवश्यक असणाऱ्या वस्तुंच्या किंमतीत मजूरी व इतर अनुषंगिक खर्च विचारांत घेवून कोरडवाहू पिकांकरिता प्रति सभासद जास्तीत जास्त रुपये ५०,०००/- पिक कर्ज मर्यादा तर कोरडवाहू व ओलित मिळून प्रती सभासद जास्तीत जास्त रुपये १,५०,०००/- कर्ज मर्यादा ठरविण्यांत यावी असे ठरले. यांत ऊसासाठी होणाऱ्या कर्ज वाटपास ही अट लागू राहणार नाही. सदर वाढीव कर्ज मर्यादेचा लाभ चालू हंगामात शेतकऱ्यांना मिळावा याकरिता या धोरणात्मक बदलाच्या समावेश चालू हंगाम सन २०००-२००१ चे धोरण पुस्तीकेत करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ३२ - बँकेच्या उपविधीत उपविधी क्र.६ (बी) (ए) नविन समाविष्ट करण्यास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३२ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व बँकेचे उपविधि उपविधी क्र.६ (बी) (ए) नव्याने समाविष्ट करण्याचे आवश्यकतेबाबत दिलेल्या टिपणीनुसार माहिती दिली. विषयावरील चर्चेत भाग घेतांना मा. श्री पन्नासे, संचालक यांनी आर्थिक व्यवहार नसलेल्या संस्थांची शाखांकडून माहिती मागविण्यांत यावी त्यानंतरच उपविधीत दुरुस्तीचा विचार करण्यांत यावा असे सुचविले. श्री पाराशिवनीकर संचालक यांनी लाभांश वाटपाबाबतचे पध्दतील सुधारणा करुन संस्थांना दिला जाणारा लाभांश त्यांचे खात्यावर जमा करण्यांत यावा अशी सुचना केली. या सुचनेला दुजोरा देतांना मा. श्री र. गो. बेग, संचालक म्हणाले की, लाभांशाची रक्कम संस्थांचे खात्यावर जमा करण्यांत यावी. मा. श्री धार्मिक, श्री तायवाडे, श्री ठाकरे, श्री समर्थ, सौ. किंमतकर व इतर सर्व संचालकांनी चर्चेत भाग घेतला. यावर मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, सन १९९५ मध्ये लाभांश वाटप करण्यांत आला. सभासद संस्थांना लाभांश उचल करण्यास कळविण्यात आले. परंतु कांही संस्थांचे पत्ते बदलल्यामुळे किंवा अपूर्ण पत्त्यामुळे लाभांश रक्कमेचा उचल झाला नाही. लाभांशाबाबत मागील सभांमध्ये दोन-तीन वेळा चर्चा झाली आहे. म्हणून श्री पाराशिवनीकर

यांनी सुचविल्यानुसार या वर्षीचा लाभांश संबंधित संस्थांचे खात्यावर जमा करण्यांत येईल. तसेच ज्या संस्थांचे मागिल पुरवणी आर्थिक व्यवहार नाहीत ह्याची माहिती बोलाविण्यांत यावी व सभासद संस्थांचे खाते असलेल्या शाखाकडून संस्थांचे पत्त्याची माहिती मागविण्यात यावी असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेच्या उपविधीत उपविधी क्र.६ (बी) (ए) नव्याने समाविष्ट करणेबाबत सन्माननीय संचालकांनी यावर विचार करुन उपविधीत दुरुस्ती करावयाची असल्याने उपविधीत दुरुस्ती मंजूर करावयाचे अगोदर अधिक माहिती घ्यावयाची आहे. याकरिता सर्व सन्माननीय संचालकांनी उपविधी संबंधित अभ्यास करुन आपले विचार लेखी स्वरुपात बँकेकडे पाठवावे जेणेकरुन सर्व दृष्टीने योग्य असा निर्णय घेणे सोयीचे होईल. तरी उपविधी संबंधाने सर्व सन्माननीय संचालकांनी लेखी स्वरुपात आपले मत बँकेला कळवावे. त्या नंतरच योग्य अशी उपविधी तयार करता येईल असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १३ - वसुलीचे उत्कृष्ठ काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना विशेष बक्षिस देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे हिताचे दृष्टीने विशेष महत्व असलेल्या कर्ज वसुलीचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत राहिल्यास बँकेचा एन.पी.ए. कमी होऊन बँकेची आर्थिक स्थिती सुदृढ होण्यास मदत होते व नाबार्डने घालून दिलेल्या वसुली शिस्तीचे पालन होऊन कमी व्याज दराने नाबार्ड/रुन बँकेकडून फेरकर्जपुरवठा उपलब्ध होऊ शकतो.

मागिल दोन हंगामातील शेतकी कर्ज वसुलीचा आढावा घेतला असतां बँकेची वसुली समाधानकारक होती त्यामुळे सन १९९९-२००० या वसुली हंगामात वसुली कृती कार्यक्रम आंखला व या वसुली कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी अंत्यंत धडाक्याने व जोमाने राबविण्यात आली. जिल्ह्यातील पिक परिस्थिती समाधानकारक नसल्याने त्याचा कर्ज वसुलीवर विपरित परिणाम दिसून येताच कर्ज वसुली वाढविणेकरिता मुख्य कार्यालय व तालुकास्तरावर दरमहा कर्ज वसुलीकरिता विशेष सभा घेण्यात आल्या. व मोठे थकबाकीदारांच्या वसुलीचा आढावा घेण्यात आला. यासोबतच ट्रॅक्टर, जीप व इतर वाहनांवरील कर्जवसुलीसाठी प्रभावीपणे मोहिम

घेऊन कर्ज वसुलीची मोहीम राबविण्याकरिता जिकरीचे प्रयत्न करण्यात आले. या प्रयत्नामुळे बँकेची वसुली मागील वर्षापेक्षा ९ टक्केनी वाढली आहे. हे जरी खरे असले तरी एवढ्याच वसुलीवर समाधान मानने योग्य होणार नाही, कारण नाबार्डचे धोरणाप्रमाणे वसुली शिस्त पाळणेकरिता जून अखेर कर्जवसुली ७०टक्के होणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील पीक परिस्थिती समाधानकारक नसतानाही वसुली यंत्रणेने प्रयत्न करून वसुली वाढविण्यास हातभार लावला आहे. कोही निरक्षक व वसुली अधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेऊन चांगली कामगिरी बजावली आहे. विशेष परिश्रम घेऊन वसुलीत वाढ करणाऱ्या वसुली अधिकाऱ्याचे नितीधैर्य वाढविणे व मनोबल उंचावणे ही काळाची गरज बनली आहे. याकरिता कर्ज वसुलीचे उत्कृष्ठ काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना "विशेष बक्षिस" देण्यांत यावे, असे वाटते.

विषयावरील चर्चेत मा.श्री. बोरा, मा.श्री. गुजर, मा.श्री. शहाणे, मा. श्री. तावडे यांनी भाग घेतला. सभेत तालुकावाईज माहिती देण्यात आली. त्यावरून ज्या तालुक्याचे मागील वर्षापेक्षा कर्जवसुलीचे प्रमाण ७०टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा ठिकाणी विशेष बक्षिस देण्याबाबत विचार व्हावा असे सभेचे मत पडले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन कर्ज वसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांचे मनोबल उंचावणे व नितीधैर्य वाढविणेकरिता ज्या तालुक्याचे मागील वर्षापेक्षा कर्ज वसुलीचे प्रमाण ७०टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशा ठिकाणी विशेष बक्षीस देण्यात यावे असे ठरले. तसेच बक्षिसाचे स्वरूप वस्तुरूप किंवा रोख किती रक्कमेपर्यंत असावे याबाबतचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे. असेही ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७८- मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७८(१) - सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या मुख्य हिशोबनिस या पदावर नियुक्ती करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७८(२) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे मुख्य हिशोबनिस या पदावर काम करीत असलेले अधिकारी वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यामुळे जून २००० मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. रिक्त झालेल्या पदावर काम करणेसाठी रिझर्व बँकेतील/भारतीय स्टेट

बँकेतील/राष्ट्रीयकृत बँकेतील सेवानिवृत्त अधिकारी निवडावा अशी चर्चा दिनांक ३०.७.२००० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापक समितीचे सभेत झाली. त्या अनुषंगाने रिझर्व बँक/भारतीय स्टेट बँक/राष्ट्रीयकृत बँक येथील नुकतेच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती घेवून अनुभवी अधिकाऱ्याची निवड करणे योग्य राहिल असे वाटते.

विषयावर मा. श्री. बेग, श्री. तायवाडे, श्री. पन्नासे, श्री. गुजर, श्री समर्थ मा. अध्यक्ष व इतरही संचालकांनी चर्चा केली. आपल्या बँकेतील मुख्य हिशेबनिसाचे जागेवर काम करणेसाठी बँकेतील अधिकारी तयार करणेकरिता केलेल्या प्रयत्नास अपेक्षित यश न आल्याने रिझर्व बँक/स्टेट बँक ऑफ इंडिया राष्ट्रीयकृत बँक येथील नुकतेच सेवानिवृत्त झालेले अधिकारी बोलावून बँकेचे मुख्य हिशेबनिसाचे पदावर काम करणेसाठी योग्य अधिकारी नियुक्त करावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेत "मुख्य हिशेबनिस" या पदावर काम करण्यासाठी रिझर्व बँक/स्टेट बँक ऑफ इंडिया/राष्ट्रीयकृत बँका येथील नुकतेच सेवानिवृत्त झालेले अधिकारी यामधून योग्य अधिकारी नियुक्त करावा असे ठरले. याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १८(२) - महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४२ अंतर्गत कृषि व ग्रामीण विकास बँक (भुविकास बँक) म्हणून काम करण्यास सहकार खात्याने जिल्हा बँकेस दिलेल्या परवानगीचे मुदतवाढ मंजुरीबाबत सहकार खात्यास विनंती करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १८(२) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की दि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. नागपूर या बँकेस महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४२ नुसार कृषि व ग्रामीण विकास बँक (भुविकास बँक) म्हणून काम करणेस मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या परवानगीची मुदत दिनांक ८.१०.२००० रोजी संपत आहे. शेती व बिगर शेती, मध्यम व दिर्घ मुदती प्रकल्पांतर्गत पतपुरवठा करण्याचे दृष्टीने सदर परवानगीस मुदतवाढ घेणे आवश्यक असल्याने व दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमी., यांनी दिनांक २९.६.२००० रोजीचे पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सदर परवानगीची मुदतवाढ मिळणेसाठी

मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे योना ठरावाचे सहप्रतीसह प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लिमी, नागपूर या बँकेस महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १४२ अनुसार कृषि व ग्रामीण विकास बँक (भुविकास बँक) म्हणून काम करणेसाठी दिलेल्या परवानगीची मुदत पुढील दहा वर्षाकरिता वाढवून देण्याबाबत मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे योना विनंती करण्यात यावी. व याकरिता ठरावासह प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १४(उ) - विविध प्रकल्पाअंतर्गत शासनाने भूसंपादनाकरिता घोषित केलेल्या परंतु यथास्थितीत शेतकऱ्यांचे ताब्यात असलेल्या जमीनीवर कर्ज परत फेडीची हमी घेवून पिक कर्ज वाटप करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १४(उ) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्ह्यातील प्रकल्पांतर्गत शासनाने भूसंपादनाकरिता जमीनी घोषित केल्या आहेत. परंतु घोषित केलेल्या सर्वच जमीनी शासनांकडून एकाच वेळी ताब्यात न घेता आवश्यकतेनुसार क्रमाक्रमाने शेतकऱ्यांचे जमीनीचा ताबा घेवुन त्याप्रमाणे आर्थिक मोबदला देण्यात येतो. भूसंपादनासाठी शासनाने घोषित केलेल्या जमीनी शासनाने ताब्यांत न घेतल्याने शेतकरी त्या जमीनीतून उत्पादन घेत असतो. परंतु अशा जमीनीवर त्या शेतकऱ्यास बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचा लाभ घेता येत नाही. कारण अशा जमीनीवर कर्जाचा बोजा नोंदविला जात नाही व सामुळे बँकेला त्या जमीनीवर कर्जवाटप करता येत नाही. अशा जमीनीमध्ये उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांची बँकेकडे वारंवार कर्जमागणी होत आहे. शासनाने भूसंपादनासाठी घोषित केलेल्या जमीनीवर झालेल्या कर्जवाटपाच्या परतफेडीबाबत मा० जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी योनी हमी दिल्यास अशा सभासदांना फक्त पिक कर्ज उपलब्ध करून देणे शक्य होईल असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन भूसंपादनाकरिता शासनाने घोषित केलेल्या जमीनीवर शेतकऱ्यांना केलेल्या पिक कर्जाची परतफेड शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्यातून प्राधान्याने करून देण्याबाबत

मा. जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी यांनी हमीपत्र दिल्यास अशा सभासदांना फक्त पिक कर्ज उपलब्ध करुन देण्यांत यावे असे ठरले. याकरिता भूसंपादनासाठी घोषित केलेल्या जमिनीवर शेतकऱ्यांना दिलेल्या पिक कर्जाची परतफेड शेतकऱ्यांना मिळावयाच्या मोबदल्यातून प्राधान्याने करुन देण्यांत येईल अशा आशयाचे हमीपत्र मा.जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी यांनी देणेबाबत विनंती प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यांत यावा, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १४(४) - ग्राम कोऑपरेटीव्ह स्टोअर्स लिमी. हिंगणा या अवसायनांत गेलेल्या संस्थेचे शेअरस रक्कम परत करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १४(४) - मा० अध्यक्ष यांनी सांगितले की, ग्राम कोऑपरेटीव्ह स्टोअर्स लिमी. हिंगणा ही संस्था अवसायनांत असून संस्थेचे अवसायकांनी संस्थेचे बँकेत असलेले शेअर्सची रक्कम परत मिळावी म्हणून मागणी केली आहे. संस्थेकडे बँकेचे कोणतेही कर्ज नाही. म्हणुन अवसायकाने केलेल्या विनंतीनुसार शेअर्सची रक्कम रुपये १००/— परत करणेस कांहीच हरकत नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होउन ग्राम कोऑपरेटीव्ह स्टोअर्स मर्या. हिंगणा या संस्थेचे अवसायकाने मागणी केल्यानुसार संस्थेचे शेअर्स रक्कम रुपये १००/- परत करण्यांत यावी व संस्थेचे बँकेत असलेले सभासदत्व रद्द करण्यांत यावे तसेच संबंधितांना याबाबत कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १४(५) - सेवा सोसायटी/विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष व गटसचिव यांचा सत्कार करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १४(५) - शेतकऱ्यांचे मागणीनुसार पिक उत्पादनाकरिता कर्जवाटप केल्यानंतर कर्जवसुली होण्यावर बँकेची यशस्वी वाटचाल अवलंबून आहे. याकरिता कर्जवसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अथक परिश्रमाची जोड आवश्यक आहे. १९९९-२००० या वर्षात पिक-परिस्थिती समाधानकारक नसतांनाही मागील वर्षीपेक्षा कर्जवसुलीचे प्रमाण वाढलेले आहे. अशा तालुक्यातील अधिकाऱ्यांना

त्यांचे निलोर्थैर्य वाढविणे व मनोबल उंचावणे याकरिता विशेष बक्षिस देण्यात यावे असा निर्णय ठराव क्र. ७० प्रमाणे झाला आहे. विषयाचे अनुषंगाने चर्चा करतांना मा. श्री. र. गो. बेग, संचालक यांनी कर्जवसुलीमध्ये बँकेचे वसुली अधिकारी यांचा हातभार आहे हे खरे आहे. परंतु त्याच बरोबर कर्जवसुली वाढविण्यासाठी सेवा/विविध कार्य. संस्थेचे सचिव यांचाही हातभार आहे. म्हणून बँकेच्या अधिकाऱ्यासोबतच त्या सहकारी संस्थेचे अध्यक्ष व गटसचिव यांनाही बक्षिस देण्यांत यावे व संस्थेच्या अध्यक्षां च्या जिल्हा स्तरावर सत्कार घेण्यात यावा अशी सुचना केली. या सुचनेला श्री. अ. य. गुजर यांनी दुजोरा दिला. यावर मा. अध्यक्ष यांनी आपली सहमती दर्शविली.

विषयावर सविस्तर चर्चेअंती बँकेचे अधिकाऱ्यासोबतच त्या संस्थेचे गटसचिव यांना बक्षिस देण्यात यावे व अध्यक्ष यांचा सत्कार करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १४(६) - बँकेचे मा. संचालकांच्या दौरा कार्यक्रम आयोजित करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १४(६) - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने श्री अ. रा. गुप्ता म्हणाले की, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक या राज्यात दौरा आयोजित करण्यांत यावा. मा. श्री र. गो. बेग यांनी श्री गुप्ता यांचे मतास दुजोरा दिला. मा. संचालकांच्या दौरा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा याकरिता इतरही संचालकांनी संमती दर्शविली. मा. संचालकांनी केलेल्या सुचनेचा विचार करुन आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, केरळ व आसाम या राज्यांत दौरा कार्यक्रम आयोजित करण्यांत येईल असे सांगितले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, आसाम ह्या राज्यात मा. संचालकांचा अभ्यास दौरा करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

सभेचे शेवटी मा. अध्यक्ष यांनी बँकेची वार्षिक साधारणसभा दि. १६ ऑगस्ट २००० रोजी घेण्यात येईल असे सांगितले. यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेस उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(signature) सरव्यवस्थापक

(signature) अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमि: नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा सोमवार दि. १४।८।[illegible]
रोजी सकाळी ११.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव
देशपांडे स्मृती सभागृहात" बँकेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील केदार यांचे
अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालिल मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थीत –

१. मा. श्री. सुनील केदार — अध्यक्ष
२. मा. सौ. आशाताई महाजन — उपाध्यक्षा
३. मा. श्री. र. पां. गावंडे — संचालक
४. मा. श्री. र. गो. बेग — "
५. मा. श्री. भा. चं. सहाणे — "
६. मा. श्री. अ. रा. गुप्ता — "
७. मा. श्री. व. भा. वाढे — "
८. मा. श्री. अ. य. गुजर — "
९. मा. श्री. चं. ल. कोल्हे — "
१०. मा. श्री. सं. ळि. चोरे — "
११. मा. श्री. शा. ग. घवड — "
१२. मा. श्री. वि. रा. हुलके — "
१३. मा. श्री. ना. र. ओमकाटे — "
१४. मा. श्री. ग. के. भालेर — "
१५. मा. श्री. ओ. वि. निमजे — "
१६. मा. श्री. र. व्यं. निमजे — "
१७. मा. श्री. ब. भा. तायवाडे — "
१८. मा. श्री. मु. त्रि. पलासे — "
१९. मा. श्री. अ. सं. धार्मिक — "
२०. मा. श्री. व. क. पाराशिवनीकर — "
२१. मा. श्री. चं. तु. समर्थ — "
२२. मा. सौ. स्मिताताई कुंभारे — संचालीका
२३. मा. सौ. कुसुमताई किंमतकर — "
२४. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर
२५. मा. श्री. ए. ल. जी. चौधरी — कर्मचारी प्रतिनिधी
२६. मा. श्री. व्ही. जी. शहाणे — "
२७. मा. श्री. ए. एन. चौधरी — सरव्यवस्थापक

---

- अनुपस्थित -

१. मा. श्री. आ. र. देशमुख संचालक

२. मा. श्री. वि. जा. राहुल "

३. मा. श्री. नि. वि. निमजे "

४. मा. श्री. सु. बा. देशमुख, प्रतिनिधी, महा. राज्य सह. बँक लिमी. मुंबई.

५. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

६. मा. विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (बँक) नागपूर.

७. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.

८. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक मर्या., विभागीय कार्यालय, नागपूर.

---

सभेला अनुपस्थित असलेले मा. श्री. आ. र. देशमुख, मा. श्री. वि. जा. राहुल व मा. श्री. नि. वि. निमजे संचालक यांचे सभेतील अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजूर करण्यांत आली.

यानंतर उपस्थितांचे स्वागत करून विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस मा. अध्यक्ष महोदयांनी सुरूवात केली.

विषय क्रमांक १ - मागिल सभा दिनांक १८.७.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १८.७.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ - मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मा. सरव्यवस्थापक यांनी मागिल दिनांक १८.७.२००० रोजीचे सभेचे पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती दिली. कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - महाराष्ट्र कृष्णा व्हॅली डेव्हलेपमेंट कारपोरेशनचे बॉंड खरेदी करणे करीता केलेल्या सक्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. सभेत विषयावर चर्चा होऊन महाराष्ट्र कृष्णा व्हॅली डेव्हलपमेंट कारपोरेशन मध्ये रूपये १०.०० कोटी गुंतवायचे असल्याने व नजिकच्या काळात मा. संचालक -

मंडळाची सभा नसल्याने दिनांक २८।७।२०००रोजी सर्क्युलर ठराव करून रुपये १०.०० कोटी गुंतविण्यांत आले. याकरिता दिनांक २८.७.२००० रोजी खालील प्रमाणे करण्यांत आलेल्या सर्क्युलर ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

— सर्क्युलर ठराव —

"महाराष्ट्र कृष्णा व्हॅली डेव्हलपमेंट कार्पोरेशनमध्ये सहकारी बँकांनी गुंतविलेल्या निधीस व त्यावरील व्याजाला शासनाने हमी दिलेली असून शासनाने त्यांचे पत्र क्र.-युआरबी.१०९९/प्र.क.८०४/७-स दि.१७ऑक्टोबर १९९९ ला कृष्णा व्हॅली डेव्हलपमेंट कारपोरेशनचे रोख्यांत जास्तीत जास्त निधी गुंतविणेकरिता सूचना दिलेल्या आहेत. सदर बाँडवर १२.८०टक्के प्रमाणे व्याज दर असून व्याजाची रक्कम अर्धवार्षिक मिळणार आहे. सदर बाँडमध्ये गुंतविलेला निधी बँकींग रेग्युलेशन ॲक्टनुसार मान्यताप्राप्त रोखे या स्वरूपात येत असून हे रोखे नॉन एस.एल.आर.मध्ये गणल्या जाणार आहेत. तरी महाराष्ट्र कृष्णा व्हॅली डेव्हलपमेंट कारपोरेशनचे रोख्यांत रुपये १०.०० करोड (अक्षरी रुपये दहा करोड) एवढी रक्कम गुंतविण्यास मंजूरी देण्यांत येत आहे याकरिता आवश्यक दस्तऐवजांवर सह्या करण्याचे अधिकार मा० अध्यक्ष, व सरव्यवस्थापक/व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे."

सर्क्युलर ठराव घेऊन करण्यांत आलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ६ – बँकेच्या दिनांक १६।८।२०००रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभेकरिता प्रतिनिधींकडून आलेल्या सूचनांची नोंद घेणे.

ठराव क्रमांक ६– मा.अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयाचे अनुषंगाने मा०सरव्यवस्थापक यांनी सभेला माहिती देतांना सांगीतले की, दिनांक १६.८.२००० रोजी होणाऱ्या वार्षिक साधारण सभेची नोटीस व अहवाल सभासदांना दिनांक २९.७.२०००रोजी पोष्टाचा दाखला घेऊन पाठविण्यांत आले. तसेच "जनवाद" ह्या मराठी दैनिकाचे दिनांक ३१.७.२००० रोजीचे अंकात बँकेच्या वार्षिक साधारण सभेची नोटीस प्रसिध्द करण्यांत आली आहे. या नोटीसमध्ये वार्षिक साधारण सभेच्या विषय पत्रिकेवरील विषयावर अधिकची माहिती अगर स्पष्टीकरण पाहिजे असल्यास त्याची सूचना मुख्य कार्यालयास दिनांक १०.८.२००० पर्यंत लेखी देण्याबाबत तसेच यानंतर येणाऱ्या सूचनांवर विचार करणे बँकेला बंधनकारक राहणार

नाही, असे कळविण्यांत आले होते. या मुदतीत कोणताही संस्था प्रतिनिधि कडून व वैयक्तिक सभासदांकडून लेखी स्वरूपात सुचना प्राप्त झाली नाही.

विषयाचे अनुषंगाने सभेत चर्चा होऊन सभेत कार्यालयीन माहितीची नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ५ - सन २००० - २००१ करीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्पमुदती शेती पिक कर्ज मर्यादा रुपये १६.०० कोटी मंजूर करण्यांत आलेल्या मंजूरी पत्राप्रमाणे नियम व अटी स्विकृत करण्यास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे पत्र क्र. सीएफए/ओपीआर/एफ-२३/५८३ दिनांक ६।७।२००० नुसार सन २०००-२००१ करिता मंजूर झालेल्या रुपये १६.०० कोटीचे अल्पमुदती शेती पिक कर्ज मर्यादेवर उचल करण्यासाठी राज्य बँकेने कळविलेल्या नियम व अटींना मान्यता देऊन खालीलप्रमाणे करण्यांत आलेल्या ठरावास मान्यता देण्यांत येत आहे.

## - RESOLUTION -

Resolved that the terms and condition laid down by the Maharashtra State Cooperative Bank Ltd, (Incorporating the Vidarbh Cooperative Bank Ltd.) Mumbai vide letter No. CFA/OPR/F-23/583/2000-2001 Dated 6th July, 2000 for the credit limit of Rs.1600.00 lakhs (Rs. Sixteen hundred lakhs only) sanctioned to this bank for financing seasonal Agricultural operations under pooled Rate scheme for the year 2000-2001 be and are hereby accepted.

Further, resolved that anyone of the following office bearers from Group "A" alongwith anyone from officers from Group "B" are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of Loan from the limit of Rs.1600.00 lakhs only sanctioned for short-term seasonal Agricultural Credit Limit for the year 2000-2001.

Further, resolved that anyone of the office

bearers from Group "A" alongwith anyone from the officer from Group "B" are hereby authorised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank Ltd, Nagpur creating first charge on the pronotes of the Agricultural Credit Societies and act as custodian of the said pronotes on behalf of the Maharashtra State Cooperative Bank Ltd. (Incorporating the Vidarbh Cooperative Bank Ltd.) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of this Bank in favour of the Maharashtra State Cooperative Bank Ltd. (Incorporating the Vidarbh Cooperative Bank Ltd.) Mumbai as collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this Bank.

1) Chairman } Group "A"
2) Vice chairman }
3) General Manager — Group "B"

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ - बँकेच्या कर्मचाऱ्यांना देण्यांत येणारे वाहन कर्ज त्यांचे सेवाकाळांत किती वेळा द्यावे याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतील कर्मचाऱ्यांना सवलतीच्या व्याजदराने मोटर सायकल/स्कूटर/सायकल खरेदी करिता कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यानंतर कर्ज देण्यांत येते. परंतु कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवाकाळांत वाहन खरेदी करिता किती वेळ कर्ज द्यावे याबाबत सध्याचे कर्मचारी वाहन कर्ज धोरणांत उल्लेख नाही. तरी सर्वसाधारण परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवाकाळांत वाहन खरेदीसाठी किती वेळा कर्ज द्यावे याबाबत सभेत निर्णयाकरिता विषय आलेला आहे. विषयावर चर्चा करतांना कर्मचारी प्रतिनिधी श्री. एल॰ जी॰ चौधरी म्हणाले की, कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवाकाळांत जास्तीत जास्त तीन वेळा सवलतीच्या व्याजदराने वाहन खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यांत यावे. यावर मा॰ श्री॰ गु॰ श्री॰ पन्नासे यांनी कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवाकाळांत जास्तीत

जास्त तीन वेळा वाहन खरेदीसाठी जरूर कर्ज उपलब्ध करून द्यावे. परंतु पहिल्या वाहनाची कर्ज परतफेड पूर्ण झाल्यानंतर दुसरे वाहन खरेदी करणेसाठी कर्ज द्यावे अशी सुचना केली. मा.श्री. पारशिवनिकर म्हणाले की, कर्मचाऱ्यांना तीनपेक्षा जास्त वेळा वाहन खरेदी करायचे झाल्यास त्यांचेकडील वाहन कर्जाची पूर्ण परतफेड झाल्यानंतर सर्वसामान्य दराने कर्ज उपलब्ध करून देण्यांत यावे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सर्व साधारण परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्याला सवलतीच्या व्याजदराने मोटार सायकल/स्कुटर/सायकल खरेदी करणेकरिता त्यांचे सेवाकाळांत जास्तीत जास्त तीन वेळा कर्मचारी वाहन कर्जाचे धोरणाप्रमाणे कर्ज देण्यांत यावे. तथापी अगोदर घेतलेल्या वाहन कर्जाची व्याजासह पूर्ण परतफेड केलेली असावी. तीनपेक्षा जास्त वेळा वाहन खरेदी करावयाचे झाल्यास त्याकरिता सवलतीचा व्याज दर लागू राहणार नाही. अशा अर्जावर ग्राहकोपयोगी कर्जाचा व्याजदर लावण्यात येईल असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७ - मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ७(१) - मौदा तालुक्यातील सन १९९७-९८च्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी घोषित "पिक कर्ज व्याज माफ" व "पिक कर्ज विमा" योजनेची लाखो रूपयाची रक्कम नागपूर जील्हा मध्यवर्ती सहकारी बँक व शासकीय यंत्रणेने शेतकऱ्यांना वाटप न करता परस्पर हडप केल्याबाबत श्री. अशोक झाडे जिल्हा परिषद सदस्य यांनी केलेल्या खोट्या तक्रारी विरुध्द त्यांच्येवर अब्रुनुकसानीच्या फौजदारी व दिवाणी [illegible] दावा दाखल करण्याबाबत.

ठराव क्रमांक ७(१) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मौदा तालुक्यातील सन १९९७-९८च्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी घोषित "पिक कर्ज व्याज माफ" व पिक कर्ज विमा योजनेची लाखो रूपयाची रक्कम नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व शासकीय यंत्रणेने शेतकऱ्यांना वाटप न करतां परस्पर हडप केल्याबाबत आपले बँकेविरुध्द आरोप करून दिनांक २३-६-२००० रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे तक्रार करून बँकेवर कडक कारवाई करण्याची विनंती केली आहे. सदर तक्रारीची प्रत मा. मुख्यमंत्री यांना देखिल पाठविली आहे. त्यांनी मा. जिल्हाधिकारी ह्यांचेकडे केलेल्या तक्रारी संबंधाने प्रसंगांत

केलेल्या तक्रारी संबंधाने प्रत्यक्षांत चौकशी करण्यांत आली आहे. श्री अशोक झाडे यांनी केलेली तक्रार व बँकेवर लावलेले आरोप पूर्णतः निराधार असून तथ्यहीन असल्याचे प्रत्यक्षांत केलेल्या चौकशीत आढळून आले आहे. श्री अशोक झाडे यांनी केलेली तक्रार व बँकेवर लावलेले आरोप संपूर्णतः निराधार असून तथ्यहीन असल्याचे प्रत्यक्षांत केलेल्या चौकशीत आढळून आले आहे. श्री अशोक झाडे यांनी सत्य परिस्थिती जाणून न घेता हेतुपुरस्कर बँकेविरुध्द खोटे आरोप लावून बँकेची बदनामी करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळे श्री अशोक झाडे यांचे विरुध्द अब्रुनुकसानीबाबत दिवाणी व फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत यावा. जेणेकरून यानंतर बँकेची सत्यपरिस्थिती जाणून न घेता हेतुपुरस्कर निरर्थक आरोप करणाऱ्यांवर आळा बसेल असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेविरुध्द खोटे व निरर्थक आरोप करणाऱ्यांना आळा बसावा यासाठी श्री अशोक झाडे, सदस्य, जिल्हा परिषद नागपूर यांनी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक २३.६.२००० रोजी केलेल्या खोट्या तक्रारी विरुध्द त्यांचेवर अब्रुनुकसानीचा फौजदारी व दिवाणी दावा दाखल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष व सरव्यवस्थापक/व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(२) - नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागांत आयोजित करण्यांत येणाऱ्या नेत्रशल्य शिबीराकरिता आर्थिक मदत देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(२) - शासनाचे सहकार्याने टेक्नीक सेवेद्वारे नागपूर जिल्ह्यांत नेत्रशल्य शिबिर घेतली जातात. सन २०००-२००१ या वर्षी सुध्दा नेत्रशल्य शिबीर आयोजित करणार आहेत. नेत्रशल्य शिबिरांतील पेशंट आणि त्यांचे सोबत असणारी व्यक्ती यांना जेवणाचा खर्च साधारणतः रुपये१०/- प्रती पेशंट येतो. हा खर्च भागविण्याकरिता बँकेनी मदत करावी म्हणून माननीय जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक २८.७.२०००चे पत्र क्रमांक पी.ए./१५१/२००० अन्वये बँकेकडे पत्र पाठवून विनंती केली आहे. याबाबत मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती दिली.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन आयोजित केलेल्या नेत्रशल्य शिबिराकरिता बँकेतर्फे आर्थिक मदत देण्यात यावी. तथापी या शिबिराकरिता अंदाजित येणारा खर्च मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून अवगत करण्यात यावा व त्यानंतर नेत्रशल्य –

शिबीराकरिता मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे करावयाची आर्थिक मदत पाठविण्यांत यावी याबाबतचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांलेयेत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ७(३) - बँकेच्या उत्तरोत्तर प्रगतीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या विविध पुरस्काराबाबत माहिती देणेबाबत.

ठराव क्रमांक ७(३) - मा. अध्यक्ष यांनी बँकेच्या उत्तरोत्तर प्रगतीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या विविध पुरस्काराबाबतची माहिती सभेला दिली.

१) आपल्या बँकेला दि इंडियन इकानॉमिकल डेव्हलपमेंट अँड रिसर्च असोसिएशन, न्यु दिल्ली यांनी इन्डीव्हीज्युअल अचीव्हमेंट अँड नेशन बिल्डींग ह्यावर बँकेची सर्वकश प्रगती विचारांत घेवुन दिनांक २३.६.२००० रोजी नवी दिल्ली येथे आयोजित ९६ व्या नॅशनल सेमिनारमध्ये मा. श्री सुरेश प्रभू, केंद्रिय रासायनिक व खत मंत्री, भारत सरकार ह्यांचे हस्ते राष्ट्रीय सन्मान पुरस्कार व ट्रॉफी देण्यात आली.

२) महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटीव्ह बँकस् असोसिएशन, मुंबई यांचेवतीने दरवर्षी देण्यांत येणाऱ्या पारितोषीकासाठी या वर्षी आपल्या बँकेची विदर्भ विभागातून प्रथम पारितोषीकाकरिता निवड झाली आहे.

३) युवक मुद्रा राज्यस्तरीय सहकारी बँका प्रतियोगितेमध्ये ९८-९९ या आर्थिक वर्षाचे कामगिरीवर आधारीत महाराष्ट्र राज्यातील संपूर्ण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामधून आपल्या बँकेला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

बँकेला मिळालेल्या पुरस्काराबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

विषय क्रमांक ७(४) - मा. संचालकांना भेटवस्तू देण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७(४) - मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने माननीय श्री. र. व्यं. निमजे यांनी बँकेच्या संचालकांना सन १९९८-१९९९ व १९९९-२०००-ची भेटवस्तु देण्यांत आली नाही. तरी बँकेने माननीय संचालकांना सन १९९८-१९९९ व १९९९-२००० या वर्षाची भेटवस्तू देण्यांत यावी अशी सुचना केली. मा. संचालकांना भेटवस्तू देणेबाबतचे

सुचनेला मा. श्री. अ. रा. गुप्ता यांनी अनुमोदन दिले.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचे मा. संचालकांना एका वर्षास रुपये300/- (अक्षरी रुपये तिनशे फक्त) प्रमाणे सन १९९८-१९९९ व सन १९९९-२००० या दोन वर्षाकरिता भेटवस्तु देण्यात यावी. ही भेटवस्तु मा० संचालकांनी स्वत: खरेदी करावी. सन १९९८-१९९९ व सन १९९९-२०००चे वेगवेगळे बील बँकेस सादर करावे. एका वर्षाकरिता भेटवस्तु रुपये300/- पेक्षा जास्त किंमतीची असल्यास बँक फक्त रुपये300/- देईल. उर्वरित रक्कम संचालकांनी स्वत: अदा करावी लागेल. असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेस उपस्थितांचे आभार मानून मा० अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

मुख्यव्यवस्थापक                अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लिमी. नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा सोमवार दिनांक ३०.१०.२[illegible]रोजी सकाळी ११.००वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयांतील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत" बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

– उपस्थित –

| | |
|---|---|
| १. मा.श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. मा.सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा.श्री र.पां. गावंडे | संचालक |
| ४. मा.श्री. र. गो. बंग | ,, |
| ५. मा.श्री. प्रा.चं. शहाणे | ,, |
| ६. मा.श्री. अ.रा. गुप्ता | ,, |
| ७. मा.श्री. व. श्या. वांढे | ,, |
| ८. मा.श्री. अ. य. गुजर | ,, |
| ९. मा. श्री. चं. ल. कोतले | ,, |
| १०. मा. श्री. आ. र. देशमुख | ,, |
| ११. मा. श्री सं. वि. चोरे | ,, |
| १२. मा. श्री. शा. ग. धवड | ,, |
| १३. मा. श्री. वि. रा. हुलके | ,, |
| १४. मा. श्री. ना. र. जीभकाटे | ,, |
| १५. मा. श्री. वि. आ. राऊत | ,, |
| १६. मा. श्री वि. वि. निमजे | ,, |
| १७. मा. श्री. ग. के. शाहीर | ,, |
| १८. मा. श्री. मो. वि. निमजे | ,, |
| १९. मा. श्री. र. व्यं. निमजे | ,, |
| २० मा. श्री. ब. आ. तायवाडे | ,, |
| २१. मा. श्री. मु. त्रि. पन्नासे | ,, |
| २२. मा. श्री. अ. बा. धार्मिक | ,, |
| २३. मा. श्री. ज. क. पारशिवनीकर | ,, |
| २४. मा.श्री. चं. तु. समर्थ | ,, |
| २५ मा. सौ. कु. ग. किंमतकर | संचालिका |
| २६ मा. सौ. सिताताई कुंभारे | ,, |
| २७. मा. श्री. वि.जी. शहाणे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २८ मा. श्री. ह. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

१. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर.
२. मा. श्री सु.बा. देशमुख, प्रतिनिधी, म.रा.स. बँक मर्या. मुंबई
३. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
४. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (बँक), नागपूर.
५. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
६. मा. विभागीय अधिकारी, म.रा. सह.बँक मर्या. विभागीय कार्यालय, नागपूर.
७. मा. श्री. एल.जी. चौधरी, कर्मचारी प्रतिनिधी

---

मा. अध्यक्ष यांनी सभेचे कार्यवाहीस सुरुवात करणेअगोदर सभेला उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या व त्यानंतर विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्रमांक १ – मागील दिनांक १६.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा करतांना मा. श्री पारशिवनीकर, संचालक म्हणाले की, नेत्रशल्य शिबीरा करिता बँकेनी आर्थिक मदत केली असल्यामुळे नेत्रशल्य शिबीराचे ठिकाणी दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., नागपूरचे सौजन्याने असा बॅनर लावण्यांत यावा. यावर सभेतील सर्व संचालकांनी मा. श्री. पारशिवनीकर यांनी सुचविल्याप्रमाणे नेत्रशल्य शिबीराचे ठिकाणी बँकेचा बॅनर लावण्यांत यावा याकरिता भावना व्यक्त करुन अनुमोदन दिले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १५.८.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ – मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक २ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक १६.८.२००० रोजीच्या सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यांत माहिती बँकेचे सरव्यवस्थापक यांनी सभेला दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ – किसान क्रेडीट कार्ड योजना राबविणेकरिता फेरविचार करणे.

ठराव क्रमांक ३ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. व सभेला माहिती देतांना

सांगितले की, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा अधिक सुलभतेने व तत्परतेने होण्याचे दृष्टीने शासन निर्णयानुसार त्यांचे पत्र दिनांक २०.२.१९९९ नुसार सन १९९९-चे खरीप हंगामापासून प्रायोगीक स्तरावर किसान क्रेडीट कार्ड योजना राबविण्यांत आली. परंतु किसान क्रेडीट कार्ड योजना राबवितांना आलेल्या अडचणींवर दिनांक ६.६.२००० रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाचे सभेत विचार होऊन सदर योजना राबविण्याबाबत फेरविचार व्हावा म्हणून विनंती प्रस्ताव शासनाकडे पाठविला व त्याची एक प्रत राज्य बँकेला दिली त्यावर राज्य सहकारी बँकेने दिनांक ३१.७.२०००चे पत्र पाठवून तांत्रिक अडचणी सोडविणेकरिता खालील प्रमाणे सुचना केल्या आहेत.

१. जिल्हा बँकेच्या शाखेतील किसान क्रेडीट कार्डधारकांच्या व्यवहाराच्या नोंदी सभासदांच्या संस्थेकडील खात्यावर होणेसाठी कर्ज व्यवहार नोंदी ॲडव्हाईसेस शाखा पातळीवर घेऊन किमान आठवड्यातून एक वेळा गटसचिवांनी घेऊन जावे, अशी यंत्रणा बसविल्यास ॲडव्हाईसेस गहाळ होणार नाही. तसेच संस्थेच्या व शाखेच्या कर्जखात्यावरील नोंदीमध्ये तफावत राहणार नाही व नोंदी वेळीच पूर्ण होतील.

२. संस्था पातळीवर सभासदांना लागणारी खते, बी-बियाणे उधारीवर उपलब्ध करून देण्याची सोय असेल तर अशा संस्थांनी अशी सुविधा कर्जदारांना देऊन उधारीवर देण्यांत आलेल्या मालाची विक्री रक्कम पतधारकांच्या कार्ड खाते नांवे टाकता येईल.

३. शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार / सोयीनुसार / इच्छेनुसार पिकोत्पादनाकरीता कर्जरुपाने पैसा उपलब्ध करून देणे हा योजनेचा मुख्य हेतू आहे. त्यामुळे अडचणी व्यतीरिक्त इतर कोणताही मुद्यांवर फेरविचार होणार नाही व योजना राबविणेकरिता अधिक प्रयत्न करावे असे सुचविले आहे.

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी बँकेचे किसान क्रेडीट कार्ड योजना राबविणेकरिता फेरविचार करण्यासाठी पाठविलेल्या प्रस्तावाला उत्तर देतांना म्हटले आहे की, सध्या देशामध्ये मुक्त आर्थिक व्यवस्था सुरु झाली असून या व्यवस्थेमध्ये बँकांमध्ये चढाओढ निर्माण झाली आहे. किसान क्रेडीट कार्ड योजना दारोदारी पोहचविण्याची बँकांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे अशा परिस्थितीत सदर योजना मागे घ्यावी याकरिता बँकेनी केलेली विनंती बँकेच्या आर्थिक धोरणास हितावह होणार नाही. तसेच शासन निर्णयाच्या विरुध्दही होईल. तरी बँकेने शासनाचे धोरणानुसार सदर योजना त्वरित अमलांत आणून कार्यवाही करावी असे कळविले आहे. तसेच

यापूर्वीची रुपये ५०००/- कर्ज मर्यादा चालु वर्षी रुपये ३०००/- पर्यंत करुन शासनाने रुपये ३०००/- वा त्यापेक्षा जास्त कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना व टप्याटप्याने सर्वच शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्डवर कर्जवाटप करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

चालु वर्षात १४००० किसान क्रेडीट कार्ड वाटप करण्याचे शासनाने दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था नागपूर, मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर, नाबार्ड, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई, तसेच वेळोवेळी किसान क्रेडीट कार्डबाबत होणाऱ्या सत्रामधून सतत पाठपुरावा होत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. यांनी किसान क्रेडीट कार्ड योजना राबविण्याकरिता येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी केलेल्या सुचना मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेले मार्गदर्शन, किसान क्रेडीट कार्ड वाटपासाठी शासनाने दिलेले उद्दिष्ठ पूर्ण करण्याकरिता होणारा सततचा पाठपुरावा इत्यादी बाबी विचारांत घेता किसान क्रेडीट कार्ड योजना राबविण्यांत यावी असे ठरले. याकरिता जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून किमान ५ सहकारी संस्था किंवा जास्तीत जास्त कितीही सेवा सहकारी संस्थांचे चालु कर्जदार सभासदांना या योजनेनुसार किसान क्रेडीट कार्ड वाटप करता येईल, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ – सन २०००-२००१ च्या कर्ज वसुलीचा कृती कार्यक्रम मंजूर करणे.
ठराव क्रमांक ४ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, कर्जवाटप वाढविण्याचे दृष्टीने प्रयत्न होत असतांना कर्ज वसुली होणे आवश्यक आहे थकबाकीचे प्रमाण वाढू नये यासाठी कर्ज वसुलीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. सन २०००-२००१ च्या वर्षात सहकारी संस्थांकडून जास्तीत जास्त शेतकी कर्जाची वसुली करण्याचे दृष्टीने करावयाच्या आवश्यक कार्यवाहीबाबत तसेच कर्ज वसुलीशी संबंधीत कर्मचारी/अधिकारी, पदाधिकारी यांचेकडून अपेक्षित असलेल्या कार्यवाहीचा "कृती कार्यक्रम" (Action Plan) सभेच्या स्विकृतीकरिता ठेवला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेचा कर्ज वसुली कार्यक्रम

जोमाने राबवून बँकेची जास्तीत जास्त कर्जवसुली होणेसाठी सन २०००-२००१ ह्या वर्षाकरिता तयार करण्यांत आलेला कर्जवसुलीचा कृती कार्यक्रम (Action Plan) सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ५ - तालुक्याअंतर्गत असलेल्या बँकेच्या शाखांमधील जुन्या रेकार्डचे केंद्रीयकरण करण्याचे दृष्टीने तालुक्याचे ठिकाणी असलेल्या शाखेत तालुक्यातील शाखांचा जुना रेकार्ड ठेवण्याची व्यवस्था करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सखोल माहिती देतांना सांगीतले की, बँकेच्या कार्यरत असलेल्या १८ शाखा स्वमालकीच्या आहेत. उर्वरित शाखा किरायाचे इमारतीत आहेत. कांही शाखा कार्यालयीन रेकार्ड ठेवणेसाठी पुरेशी जागा नसल्याने शाखेतील जुना रेकार्ड व्यवस्थित ठेवणे अडचणीचे व गैरसोयीचे जाते. जुन्या रेकार्डची आवश्यकता भास-ल्यास जागेअभावी व्यवस्थित लावून न ठेवल्याने वेळेवर उपलब्ध होत नाही म्हणून बँकेच्या स्वमालकीच्या असलेल्या तालुक्याचे शाखा इमारतीत त्या तालुक्यांतील शाखांच्या या वर्षापासून ५ वर्षे जुना रेकार्ड ठेवण्याची व्यवस्था करावी असे वाटले. तालुक्याचे ठिकाणी असलेल्या स्वमालकीच्या इमारतीत त्या शाखेचा व त्या तालुक्यांतील इतर शाखांच्या जुना रेकार्ड व्यवस्थित लावून ठेवल्यास रेकार्ड शोधणे व उपलब्ध करून घेणे सोयीचे होईल. बुक बँलेसींग व समायोजनाचे कामाकरिता वेळीच रेकार्ड उपलब्ध होऊ शकेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन तालुक्याचे ठिकाणी असलेल्या बँकेच्या स्वमालकीच्या शाखा इमारतीत त्या शाखेच्या व त्या तालुक्यातील इतर शाखांच्या या वर्षापासून ५ वर्षे जुना रेकार्ड ठेवण्याची व्यवस्था करण्यांत यावी. रेकार्ड ठेवण्यासाठी रॅकसची व्यवस्था करण्यांत यावी. रेकार्ड ठेवण्याचे ठिकाणी शाखेल रेकार्ड लेबलींग करून रजिष्टर ठेवण्यांत यावे. या कामाची जबाबदारी त्या तालुक्याचे शाखा व्यवस्थापकावर टाकण्यांत यावी. शिवापूर तालुक्याचे ठिकाणी बँकेची स्वमालकीची इमारत नसल्याने त्या तालुक्यातील शाखांचा जुना रेकार्ड कुही तालुक्याचे शाखा इमारतीत ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६ - खाजगी वाहन खरेदीसाठी धोरण धोरन ठरविणेबाबत

विचार करणे.

ठराव क्रमांक ६ :- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सखोल माहिती देतांना सांगितले की, खाजगी वापरासाठी वाहन खरेदीकरिता सद्य: स्थितीत द.सा.द.शे.१६ व्याजदराने स्थायी संपत्ती तारणांत घेवुन बँककर्ज पुरवठा करित आहे. परंतु राष्ट्रियीकृत बँका, नागरी सहकारी बँका व इतर वित्तीय संस्था निरनिराळ्या योजना आखून कमी व्याजदराचे आमीष दाखवून खाजगी वाहनासाठी कर्जवाटपास ग्राहकांना आकृष्ठ करीत आहेत. यामुळे स्पर्धा निर्माण झाली आहे. म्हणून मुक्त अर्थव्यवस्थेमुळे निर्माण होत असलेल्या स्पर्धेत ग्राहकांना आपलेकडे आकृष्ठ करण्यासाठी बँकेचे सद्याचे प्रचलित धोरणांत बदल करून सुधारीत व सुलभ धोरण ठरवावे असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन खाजगी वाहन खरेदीसाठी खालील प्रमाणे सुधारित व सुलभ कर्ज धोरण ठरविण्यांत येत आहे असे ठरले.

लाभधारकाची पात्रता -- -

१. कर्जमागणी करणारा लाभधारक नागपूर जिल्ह्यातील रहिवासी असावा.

२. लाभधारक कर्जाची परतफेड मासिक हप्तेवारीने करु शकेल या हिशेबाने आर्थिकदृष्ट्या सक्षम असावा.

कर्ज मर्यादा ---

या योजनेअंतर्गत लाभधारकास त्याने नागपूर जिल्ह्यातील अधिकृत डिलरकडून सादर केलेल्या कोटेशनचे ९०टक्के रकमेपर्यंत त्याची कर्ज परतफेडीची क्षमता विचारांत घेवुन जास्तीत जास्त रुपये ५.०० लाख कर्ज रक्कम उपलब्ध करुन दिल्या जाईल. लाभधारकास १०% रक्कम कर्जमंजूरी नंतर स्वगुंतवणूक करावी लागेल.

लाभधारकाची परतफेडीची क्षमता ---

लाभधारकाची कर्ज परतफेडीची क्षमता खालीलप्रमाणे ठरविण्यांत येईल.

अ) व्यावसायिक व इतर लाभार्थी —

निव्वळ वार्षिक उत्पन्नाचे ३५% रक्कम.

ब) नोकरी करणारा लाभार्थी —

निव्वळ मासिक उत्पन्नाचे ३६% रक्कम. पती व पत्नी दोघेही नोकरीत असल्यास दोघांचे उत्पन्न विचारांत घेतल्या जाईल.

कर्जाची परतफेड —

कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ६० मासीक हप्त्यांत करावी लागेल. रुपये १.०० लाख कर्ज रकमेसाठी व्याज व इतर बाबी विचारांत घेवुन व्याजासह मासिक कर्जहप्ता रक्कम रुपये २२५०/- राहील. त्या

व्याजाचा दर द.सा.द.शे. १३.५० राहील. व्याज दरांत वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार बँकेला राहील.

कर्जाकरिता तारण —

अ) कर्जावरील वाहन बँकेला नजर गहाण करून द्यावे लागेल. या बाबतची नोंद आर.टी.ओ. कार्यालयांत वाहनाचे नोंदणी पुस्तकांत करून द्यावी लागेल.

ब) लाभधारक नोकरी करीत असल्यास व त्याचा पगार आपल्या बँकेमार्फत होत असल्यास बँकेतील त्याचे सदर खात्यातून दरमहा कर्जहप्ता परतफेडीची रक्कम वसूल करण्याबाबतचा अधिकार बँकेला देण्याबाबत संमतीपत्र द्यावे लागेल.

क) लाभधारकाचा पगार आपले बँकेमार्फत होत नसल्यास अशा नोकरदार अथवा व्यावसायिक लाभधारकांकडून कर्जाच्या संपूर्ण परतफेडीच्या दरमहाचे पोस्ट डेटेड चेक्स बँकेचे नांवाने आगावू घेण्यांत येईल.

याशिवाय खालील प्रमाणे तारण द्यावे लागेल.

१. लाभधारक नोकरीत असल्यास —

नोकरीतील कार्यालयीन प्रमुखाचे दरमहा पगारामधून कर्जहप्ता वसूल करून बँकेला देणे विषयी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ४९ अनुसार हमीपत्र द्यावे लागेल अथवा विमा पॉलीसीज/राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे/मुदती ठेवी/स्थावर मालमत्ता इत्यादि कर्ज रकमेपेक्षा जास्त किंमतीचे तारण बँकेला द्यावे लागेल.

२. लाभधारक व्यावसायिक असल्यास —

लाभधारक व्यावसायिक असल्यास पोस्ट डेटेड चेक्स बँकेच्या नांवाने आगावू घेण्यांत येईल त्याशिवाय कर्ज रकमेपेक्षा जास्त किंमतीची विमा पॉलीसीज/राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे/मुदती ठेवी/स्थावर मालमत्ता इत्यादि कर्ज रकमेपेक्षा जास्त किंमतीचे तारण बँकेला द्यावे लागेल.

३. कर्ज प्रकरणासोबत जोडावयाचे कागदपत्रे —

(१) लाभधारकाचे ओळखीकरिता कर्ज मागणी अर्जासोबत ड्रायव्हींग लायसन्स/निवडणूक ओळखपत्र/क्रेडीट कार्ड/पासपोर्ट/आयकर पॅन कार्ड इत्यादी पैकी कोणतेही कागदपत्र द्यावे लागेल.

(२) उत्पन्नाचा दाखला —

नोकरदार

अ) पगारदार असल्यास पगार स्लिप/पगाराचे प्रमाणपत्र.

ब) मागील सहा महिन्याचे बँक खात्याचे विवरण.

क) मागील २ वर्षाचा आयकर फार्म क्रमांक १६.

व्यवसायिक व इतर —

अ) व्यावसायीकांसाठी मागील ३ वर्षाची व्यवसायाची आर्थिक पत्रके, मागील सहा महिन्याचे बँक खात्याचे विवरण, मागील ३ वर्षाचे आयकर विवरण पत्र.

ब) तारणांत द्यावयाचे सेक्युरिटीज/मालमत्ता इत्यादि कागदपत्रे/स्थावर संपत्ती, घर असल्यास सेल डिड, टॅक्स रशिद व शेती असल्यास ७/१२, ८"अ".

क) व्यवसाय असल्यास व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र.

ड) भागीदारी फर्म असल्यास पार्टनरशिप डिड/नोंदणी पत्र.

कर्ज मागणी अर्ज —

कर्ज मागणी अर्ज बँकेचे मुख्य कार्यालयात रुपये ५०/- जमा करून मिळेल. अर्ज पूर्णपणे भरून आवश्यक कागदपत्रासह बँकेचे संबंधित शाखेत सादर करावा लागेल. शाखाधिकारी, अर्जदारास नामधारी सभासद करून घेवुन शिफारसीसह कर्ज प्रकरण बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे मा. कर्ज उपसमितीच्या मंजूरीसाठी पाठवेल.

शाखेकडून कर्ज वाटप —

मंजूरी पत्रांत कळविल्यानुसार व परिपत्रकांतील सुचनेनुसार आवश्यक कागदपत्रे तारणांत घेवुन सभासदांची स्वगुंतवणूक रक्कम व कर्ज रकमेचा एकत्र डिमांड ड्राफ्ट कोटेशननुसार डिलरचे नांवाने देईल.

विशेष अटी —

कर्ज वितरणाचे वेळी सभासदाला कर्ज रकमेच्या १टक्का सेवा शुल्क तसेच एका कर्ज हप्त्याची रक्कम आगावू भरावी लागेल.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ७:- वैयक्तीक पगाराचे बचत ठेव खात्यावर ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूरीचे धोरणांत सुधारणा करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ७:- मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, आपले बँकेमार्फत पगार होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे बचत ठेव खात्यावर जास्तीत जास्त रुपये १.०० लाख पर्यंत ओव्हर ड्राफ्ट मर्यादा मंजूर केली जाते. व सदर ओव्हर ड्राफ्ट मर्यादा वर्षाला २०% ने कमी करून वेळोवेळी करण्यांत येणाऱ्या नुतनीकरणाद्वारे ५ वर्षात वसुल केल्या जाते. त्याचप्रमाणे ज्यांचे सेवानिवृत्तीला ५ वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे त्यांची कर्ज वसुली ४ वर्षाकरिता २५% ने ३ वर्षाकरिता ३३% ने, २ वर्षाकरिता ५०% ने कर्जमर्यादा कमी करून वसुल केल्या जाते.

त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे पगार बँकेमार्फत होत असूनही व कर्जाची पूर्ण सुरक्षितता असतानाही सभासदाला मंजूर मर्यादेवर केवळ १ वर्षच व्यवहार करता येतो, व त्यानंतर प्रत्येक वर्षाला ओव्हर ड्राफ्ट मर्यादा २०% नी कमी कमी केली जाते. या सभासदांना मंजूर केलेल्या पूर्ण ओव्हरड्राफ्ट मर्यादेवर व्यवहार करता यावा यासाठी ओव्हरड्राफ्ट मर्यादा नियमांत व धोरणांत सुधारणा करावी, असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेमार्फत पगार होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कर्ज ठेव खालावरील ओव्हर ड्राफ्टद्वारे दिले जाणारे कर्जाची पूर्ण सुरक्षितता असल्याने मंजूर केलेल्या पूर्ण ओव्हर ड्राफ्ट मर्यादेवर व्यवहार करता यावा याकरिता वैयक्तिक पगाराचे कवच ठेव खात्यावर ओव्हर ड्राफ्ट मंजूरीचे धोरणांत व नियमांत खालील प्रमाणे सुधारणा करण्यास मंजूरी देण्यांत आली.

"ओव्हर ड्राफ्ट" कर्ज मर्यादा रक्कम ज्यांचे पगार आपले बँकेमार्फत होतात अशा कर्मचाऱ्यांनाच लागू असल्याने कर्जाची पूर्ण सुरक्षितता आहे त्यामुळे अर्जदाराला मागील सहा महिन्यांत मिळालेल्या निव्वळ पगाराचे बरोबरी रकमेचे १० पट किंवा जास्तीत जास्त रुपये १.०० लाख पर्यंत मर्यादा मंजूर करण्यांत यावी. या मर्यादेची मुदत १ वर्ष राहील. मात्र सभासदाने पुढील वर्षासाठी नुतनीकरणाची मागणी केल्यास नेहमीचे धोरणाप्रमाणे २०% मर्यादा कमी न करता मंजूर मर्यादे इतपत रकमेचे पुढील वर्षाकरिता नुतनीकरण मंजूर करण्यांत यावे. सभासदाचे पगारांत वाढ झाल्यास व सभासदाने वाढलेल्या पगाराप्रमाणे जास्त ओव्हरड्राफ्ट मर्यादेचे रकमेची मागणी केल्यास नविन प्रकरण तयार करून पात्र मर्यादेपर्यंत ओव्हर ड्राफ्ट मर्यादा मंजूर करण्यांत यावी.

सदर ओव्हर ड्राफ्ट कर्ज मर्यादा खात्यावरील कर्जदार अर्जदाराचे सेवा निवृत्तीला ६ वर्षे शिल्लक असताना दरवर्षी (२०% ने दर सहामाही १०% ने) मर्यादा कमी करून उर्वरित रकमेचे मर्यादेचे नुतनीकरण मंजूर करण्यांत येईल. अशा प्रकारे कर्ज मर्यादा वसूल करण्यांत यावी. सदर सभासदाला सेवा निवृत्तीचा ६ वर्षे अवधी असेपर्यंत पूर्ण मंजूर मर्यादेवर व्यवहार करता येईल. मात्र दरवर्षी या मर्यादेचे नुतनीकरण करावे लागेल. ज्या सभासदाचे सेवानिवृत्तीला ६ वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे अशा सभासदांना नेहमीचे निकषाप्रमाणे सेवा काळ विचारांत घेऊन ५ वर्षाला २०%, ४ वर्षाला २५%, ३ वर्षाला ३३%, २ वर्षाला ५०% याप्रमाणे ओव्हर ड्राफ्ट मर्यादा कमी करून ओव्हर ड्राफ्ट मर्यादेचे नुतनीकरण मंजूर करता येईल.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ८ - ग्राहकोपयोगी वस्तु खरेदीसाठी कर्ज पुरवठ्याचे धोरणांत सुधारणा, कर्जमर्यादा व कर्जाची व्याप्ती वाढविण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, ज्यांचे पगार आपले बँकेमार्फत होतात, अशा कर्मचा-यांसाठी ग्राहकोपयोगी वस्तु खरेदीसाठी बँकेमार्फत रुपये ३०,०००/पर्यंत कर्ज योजना सुरू आहे. नाबार्डने त्यांचे दिनांक १९.४.२००० चे परिपत्रकानुसार वैयक्तीक कर्ज मर्यादा ठरविण्याची जिल्हा सहकारी बँकांना मुभा दिलेली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीतील प्रचलीत धोरणांत सुधारणा करून कर्ज पुरवठ्याची व्याप्ती व कर्ज मर्यादा वाढवावी असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन ज्यांचे पगार बँकेमार्फत होतात अशा कर्मचाऱ्यांना देण्यांत येणारे कर्ज सुरक्षित कर्ज असल्याने नाबार्डचे परिपत्रकानुसार सुधारणा करून तयार केलेल्या ग्राहकोपयोगी वस्तु खरेदीसाठी कर्ज पुरवठ्याचे खालील सुधारीत कर्ज धोरणास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

<u>कर्ज धोरण</u> —

१. ग्राहकोपयोगी वस्तु खरेदी योजना अंतर्गत खालील बाबींकरिता कर्ज पुरवठा करता येईल. उदा. - मोटर सायकल, फ्रिज, वाशिंग माशिन, टी.व्ही., कुलर, फर्निचर, मोबाईल फोन, एअर कंडीशनर, व्ही.सी.आर., व्ही.सी.पी. या व्यतिरिक्त इतर ग्राहकोपयोगी वस्तु इत्यादि
२. सभासदाला कर्ज मागणी बँकेचे विहित नमुन्यांत करावी लागेल. कर्ज मागणी अर्ज बँकेचे शाखेत विक्रीसाठी उपलब्ध राहील व त्याची किंमत रूपये २५/- राहील.
३. कर्ज मागणी प्रकरणांत दोन जमानतदार द्यावे लागेल.
४. कर्ज मागणी करणाऱ्या व्यक्तीस व जमानतदारास बँकेचे नामधारी सभासदत्व स्विकारावे लागेल व कर्ज मागणी अर्ज आवश्यक कागदपत्रासह बँकेचे शाखेला सादर करावे लागेल.

<u>अर्जदाराची पात्रता व कर्जासाठी तारण</u> -

५. (अ) कर्ज मागणी करणारा व्यक्ती व्यावसायिक असल्यास त्यांचेकडून कर्ज परतफेडीसाठी दर महिन्याचे परतफेडीचे रकमेचे पोस्ट डेटेड चेक बँकेच्या नांवाने द्यावे लागेल. तसेच कर्ज सुरक्षिततेसाठी मंजूर रकमेचे द्विगुट इतपत रकमेचे तारण द्यावे लागेल.
उदा. - विमा पॉलीसी, नॅशनल सेव्हींग सर्टीफिकेट, बँकेतील मुदती डेपॉझिट पावती, स्थावर मालमत्ता इत्यादि.

(ब) पगारदार व्यक्ती ज्यांचे पगार बँकेमार्फत होत नाही, अशा व्यक्तींसाठी पोस्ट डेटेड चेक बँकेच्या नांवानी द्यावे लागेल. त्याशिवाय महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा कलम ४९(२) नुसार कार्यालयीन प्रमुखाचे हमीपत्र. हमीपत्र न मिळाल्यास "अ" मध्ये दर्शविलेले तारण द्यावे लागेल.

(क) ज्यांचे पगार बँकेमार्फत होतात अशा पगारदार कर्मचाऱ्यांसाठी त्यांचे दरमहा जमा होणाऱ्या पगारातून कर्ज रक्कम परस्पर कपात करण्याबाबतचे अधिकार पत्र, तसेच कर्ज थकित झाल्यास जमानतदाराचे पगारातून परस्पर रक्कम कपात करण्याचे बँकेचे नमुन्यातील अधिकार पत्र द्यावे लागेल. यासाठी अर्जदार व जमानतदार एकाच कार्यालयातील काम करणारे असावे.

(ड) पगारदार व्यक्तीसाठी मूळ पगार + महागाईचे १०पट किंवा जास्तीत जास्त रुपये २.०० लाख किंवा कोटेशनचे एकूण किंमतीचे ८० टक्केपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिल्या जाईल.

(ई) व्यवसायिकाकरिता त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्नाचे २पट कर्ज मर्यादा उपलब्ध करून दिल्या जाईल त्याकरिता व्यावसायिकाला आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील.
उदा०- आर्थिक विवरण पत्रके, दोन वर्षांचे आयकर विवरण पत्रक.

६) कर्ज मर्यादा
या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त कर्ज रुपये २.०० लाख (अक्षरी रुपये दोन लाख) पर्यंत कर्ज पुरवठा करता येईल. मात्र अधिकृत विक्रेत्याकडून दिलेल्या कोटेशनचे ८० टक्के पर्यंतच कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

७) कर्जाची मुदत -
सदर कर्जाची परतफेड रकमेनिहाय खालीलप्रमाणे करावी लागेल.
रुपये ५०,०००/पर्यंत ---- ३६ महिने (मासिक हप्ते)
रुपये ५०,००१ ते १,००,०००/- -- ४८ महिने (मासिक हप्ते)
रुपये १,००,००१ ते २,००,०००/- पर्यंत ६० महिने (मासिक हप्ते)

८) व्याज दर -
सदर कर्जावर व्याज दर द.सा.द.शे. १८ टक्के राहील. व्याज दरात केव्हाही बदल करण्याचा अधिकार बँकेला राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९- सेवा सहकारी/विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे सभासदांना घरगुती वापराकरिता गॅस कनेक्शन खरेदीसाठी कर्ज उपलब्ध

करून देणे-

ठराव क्रमांक ६ - मा॰ अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, राष्ट्रीय सहकारी विकास निगम, पुणे यांचे दिनांक १४.८.२०००चे पत्रानुसार सहकारी संस्थांच्या सभासदांना ग्राहकोपयोगी वस्तुंचा पुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थासाठी कर्जपुरवठ्याची योजना आखली असून या योजनेचा सहकारी संस्थांना लाभ मिळावा या उद्देशाने सदर योजना सेवा सहकारी/विविध कार्यकारी सहकारी संस्था मार्फत राबविण्याचे ठरविले आहे. त्यानुसार सेवा सहकारी/विविध कार्यकारी संस्थांचे सभासदांना घरगुती वापरा करिता एल॰पी॰जी॰ गॅस कनेक्शन खरेदीसाठी आपले बँकेमार्फत अल्प व सवलतीचे व्याजदरांत कर्ज उपलब्ध करून देण्याकरिता कर्ज धोरण तयार केले आहे. सुरुवातीला सक्षम सहकारी संस्था निवडून ही योजना प्रायोगिक स्तरावर राबवावी व त्यास मिळणारा प्रतिसाद पाहून इतर सहकारी संस्थांमधून अंमलबजावणी करावी, असे वाटते.

<u>कर्ज धोरण</u>

१. कर्ज मागणी करणारा सभासद हा सेवा/वि.का. सहकारी संस्थांकडून नियमित कर्ज घेणारा व कर्ज वाटपास पात्र असावा.

२. कर्ज मागणी अर्ज बँकेचे विहित नमुन्यांत सेवा सहकारी संस्थेकडे करावा लागेल. प्रत्येक सभासदाला स्वतंत्र अर्ज करावा लागेल. अर्जासोबत शेतजमीनीचा ७/१२ व ८(अ) जोडावा.

3. सेवा सहकारी संस्थेकडे प्राप्त झालेले सभासदांचे कर्ज मागणी अर्ज संस्थेचे ठरावासह शाखेला सादर करेल.

४. घरगुती वापरासाठी एल॰पी॰जी॰ गॅस कनेक्शन खरेदीकरिता जास्तीत जास्त रूपये ४०००/- पर्यंत मुदती कर्ज मंजूर करता येईल.

५. सदर कर्ज मध्यम मुदती (बिगर शेती) कर्ज असल्याने परतफेडीचा कालावधी ५ वर्षे राहील. कर्जाची परतफेड ५ समान वार्षिक हप्त्यांत करावी लागेल. कर्जाची मागणी दरवर्षीच्या अल्प मुदती कर्जासोबतच वेगळी डिमांड लिस्ट तयार करून कर्ज मागणी व वसुली करावी लागेल.

६. याकरिता स्वगुंतवणुक घ्यावयाची नसल्याने सभासदाला रूपये ५००/- बँकेत अनामत रक्कम ५ वर्षे कालावधीसाठी जमा करावी लागेल. या रकमेवर व्याज दिल्या जाणार नाही. परंतु शेवटचा देय कर्ज हप्ता वसुलीचे वेळी अनामत रक्कम कर्जात वळती करून घेतल्या जाईल. यासाठी मात्र सभासदाला कर्जाची नियमित परतफेड करावी लागेल उदा. रूपये ४०००/- कर्ज घेतल्यास सभासदाला दरवर्षी खालील कर्ज रकमेची परतफेड करावी लागेल.

१ ले वर्ष – रुपये ८०००/- मुद्दल + व्याज
२ रे वर्ष – रुपये ८०००/- मुद्दल + व्याज
३ रे वर्ष – रुपये ८०००/- मुद्दल + व्याज
४ थे वर्ष – रुपये ८०००/- + व्याज
५ वे वर्ष – रुपये ३०००/- + व्याज (अनामत रक्कम वजा जाता)

एकूण रुपये ३५०००/-

+ अनामत रक्कम ५०००/-
वसुलीमध्ये वळती

एकूण रुपये ४००००/-

७. या कर्जावर व्याज दर खालील प्रमाणे राहील...
बँक ते सेवा सहकारी संस्था – द. सा. द. शे. ६%
सेवा सह. संस्था ते सभासद – द. सा. द. शे. १०%

८. कर्जाची परतफेड दरवर्षी समान वार्षिक हप्त्यात नियमीत करावी लागेल. कर्ज परतफेड दरवर्षी नियमीत न झाल्यास सभासदाची अनामत रक्कम जप्त करण्यात येवून सवलतीचा व्याज दर नाकारण्यांत येवून त्या कालावधीच्या प्रचलीत दराने व्याजाची आकारणी केली जाईल. थकित झाल्यास दंडव्याज दर २% आकारल्या जाईल. व्याजदरांत फेरबदल करण्याचा अधिकार बँकेला राहील. (सध्याचा प्रचलीत मध्यम मुदती शेती व्याज दर द. सा. द. शे. १२.५ टक्के आहे.)

९. सदर कर्ज अल्प रकमेचे असल्याने बँक व संस्थांचे हिस्से खरेदी करावे लागणार नाही.

१०. इंडेन गॅस कनेक्शनची एजेन्सी नागपूर जिल्हा कृषि औद्योगिक सहकारी संघ मर्या., नागपूर यांचेकडे असल्याने त्यांचे मार्फतच गॅस कनेक्शन खरेदी-साठी कर्ज पुरवठा केल्या जाईल.

सदर कर्ज पुरवठा नव्याने करावयाचा असल्याने प्रायोगिक स्तरावर नागपूर तालुक्यातील संस्था निवडण्यांत याव्या व त्यास मिळणारा प्रतिसाद पाहून पुढे इतर तालुक्यातील सहकारी संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्यांत यावी, असेही ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १०:– दिनशॉ डेअरी फुडस् प्राय. लि., नागपूरचे नविन प्रकल्प उभारणी साठी रुपये २०.०० कोटी मुदती कर्ज मंजूरीसाठी आलेल्या प्रकल्प अहवाला-वर विचार करणे.

ठराव क्रमांक १० :– मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सदरील माहिती

देतांना सांगितले की, दिनशॉ डेअरी फुडस् प्रा.लिमी., नागपूर यांनी प्रतिदिन १५०,००० लिटर आईसक्रिम उत्पादन क्षमतेचा नविन प्रकल्प एम.आय.डी.सी. बुटीबोरी प्लाट नं. के-६१ व के-६२ वर उभारणी करणेसाठी रुपये ३१.०० कोटीचा प्रकल्प तयार करून त्यासाठी रुपये २०.०० कोटी मुदती कर्जाची बँकेकडे मागणी केली आहे यासाठी कंपनीने आवश्यक परवाने प्राप्त केले आहेत. सदर व्यवसाय नागपूर मध्ये १९५५ पासून सुरु असून सध्या दिनशॉ डेअरी प्रा.लि. नागपूर या कंपनीचे मार्फत सुरु आहे. कंपनीचे उत्पादन विदर्भामध्ये लोकप्रिय असल्याने कंपनीने उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणांत वाढ करून या प्रमाणे प्रकल्पाची उभारणी करणेचे ठरविले आहे. कंपनीच्या स्थावर मालमत्तेचे ठोकळ मुल्य रुपये २०५५.७५ लाख असून निव्वळ मुल्य रुपये १५२८.२७ लाख आहे.

कंपनीने एम.आय.डी.सी. बुटीबोरी येथे संपादित केलेली एकर जमीन रुपये ८०.०० लाखाची असून त्यावर उभारणी होणार असलेल्या प्रकल्पाची इमारत मशिनरी इत्यादिची किंमत रुपये ३१.०० कोटी असणार आहे. कंपनी ही संपूर्ण मालमत्ता बँकेचे कर्ज सुरक्षिततेसाठी तारणात देणार आहे. याशिवाय कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांचेशी झालेल्या चर्चेनुसार कंपनीची बोरगांव गिट्टी खदान येथील प्रकल्पाची मालमत्ता अंदाजे रुपये ३.०० कोटीची असून ही मालमत्ता शिक्षक सहकारी बँकेचे गहाणात आहे. या मालमत्तेवर आपल्या बँकेचे कर्जाचा दुय्यम बोझा नोंद करून बँकेचे कर्जापोटी सहतारणांत देण्याची संमती कंपनीने दिली आहे. कंपनीचे कर्ज प्रकरणावर निर्णय घ्यावा असे

यावर सभेत सविस्तर चर्चा होऊन कंपनीचे कार्यरत असलेल्या फॅक्टरीचे अंदाजे किंमत रुपये ३.०० कोटीचे स्थावर मालमत्तेवर दुय्यम बोझा नोंदवून बँकेचे सहतारणांत घ्यावी. तसेच प्रकल्पा अंतर्गत कंपनीची स्वमालकी-ची जमिन, त्यावरील इमारत, मशिनरी इत्यादि मिळून निर्माण होणारी संपूर्ण मालमत्ता बँकेचे तारणांत घेऊन कंपनीला नविन प्रकल्प उभारणीसाठी रुपये २०.०० कोटी मुदती कर्ज निधी द.सा.द.शे. १५% व्याजदराने साडे नऊ वर्षांत दिड वर्ष सवलतीचा काळ विचारांत घेऊन १६ सहामाही हप्तांत परतफेडीचे मुदतीने उपलब्ध करून देण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले. सदर प्रकल्प अहवाल नाबार्डचे मान्यतेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँके मार्फत पाठविण्यांत यावा. प्रकल्पाबाबत नाबार्डने सुचविलेल्या अटी व शर्ती बँकेला मान्य राहील.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ११:- सदस्यांना सेवा शर्ती संबंधी कोणती व्यवस्था सदस्यांनी

योग्य राहील याबाबत मा० सह. आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आपले बँकेचा अभिप्राय मागितला आहे. त्यासंबंधी विचार करणे.

ठराव क्रमांक १७ :- मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, गटसचिवांना आपल्या बँकेत सामावून घ्यावे अशा प्रकारच्या धर्तीवर आपली बँक तयार आहे किंवा कसे? किंवा आपली बँक गटसचिवांना बँकेच्या सेवेत घेऊ शकत नसल्यास गटसचिव संबंधी कोणती व्यवस्था करणे हितावह होईल या विषयीचा सविस्तर अभिप्राय बँकेला मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, महाराष्ट्र स्टेट कोऑप. बँक लिमि. मुंबई व मा० विभागीय निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी पत्र पाठवून मागितला आहे. तसेच जिल्हा देखरेख सहकारी संस्थेकडून त्यांचे गटसचिव/कर्मचारी बँकेचे सेवेत सामावून घेण्याबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे.

सध:स्थितीत गटसचिवांचे जिल्हास्तरावर स्वतंत्र केडर असून तालुका स्तरावर समित्या नेमल्या आहेत. या समित्यांद्वारा जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शेतकी संस्थांचे व्यवहारावर व गटसचिवांचे कामकाजावर नियंत्रण ठेवल्या जाते. गटसचिवांचे पगार व प्रशासकीय खर्चासाठी बँकेकडून शेती संस्थामार्फत केलेल्या कर्ज पुरवठ्याचे एकूण कर्जबाकीवर २.००% दराने संवर्ग निधी (Cadre fund) आकारल्या जातो व ह्या फंडाची वसुली सभासद स्तरावर प्रत्यक्ष वसूल झालेल्या सभासद व व्याजाच्या ३% इतका गाळा संस्थेला प्रदान करून केली जाते. एकूण ३% व्याज गाळ्यापैकी १.५०% पर्यंत प्रशासकीय खर्चासाठी व १.५०% पर्यंत ऑडीट फी, सुपरविजन फी साठी वापरली गेल्यानंतर उर्वरित रक्कम संस्थेचा नफा म्हणून वापरण्यांत येते. नागपूर जिल्ह्यांत गटसचिव व त्यांचे कार्यालयांतील कर्मचारी यांची एकूण संख्या २५७ आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँके व्यतिरिक्त इतर ठिकाणी गटसचिवांच्या सेवा सामावून घेणेबाबत निर्णय झाल्यास बँकेच्या कर्जवाटप व कर्ज वसुलीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत बँकेचे सेवेत गटसचिवांना सामावून घ्यावे किंवा कसे? याबाबत अभ्यास करणेकरिता अभ्यास समिती नेमण्यांत यावी. अभ्यास समितीचा अहवाल आल्यानंतर याबाबतचा निर्णय घ्यावा लागेल. अशी अभ्यास समिती नेमण्याचे अधिकार मा० अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १२ : मा० अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक १२(१) – आदर्श सहकारी पत संस्था, मर्या. रामटेकचे कॅश क्रेडीट मर्यादा मागणी अर्जाबाबत.

ठराव क्रमांक १२(१) – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, आदर्श सहकारी पत संस्था मर्या. रामटेक ही संस्था नागरी सहकारी पत संस्था असून रामटेक तालुका स्तरावर कार्यरत आहे. ह्या संस्थेच्या एकूण रुपये ८०.६४ लाखाच्या ठेवी आहेत. संस्थेनी मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घालून दिलेल्या अटीप्रमाणे एकूण ठेवी पैकी २५% ठेवी बँकेत गुंतवित्या नाहीत. तर त्यापैकी बँकेत रुपये ७.३० लाख मुदती ठेवीत गुंतविले असून त्यावर रुपये ५.०५ लाख कर्ज घेतले आहे. संस्थेचे भाग भांडवल रुपये ५३.४३ लाख असून सभासदांना दिलेली कर्जे रुपये ५८.९८ लाख आहेत. त्यापैकी रुपये ४.१४ लाख कर्ज थकित आहे. संस्थेचे रिझर्व फंड रुपये ३.०९ लाख व इमारत फंड रुपये १.१३ लाख बँकेत गुंतविला आहे. संस्थेनी बँकेतील रिझर्व फंड व इमारत फंडाचे गुंतवणुकीवर बँकेचे कर्जाचा बोझा नोंद करून रुपये ३.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करणेबाबत बँकेला विनंती केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन संस्थेने बँकेत रिझर्व फंड व इमारत फंडाचे गुंतवणुकीवर बँकेने कर्जाचा बोझा नोंद करून रुपये ३.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा मंजूर करणेत येत आहे. तसेच मा० सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संस्थेला घालून दिलेल्या अटी प्रमाणे एकूण ठेवीपैकी २५% ठेवी बँकेत गुंतविण्याची अट यापुढे येणाऱ्या ठेवी मधून पूर्ण करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १२(२) – मित्र परिवार ग्राहक सहकारी संस्था मर्या., नागपूर कडील थकित कर्जाची वसुली करून बँकेचे सभासदत्व रद्द करणेबाबत.

ठराव क्रमांक १२(२) :- मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मित्र परिवार ग्राहक सहकारी संस्था मर्या. नागपूर या संस्थेकडे बँकेचे रुपये ६१/- दिनांक १.१.१९८६ पासून थकित असून यावरील व्याज रुपये ६०१/- थकित झाले आहे असे एकूण रुपये ६६२/- बँकेला संस्थेकडून घेणे आहे. संस्थेनी बँकेचे रुपये ५००/-चे हिस्से खरेदी केले असून बँकेत केलेली रिझर्व फंडातील गुंतवणूक रुपये ३०७८.३२ पैसे महामंडळाकडे आहे. मा. जिल्हा

उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी यांचे दिनांक २७.८.१९९७चे पत्रानुसार सदर संस्थेची नोंदणी रद्द करुन या संस्थेचे नांवाने यानंतर कोणत्याही प्रकारचे देणे-घेणे व्यवहार होणार नाही असे आदेशांत नमुद करुन संस्थेचे नांवाने बँकेत असलेली सर्व रक्कम जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडील सरफस खात्यात वर्ग करण्यास व संस्थेचे बँकेतील सभासदत्व रद्द करण्यास बँकेला कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांचे दिनांक २७.८.१९९७चे पत्रानुसार मित्र परिवार ग्राहक सहकारी संस्था मर्या, नागपूरचे बँकेतील सभासदत्व रद्द करुन त्या संस्थेकडे असलेली बँकेची कर्जबाकी रुपये ८९/- व त्यावरील व्याज रुपये ७७५/- असे एकूण रुपये ८६४/- संस्थेचे बँक हिस्से रक्कम मंजूर रुपये ५००/- व रिझर्व फंड गुंतवणुक खात्यातून रुपये ३६४/- असे कर्जापोटी वसुलीत घेऊन उर्वरित रक्कम मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडील सरफस खात्यात जमा करण्यांत यावी, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९२(३) – राष्ट्रसेवा विद्यालय कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या, नागपूर र.नं. ६२७ ह्या संस्थेचे शेअर्सची रक्कम परत करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९२(३) – मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, राष्ट्रसेवा विद्यालय कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या, नागपूर ही संस्था अवसायनांत गेली असून या संस्थेचे अवसायकांनी बँक हिस्से प्रमाणपत्र सोबत जोडून दिनांक ३२.८.२०००चे पत्राप्रमाणे बँक हिस्से रक्कम रुपये २००/- परत मागीतली आहे. सदर संस्थेकडे बँकेचे कोणतेही कर्ज नाही.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन राष्ट्रसेवा विद्यालय कर्मचारी सहकारी पत संस्था, मर्या, नागपूर या संस्थेचे अवसायकांनी बँक हिस्से रक्कम परत मागितली असल्याने संस्थेचे बँकेतील सभासदत्व रद्द करुन संस्थेकडे बँकेची कर्जबाकी नसल्याने शेअर्सची पूर्ण रक्कम रुपये ६००/- परत करण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९२(४) – राष्ट्रीय कृषि सेवा योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून आलेल्या पत्रावर विचार करणे.

ठराव क्रमांक ९२(४) – मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र शासनाचे दिनांक ११.८.१९९९चे परिपत्रकानुसार राष्ट्रीय कृषि

विमा योजना बँकेत सन १९९९च्या रब्बी हंगामापासून राबविण्यांत येत आहे. सदर योजना कर्जदार व बिगरकर्जदार सभासदांना लागू आहे. राष्ट्रीय कृषि विमा योजना ही सर्व पिकांसाठी बंधनकारक केली असतांतरी राष्ट्रीय कृषि विमा योजनेसंदर्भात वारंवार सुचना/परिपत्रके पाठविण्यांत येवून देखील कांही जिल्हा बँकांनी या योजनेत अंतर्भूत होणाऱ्या सर्व पिकांचे विमा हप्ते कापले नसल्याचे निदर्शनास आले आहे. राष्ट्रीय कृषि विमा योजना ही सर्व पिकांसाठी बंधनकारक केल्यामुळे सदर योजनेचे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी काटेकोरपणे पालन करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७९"अ" अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराप्रमाणे मा॰ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पुढील निर्देश पारीत केले आहेत.

१. शासनाचे परिपत्रकाप्रमाणे राष्ट्रीय पिक विमा योजनेत नमुद केलेल्या सर्व पिकांच्या अंतर्भाव होणे बंधनकारक आहे.
२. सदर योजना पिक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अनिवार्य आहे.
३. सदर योजना पिक कर्ज न घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे.
४. किसान क्रेडीट कार्ड द्वारे घेतलेल्या पिक कर्जासही पिक विमा संरक्षण लागू आहे.
५. ज्या जिल्हा बँका विमा हप्त्याचे हप्ते कपात करणार नाही त्यांचेवर योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यांत येईल.

राष्ट्रीय कृषि पिक विमा योजनेचे काटेकोरपणे पालन करणेसाठी शासनाने पारीत केलेल्या निर्देशाचे तंतोतंत अनुपालन करणे बंधनकारक आहे ज्या जिल्हा सहकारी बँका शासनाने दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत अनुपालन करणार नाहीत त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७८(३) मधील तरतुदीनुसार कारवाई करणे भाग पडेल. तसेच दिनांक ३१ ऑक्टोंबर २००० पूर्वी पिक विम्याच्या हप्त्याची रक्कम भारतीय विमा निगमकडे जमा करणेबाबत जिल्हा सहकारी बँकेचे संचालक व्यक्तीशः जबाबदार राहतील असेही पत्रात नमुद करुन कळविले आहे.

आपल्या बँकेने शासनाचे निर्देशानुसार पिक विमा योजनेत नमुद केल्याप्रमाणे नागपूर जिल्ह्यातील धान, ज्वार, मुंग, सोयाबीन, कापूस ऊस या पिकांकरिता कृषि विमा योजना राबविली असून खरीप २००० हंगामात माहे ऑगस्ट अखेर कर्जदार सभासदांच्या रुपये ५९.६३ लाखाच्या व रुपये ०.७० लाखाच्या बिगर कर्जदार सभासदांच्या विमा हप्ता भारतीय

साधारण विमा निगमला पाठविला आहे. खरीप हंगाम ३०सप्टेंबरला संपला असल्या मुळे महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार सप्टेंबर महिन्याअखेरचा विमा हप्ता ३०ऑक्टोबर पर्यंत पाठवायचा आहे.

विषयावर चर्चा करतांना मा. र. गो. बेग संचालक म्हणाले की, सदर योजनेत संत्रा व मिरची पिकांचा समावेश करण्यांत यावा या वर्षीची पिक परिस्थिती विचारात घेता पिक विम्याचा विचार होणे आवश्यक आहे. व यकरिता शासनाकडून घोषीत होणारी आणेवारी बरोबर वाटत नसल्यास त्यावर आक्षेप नोंदविले गेले पाहिजेत. मा. मु. न. पि. पन्नासे, म्हणाले की, आणेवारी संदर्भात सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष, गटसचिव यांनी मिळून त्यांचे कार्यक्षेत्रातील पिकांची माहिती गोळा करावी. गोळा केलेली माहिती आणेवारी काढणे संदर्भात शासनास कळवावी. माहिती गोळा करण्याचे कामांत बँकेने सहकार्य करावे. कृषि विमा योजनेत उंबरठा उत्पन्न काढण्याची पध्दती योग्य वाटत नाही. यावर मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, पिक विमा योजनेत उंबरठा उत्पन्न काढण्याच्या पध्दतीत सुधारणा करणेबाबत मा. कृषि मंत्री यांना पत्र लिहिण्यांत आलेले आहे. पिक विमा हप्त्याची रक्कम भारतीय विमा निगमकडे मुदतपूर्वी जमा करणेबाबत जिल्हा सहकारी बँकेचे संचालकांना व्यक्तीशः जबाबदार राहतील असे पत्रांत नमुद केल्यामुळे याबाबत बँकेचे मा. संचालकांनी खेद व्यक्त केला. तेव्हा मा. संचालकांच्या भावना विचारात घेवुन खेद व्यक्त केल्याबाबत मा. आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पूणे यांना पत्र लिहिण्यांत यावे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन केंद्र शासनाचे दिनांक १६.७.१९९९चे पत्रा प्रमाणे महाराष्ट्र शासनाने दिनांक ११.८.१९९९ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार राबविण्यांत येत असलेली राष्ट्रीय कृषि विमा योजना शासनाने ठरवून दिलेल्या पिकांसाठी बंधनकारक असल्याने तसेच कर्जदार व बिगर कर्जदार सभासदांना लागू केल्याने मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यांत यावी. तसेच सदर राष्ट्रीय कृषि विमा योजनेत संत्रा व मिरची या पिकांचा समावेश करण्यांत यावा यासाठी शासनाकडे विनंती करण्यांत यावी, असेही ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १२(५) :- महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.चे तपासणी अधिकारी यांचे १९९८-९९ या वर्षाचे तपासणी अहवालावरील पुर्तता अहवालास मान्यता देणे.

ठराव क्रमांक १२(५) — मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.चे तपासणी अधिकारी यांचेकडून बँकेचे

१९९८-९९ या वर्षाचे तपासणीबाबत प्राप्त झालेल्या तपासणी अहवालावरील तयार केलेल्या दोष पुर्तता अहवालास दिनांक ७३.९.२०००रोजी झालेल्या मा० अंकेक्षण पूर्तता उपसमिती सभेने मान्यता दिलि असून मा० संचालक मंडळाचे अंतिम मंजूरीसाठि शिफारस केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.चे तपासणी अधिकारी यांनी १९९८-९९ या वर्षाचे तपासणीबाबत सादर केलेल्या तपासणी अहवालावरील दोष पूर्तता अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आलि असून सदर दोष पुर्तता अहवाल महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे तपासणी अधिकाऱ्यांकडे त्वरित पाठविण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १२(६) - बँकेतील कर्मचाऱ्यांना लागू करावयाच्या ऐच्छिक सेवा-निवृत्ती योजनेचे धोरण व नियमास मंजूरी देणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १२(६) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या प्रचलित नियमानुसार कर्मचाऱ्यास वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्या-नंतर सेवानिवृत्ती दिली जाते. परंतु बँकेच्या सेवेत असतांना त्यांची शारीरिक किंवा मानसिक दुर्बलता किंवा स्वतःच्या खाजगी समस्या इत्यादि कारणामुळे जे कर्मचारी बँकेस चांगल्या सेवा देऊ शकत नसतील किंवा त्यांची सेवेत राहण्याची ईच्छा नसेल अशा कर्मचाऱ्यांच्या प्रती सहानुभूतीपूर्वक विचार करून ऐच्छिक सेवा निवृत्ती योजना तयार करण्यांत आली आहे. सदर योजना राबविणेकरिता दिनांक २१.१०.२००० रोजी झालेल्या मा० सेवक उपसमितीचे सभेत धोरण व नियम ठरविण्यांत आले असून ऐच्छिक सेवा निवृत्ती योजनेचे धोरण व नियमास अंतिम मंजूरी मिळणेसाठी व सदर योजना बँकेत राबविणेसाठी मा० संचालक मंडळास शिफारस केलेली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेतील अधिकारी/कर्मचारी यांचे करिता ऐच्छिक सेवा निवृत्ती योजना मंजूर करण्यांत आली असून दिनांक १.११.२००० पासून लागू करणेसाठी मंजूरी देण्यांत येत आहे. ऐच्छिक सेवा निवृत्ती योजनेसंबंधी धोरण, नियम, अटी, व कर्मचाऱ्यास देण्यात येणारे फायदे या संबंधीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

ऐच्छिक सेवा निवृत्ती योजना :—

---

१. ऐच्छिक सेवानिवृत्ती हेतु ईच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची बँकेतील नियमीत नोकरी २०वर्षे पूर्ण झालेली असावी, किंवा त्यांचे वय ५०वर्षापेक्षा

कमी असावे. असेच कर्मचारी ऐच्छीक सेवा निवृतीस पात्र ठरु शकतील. परंतु अशा अधिकारी /कर्मचाऱ्याने ३ महिने पुर्वसुचना (नोटीस) देणे आवश्यक राहील.

२) नियमीत निवृत्तीच्या वयाच्या अगोदर बँकेतून स्वेच्छेने निवृत्त होणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यास एक वर्षाच्या नियमीत सेवेला एक महिन्याचा पगार (मुळ पगार+महागाई भत्ता) या प्रमाणे त्यांच्या झालेल्या सेवेकरिता येणारी रक्कम किंवा उर्वरित सेवेच्या मिळणाऱ्या एकूण पगाराच्या (मुळ पगार+महागाई भत्ता) ५५% यापैकी जी रक्कम कमी असेल ती नुकसान भरपाई म्हणून देण्यांत येईल.

३) ऐच्छीक सेवा निवृत्तीचे वेळी अधिकारी /कर्मचाऱ्यांना जो पगार असेल तो विचारांत घेवून येणारी रक्कम अदा केली जाईल.

४. स्वेच्छेने निवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना पुन्हा बँकेच्या सेवेत समाविष्ट करुन घेण्यांत येणार नाही.

५) नोकरीतील वर्ष ठरवितांना सहा महिने किंवा सहा महिन्यापेक्षा जास्त काळ असेल तर पूर्ण ~~अर्ध~~ वर्ष धरण्यांत येईल.

६) जे अधिकारी/कर्मचारी परसेवेवर असतील ते पूर्ववत बँकेच्या सेवेत रुजू होईपर्यंत त्यांच्या ऐच्छीक सेवा निवृत्तीबाबत विचार करता येणार नाही, ते बँकेत पुर्ववत रुजू झाल्यानंतर त्यांना ऐच्छीक सेवानिवृत्तीची मागणी करता येईल.

७) तसेच जे अधिकारी/कर्मचारी दिर्घमुदती रजेवर असतील ते जोपर्यंत कामावर रुजू होत नाहीत, तोपर्यंत त्यांना मागणी करता येणार नाही. रजे रजेअंती कामावर रुजू झाल्यावर ३ महिने दिर्घ मुदती रजेवर जाता येणार नाही. मात्र एखादा कर्मचारी /अधिकारी दिर्घकालीन आजारपणामुळे, शारिरीक अपंगत्व प्राप्त झाल्यामुळे, अगर अन्य कोणताही कारणाने बँकेची सेवा कार्यक्षमतापूर्वक पार पाडण्यास असमर्थ असल्याचे बँकेचे मत झाल्यास मग असा कर्मचारी आजारपणाचे रजेवर असतानाही त्यांने अर्जाचा बँक विचार करेल किंवा अशा कर्मचाऱ्यास ऐच्छीक सेवानिवृती घेणे बाबत बँक सांगू शकेल. त्यासाठी मेडीकल सिव्हील सर्जन अगर बँकेने नियुक्त केलेल्या डाक्टरांकडून तपासणी करुन वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

८. ज्या कर्मचाऱ्याविरुध्द खाते चौकशी अथवा प्राथमिक चौकशी सुरु असेल अशा कर्मचाऱ्यास चौकशीचा निकाल लागेपर्यंत तसेच न्यायालयांत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यास कर्मचाऱ्यास ऐच्छीक सेवानिवृती मागता येणार नाही.

९) ऐच्छीक सेवानिवृती स्विकारतांना मिळणारी रक्कम कर्मचारी /अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार निर्देशित तारखेस एक रकमी अथवा जास्तीत जास्त तिन वार्षिक हप्त्यांमध्ये घेता येईल. अशी रक्कम घेणाऱ्या कर्मचाऱ्याने नॉमिनेशन फार्म भरुन देणे आवश्यक आहे. एखादा कर्मचारी -

रक्कम घेण्यापूर्वी मय्यत झाला असल्यास ती रक्कम त्याच्या नॉमिनीस देण्यांत येईल.

१०) ऐच्छीक सेवानिवृत्ती घेवू इच्छिणाऱ्या अधिकारी /कर्मचाऱ्याने आपला अर्ज आपले वरिष्ठांमार्फत मुख्य कार्यालयातील प्रशासन विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे.

११). ऐच्छिक सेवानिवृत्तीबाबत आलेल्या अर्जावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. सेवक उपसमिती यांना राहील. हक्क म्हणून कर्मचाऱ्यास ऐच्छीक सेवा निवृत्ती मागता येणार नाही. एका वर्षात किती अर्जावर निर्णय घ्यावा हे मा० अध्यक्ष किंवा मा० सेवक उपसमिती च्या अखत्यारित राहील.

या योजनेचा फायदा घेवू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना याबाबत माहिती मिळणेकरिता बँकेचे सर्व विभाग व शाखांना कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १२(७) - बँकेतील कर्मचाऱ्यांना सन १९९९-२००० या वर्षाचा बोनस/एक्सग्रेशिया वाटपाबाबत.

ठराव क्रमांक १२(७) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेचे कर्मचाऱ्यांना दरवर्षी बोनस/एक्सग्रेशीया मंजूर करुन दिवाळी पूर्वी वाटप केल्या जात असते. सन १९९९-२००० या वर्षाचे नफातोटा पत्रकांत रूपये ५०,०००/-ची तरतुद करुन नफ्याचा विनियोग करतांना कर्मचाऱ्यांना बोनस/एक्सग्रेशीया देणेकरिता रूपये ६०२०,०००/-ची शिफारस केल्यानुसार कर्मचाऱ्यांना सन १९९९-२००० चा बोनस/एक्सग्रेशीया १२% दराने दिवाळीपूर्वी वाटप करण्यांत आले आहे. परंतु बँकेचे कर्मचाऱ्यांनी बँकेची सध्याची आर्थिक स्थिती व सन १९९९-२००० या वर्षात बँकेस आलेला नफा विचारांत घेता कर्मचाऱ्यांना २०% प्रमाणे बोनस/एक्सग्रेशीया देण्यांत यावा अशी विनंती करुन अर्ज केलेला आहे.

विषयावर चर्चा करतांना मा० अध्यक्ष म्हणाले की, बँकेचे कर्मचाऱ्यांना बोनस/एक्सग्रेशीया देण्याकरिता करण्यांत आलेल्या नफ्याच्या विनियोगास दिनांक १४-८-२००० रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेत दिलेल्या मान्यते पलिकडे जाऊन निर्णय घेता येणार नाही. तथापी बोनस/एक्सग्रेशीया देणेकरिता शिफारस केल्यानुसार १२% प्रमाणे बोनस/एक्सग्रेशीया दिवाळीपूर्वी वाटप करण्यांत आले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दिवाळीपूर्वी १०% प्रमाणे बोनस/एक्स ग्रेशीया वाटप करण्यांत आलेल्या कार्यवाहीस सर्वानुमते मान्यता देऊन केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

विषय क्रमांक १२(८) – नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या; हिंगणा यांना मशिनरी खरेदीकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या; मुंबई येथे आय० एल०सी० ची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत केलेल्या सबसुडिंग ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक १२(८) – नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या; हिंगणा यांना वेस्ट जर्मनीचे "स्लाफोर्ड एन्.जी०ॲंड. कंपनी" कडून ऑयकोनर व यु.एस.ए. येथील इलेवेजर इस्टर कंपनीकडून येण टेस्टर या दोन अद्यावत मशिनरी खरेदी करावयाच्या असून सुतगिरणीने या कंपन्याशी करार केलेला आहे. सदर मशिनरीची किंमत अनुक्रमे ३६६५०० डेम व ३५००० स्विस फ्रँक म्हणजे भारतीय चलनानुसार अनुक्रमे रुपये ८२.०० लाख व रुपये ११.०० लाख असून ही रकम कंपनीला विदेशी चलनात अदा करावयाची आहे. त्यासाठी सुत गिरणीने आपले बँकेमार्फत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित मुंबई येथे अनुक्रमे रुपये ९०.०० लाख व रुपये १२.०० लाख असे दोन इनलँड लेटर ऑफ क्रेडिट (आय०एल०सी०) सुविधा उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या; मुंबई येथील आय०बी०डी० विभागाने दिलेल्या माहितीनुसार मशिनरी खरेदीच्या किंमतीइतक्या रकमेचे एल० सी० खाते गिरणीच्या नांवाने उघडावे लागेल. या करिता जिल्हा सहकारी बँकेला मशिनरी किंमतीच्या ११०% प्रमाणे म्हणजेच अनुक्रमे रुपये ९०.०० लाख व रुपये १२.०० लाख अशी एकूण रुपये १०२.०० लाख रकमेची गॅरंटी द्यावी लागेल. तसेच मशिनरी पेमेंटचे वेळी आपले बँकेचे मुंबई येथील चालू ठेव खात्यातून रकम उपलब्ध करून द्यावी लागेल.

गिरणीने सदर मशिनरीचे खरेदीकरिता स्वनिधीतून व्यवस्था केलेली आहे, तोपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून राज्य सहकारी बँकेला वेळीच पेमेंट करता यावे, यासाठी गिरणीला मंजूर असलेल्या तारण गहाण मर्यादेवर दोन्ही मशिनरीची एकूण किंमत रुपये १०२.०० लाख रकमेचे ईअर मार्क करून ठेवावे लागेल. गिरणीला चालु वर्षाकरिता तारण गहाण मर्यादा रुपये ६००.०० लाख दिनांक ३१.३.२००१ पर्यंतचे मुदतीसाठी मंजूर असून या मर्यादेवर कर्जबाकी नाही. संस्थेनी सर्व चार्जेससह मशिनरी खरेदीपोटी होणारी एकूण रकम सुतगिरणीचे तारण गहाण कर्ज खात्याला

नोंवे टाकून वसूल करून घेण्याबाबत दिनांक ५।८।२०००चे संचालक मंडळाचे सभेतील ठरावान्वये अधिकार दिले आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या., हिंगणा यांना जिल्हा बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई येथे आवश्यक एल.सी. सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हमी घेण्यांत यावी. तसेच सूतगिरणीची निकड लक्षात घेता गिरणीला मंजूर असलेल्या तारण गहाण मर्यादेमधून दोन मशिनरी खरेदीकरिता रुपये १०२.०० लाख तात्पुरती उचल मर्यादा सोडून ठेवावी व सूतगिरणीची गरज भागवावी. तसेच मंजूर सुविधेकरिता राज्य सहकारी बँकेला आवश्यक असणारा ठराव पाठविणे आवश्यक आहे. बँकेच्या मा० संचालक मंडळाची सभा तातडीने बोलाविणे शक्य नसल्याने सूतगिरणीची तातडीची गरज विचारात घेता यासाठी खालीलप्रमाणे करण्यात आलेल्या सक्युलेटिंग ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.

Resolved that :-

1) At the request of Nagpur Zilla Shetkari Sahakari Soot Girni Ltd; Hingna a joint and several guarantee be issued in favour of the M.S.Coop. Bank Ltd., Mumbai against the documentary credit to be issued by the letter for the Rupee equivalent of Rs.389500 DEM (In words Three lakhs eighty nine thousand five hundred DEM) and 35000 CHF (In words Thirty five thousand CHF) at the rate of exchange applicable for retirement of bills thereunder.

2) The Maharashtra State Cooperative Bank Ltd; Mumbai is authorised to debit Current account No.96/5751 with themselves by Rupee equivalent of the bill amount, charges and interest if any incurred under the documentary credit.

3) Any two of the following persons are authorised to sign guarantee, counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr.No. | Name | Designation. |
|---|---|---|
| 1. | Shri B.C. Shahane | Director |
| 2. | Shri R.V. Nimje | Director |
| 3. | Shri A.N. Choudhary | General Manager |
| 4. | Shri S.S. Gode | Manager (officiating) |

4) Any one of the following person is authorised to countersign documents issued by the applicant for the credit.

| Sr.No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Shri A.N. Choudhary | General manager. |
| 2 | Shri S.S. Gode | Manager (officiating) |
| 3 | Shri A.B. Deshmukh | Chief officer (Loan) |

passed unanimously.

वरील प्रमाणे सक्युलेटींग ठराव घेवुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस पाठविल्यात आल्याचे कार्योत्तर मान्यता देवुन केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक १२(९) - नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटीव्ह सोसायटीचे गटसचिवांना प्रोत्साहनपर बक्षिस देण्याकरिता बँकेकडून आर्थिक मदत देणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १२(९) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटीव्ह सोसा. मर्या. नागपूर कडून गटसचिवांना चांगल्या कामकाजाबाबत प्रोत्साहनपर बक्षिसी देण्याकरिता बँकेकडून रूपये १.०० लाख आर्थिक मदत मिळणेबाबतचा अर्ज बँकेकडे दि १.१०.२०००रोजी आलेला आहे. बँकेचे पोटनियमांत गटसचिवांना बक्षिस देण्याबाबतची तरतुद नाही. सन१९९८-९९ या वर्षात नफ्यातून गटसचिवांना चांगल्या कामाकरिता प्रोत्साहन म्हणून बक्षिस देण्याकरिता शिफारस केल्यानुसार देण्यांत आले होते. तथापी याबाबत अंकेक्षण अहवालांत आक्षेप घेण्यांत आलेला आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन को-ऑप. सोसायटीचे गटसचिवांना प्रोत्साहनपर बक्षिसासाठी आर्थिक मदत करणेबाबत पोटनियमांत तरतुद नसल्यामुळे तसेच आर्थिक पत्रकांत याबाबत कोणतेही तरतुद नसल्याने आर्थिक मदत देणेबाबत विचार करता येणार नाही असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १४(१०) - बँकेच्या स्वमालकीच्या शाखा इमारती बांधणेबाबत धोरण व नियम ठरविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ३४(१०) - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या ज्या शाखा नफ्यांत असून त्यांच्या ठेवी रुपये २.०० कोटीच्या वर आहेत अशा किरायाच्या शाखेच्या ठिकाणी बँकेच्या स्वमालकीच्या इमारती बांधण्यांत याव्या अशी दिनांक २५.१०.२००० चे मासिक व्यवस्थापक समितीचे सभेत चर्चा झाली. त्याचप्रमाणे नफा आणि रुपये २.०० कोटीच्या वर ठेवी या निकषानुसार २८ शाखा पात्र आहे. पैकी १४ स्वमालकीच्या असून १४ किरायाचे इमारतीत आहेत. या शाखांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | स्वमालकीच्या इमारतीतील शाखा | अ.क्र. | किरायाचे इमारतीतील शाखा. |
|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय | १ | महल |
| २ | धंतोली | २ | हनुमाननगर |
| ३. | सक्करदरा | ३. | जिल्हा परिषद |
| ४ | हिंगणा | ४ | पांचपावली |
| ५. | कामठी | ५. | रामनगर |
| ६. | रामटेक | ६ | धान्यगंज |
| ७. | पाराशिवनी | ७. | जरिपटका |
| ८ | काटोल | ८ | गणेशपेठ |
| ९ | नरखेड | ९. | कन्हान |
| १०. | सावनेर | १०. | भारडसिंगा |
| ११. | पाटणसावंगी | ११. | जलालखेडा |
| १२. | कळमेश्वर | १२ | सावरगांव |
| १३. | उमरेड | १३. | खापरखेडा |
| १४. | कुही. | १४. | भिवापूर. |

विषयावर चर्चा करतांना मा० श्री. पवार से म्हणाले की, बँकेच्या किरायाचे शाखेच्या ठिकाणी वरीलप्रमाणे निकष विचारांत घेऊन स्वमालकीच्या इमारती बांधायच्या आहेत, त्याकरिता प्रथम स्टँडर्ड प्लॅन तयार करण्यात यावा. मा० श्री ढेंगे संचालक म्हणाले की, वरीलप्रमाणे ठरविण्यांत आलेले नफा व रुपये २.०० कोटीचे वर ठेवी हे निकष योग्य वाटत नाही. म्हणून शाखेची गरज हा मुद्दा विचारांत घेण्यांत यावा. आज इतर सहकारी बँकांचे जाळे विस्तारित वाढत चालले असून तिव्र स्पर्धा निर्माण होत आहे. तेव्हा आपल्या बँकेच्या सुध्दा नविन शाखा उघडणे गरजेचे आहे. मा० श्री कोल्हे, संचालक म्हणाले की, वरील ठरविलेल्या निकषाप्रमाणे स्वमालकीच्या इमारती बांधण्यांत याव्या हे अगदी बरोबर आहे. मा० श्री. हुलके, संचालक म्हणाले की, सिर्सी शाखेची इमारत स्वमालकीची बांधण्यात यावी. यावर मा० अध्यक्ष म्हणाले की, ज्या शाखेची स्वमालकीची इमारत बांधायची

आहे. तेथे किती रक्कम गुंतवावी व तेथे किती अस्तन मिळणार याबाबत सुध्दा तपासून पाहणे आवश्यक आहे. त्याहष्टीने शाखेच्या इमारती बांधणेबाबत मा० संचालकाकडून सुचना मागविण्यात याव्या.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या किरायाचे शाखांचे ठिकाणी स्वमालकीच्या इमारती बांधणेबाबत धोरण व नियम ठरविणे करिता मा० संचालकाकडून सुचना मागविण्यात याव्या व मा० संचालकांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह हा विषय पुढील सभेत ठेवण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक १२(११) - महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून सन 2000-०१ वर्षाकरिता मंजूर झालेल्या अल्पमुदती फेरकर्ज मर्यादा रूपये ४००.०० लक्षाच्या पत्रांतील अटी मान्य असल्याबाबत तसेच राज्य बँकेकडून उचल करण्याकरिता अधिकार प्रदान करण्याबाबत दिनांक १३.११.२००० रोजी केलेल्या सर्क्युलेटींग ठरावास मान्यता देणेबाबत.

ठराव क्रमांक १२(११) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून सन २०००-०१ या वर्षाकरिता त्यांचे पत्र क्रमांक सीएफए/ओपीआर/एफ-23-११४/एसटी/एसएओ/2000-2001 दिनांक २७/२३-९-२००० नुसार बँकेला रूपये ४००.०० लाखाची फेरकर्ज मर्यादा मंजूर झालेली आहे. या पत्रातील अटी मान्य असल्याबाबत तसेच यावर उचल करणे करिता अधिकार प्रदान करण्यांबाबत खालीलप्रमाणे सर्क्युलेटींग ठराव करून राज्य बँकेस पाठविण्यांत आला आहे. विषयावर सविस्तर चर्चा होउन खालील प्रमाणे करण्यांत आलेला सर्क्युलेटींग ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.

- RESOLUTION -

"Resolved that the terms and condition laid by the Maharashtra State Cooperative Bank Ltd. (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.) Mumbai vide letter No. CFA/OPR/F-23/114/ST-SAO/2000-2001, Dated 23.9.2000 for the additional credit limit of Rs.400.00 lakhs (Rs. Four hundred lakhs only) sanctioned to this bank making a total limit of Rs.2000.00 lakhs for financing seasonal Agricultural operations under pooled Rate scheme for the year 2000-2001 be and are hereby accepted. The

Bank will ensure S.T. (S.A.O.) recovery above 40% by the end of June 2001.

Further, resolved that anyone of the following office bearers from Group 'A' alongwith anyone from officers from Group 'B' are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of Loan from the limit of Rs 2000.00 lakhs only sanctioned for short term seasonal Agricultural Credit limit for the year 2000-2001.

Further, resolved that anyone of the office bearers from Group 'A' alongwith anyone from the following office from Group 'B' are hereby authorised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank Ltd; Nagpur creating first charge on the pronotes of the Agricultural Credit societies as custodian of the said pronotes on behalf of the Maharashtra State Cooperative Bank Ltd., (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.,) Mumbai and to endorse the said pronotes on behalf of this bank in favour of the Maharashtra State Cooperative Bank Ltd., (Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.,) Mumbai as Collateral security and to sign the monthly certificates of loan on behalf of this Bank.

1) Chairman } Group 'A'
2) Vice chairman } Group 'A'
3) General Manager Group 'B'

passed unanimously

वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या रिवर्चुलेटिंग ठरावास मान्यता देऊन ठरावाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यात आली.

---

विषय क्रमांक १२(१२) – बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०च्या कलम १५६ अंतर्गत पुढील आदेशापर्यंत वसुलीचे अधिकार मिळणेकरिता मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक ११(१२) - विषयाचे अनुषंगाने सभेला माहिती देतांना सांगितले की, थकित कर्जाची वसुली करणे करिता बँकेचे अधिकारी व विशेष वसुली अधिकारी यांना वसुली कार्यवाही करण्याकरिता मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक ३१मार्च 2000 प्रमाणे कार्य कालमर्यादा न घालता अधिकार मिळणे बाबत मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन थकित कर्जाची वसुली करणेकरिता मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे दिनांक २१.३.२०००-चे पत्राप्रमाणे देण्यात येणाऱ्या अधिकाराबाबत कालमर्यादा न घालता खालील अधिकाऱ्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०-चे कलम २(एच)व (जे) तसेच नियम १०७ खालील उपनियम (३), (५), (६), (७), (९), (१०), (११), (अपसेट प्राईस कायम करण्याची तरतुद वगळून) (१२), (१३), (१४), (१७), (१८) व (२०) तसेच कलम १०१ व कलम (१३०) अनुसार अधिकार प्रदान होणेस्तव मा० विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे विनंती करावी लागेल.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | हुद्दा | मुख्यालय | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. पी. एन. धोटे | एसआरओ. | सावनेर | नागपूर जिल्हा |
| २. | श्री. डी. जी. चिपाटे | निरिक्षक | सावनेर | --"-- |
| ३. | श्री. एस. ई. तेलंग | निरिक्षक | मौदा | --"-- |
| ४. | श्री. एस. एम. श्रोते | निरिक्षक | बेला | --"-- |

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १२(१३) - हातमाग विणकर सहकारी संस्थांचे सन २०००-२००१ करिता कर्ज नुतनीकरणा बाबत.

ठराव क्रमांक १२(१३) — मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, सन १९९९-२००० करिता कर्ज नुतनीकरण मंजूर असलेल्या ३५८ हातमाग विणकर संस्थांपैकी २८० संस्थांनी २०००-२००१ करिता कर्ज नुतनीकरणासाठी मागणी अर्ज सादर केले आहेत. उर्वरित ७८ संस्थांनी अद्यापही कर्ज नुतनीकरण मागणी अर्ज बँकेकडे सादर केलेले नाहीत. अर्ज सादर करणाऱ्या २८० संस्थांपैकी १९५ संस्थांनी कर्ज नुतनीकरणाच्या निकषाची पूर्तता केली असल्याने सन २०००-०१ करिता कर्ज नुतनीकरण मंजूर करण्यात आले आहे. उर्वरित ८५ संस्थांनी कर्ज नुतनीकरणाचे निकषाची पूर्तता केली नसल्याने बँक स्तरावर कर्ज प्रकरणे प्रलंबीत आहेत. यावर मा० कर्ज उप समिती सभा दि. २७.१०.२०००

ठराव क्रमांक १४(१६) अन्वये ज्या संस्थांनी दिनांक ३१.३.२००० पर्यंतचे व्याजाच्या भरणा केला आहे. परंतु नक्त विनियोगक्षम भांडवल/कर्ज खात्यावरील उचल भरणा या निकषाची पूर्तता केली नाही, अशा संस्थांना खास बाब म्हणून पुनर्निकरण मंजूर करण्याचे तसेच ज्या संस्थांच्या बचत ठेव खात्यात व्याजाच्या भरणा करण्या इतपत निधान विकास सहाय्याची रक्कम जमा आहे मात्र ही जमा रक्कम उचल करण्याची शासनाकडून अद्याप परवानगी मिळालेली नाही. अशा संस्थांना रक्कम उचलीची परवानगी देण्याबाबत मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांचे आदेश घेवुन पुनर्निकरण मंजूर करण्याचे व खास बाब म्हणून दिलेल्या सवलतीचा लाभ संस्थांना सन २०००-२००१ करीताच मिळेल असा निर्णय घेतला आहे व माहितीकरिता हा विषय मा० संचालक मंडळापुढे ठेवावा असेही ठरले. त्यानुसार हा विषय सभेचे माहिती करिता ठेवला आहे.

यावर सभेने माहिती घेवुन मा० कर्ज उपसमितीने घेतलेल्या निर्णयाला मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक १२(१८) – तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या शाखांमध्ये फॅक्स मशीन बसविणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १२(१८) :– मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य विज मंडळाचे विज बील कलेक्शनची रक्कम मुंबई येथील खात्याला आठवड्यातून तिनदा त्वरित तबदील करायची असल्याने बँकेचे शाखाद्वारे विज बील कलेक्शन रकमेचे ॲडव्हाईसेस घेवुन शाखेतील चपराशी कर्मचाऱ्यांना मुख्य कार्यालयास आठवड्यातून एकदा ठरवून दिलेल्या तारखांना पाठविल्या जाते. यामुळे बँकेचे कर्मचाऱ्यांवरील प्रवास भत्ता खर्च वाढलेला दिसत आहे. हा खर्च कमी करणेकरिता व बँकेची बचत व्हावी यासाठी विज बील कलेक्शनचे ॲडव्हाईस ठरवून दिलेल्या तारखांना मुख्य कार्यालयास न पाठविता शाखा ज्या तालुक्यात आहे, त्या तालुक्याचे शाखेत पाठविण्यात यावे व गोळा झालेले ॲडव्हाईसेस फॅक्सद्वारे मुख्य कार्यालयास कळविण्यात यावे. यामुळे कर्मचाऱ्यांवरील वाढत असलेला प्रवास भत्ता खर्च कमी होईल व मुख्य कार्यालयास माहिती त्वरित मिळेल.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन विज बील कलेक्शनचे ॲडव्हाईसेस फॅक्सद्वारे मुख्यकार्यालयास त्वरित कळविणेकरिता तालुक्याच्या शाखांमध्ये फॅक्स मशिन लावण्यात याव्या याकरिता १३ तालुक्या

साठी १३ व मराठी शाखांकरिता २ असा एकूण १५ फॅक्स मशिन नाबार्डचे सीडीएफ अंतर्गत खरेदी करण्यांत याव्या, असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक १२(७५) – हारवेस्टर करिता कर्ज मंजूरीचे अनुषंगाने आलेल्या विषयावर चर्चा करणे.

ठराव क्रमांक १२(७५) – मा० अध्यक्ष यांचे परवानगीने मा० गुजर साहेब, संचालक यांनी विषय मांडला की, आधुनिक पध्दतीने शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा वाढत चाललेला कल आणि आधुनिक पध्दतीमध्ये यंत्राद्वारे शेती करतांना वेळेची, पैशाची व मनुष्यबळाची होणारी बचत ह्या बाबी विचारांत घेता सर्व प्रकारच्या कृषि पिकांचे कापणीपासून तर मळणीपर्यंत संपूर्ण कामे करणाऱ्या व नव्यानेच बाजारांत आलेल्या किमान ८ ते ९ लाख किंमत असलेले "हारवेस्टर" यंत्राकरिता कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत सभेत चर्चा करण्यांत आली.

मा० अध्यक्ष महोदय यांनी या विषयावर चर्चा करतांना शेतकऱ्यांच्या अत्यंत उपयोगाचे बाजारांत उपलब्ध असलेल्या हारवेस्टर यंत्राकरिता कर्ज मंजूरी देण्याचे मान्य केले. हारवेस्टर हे कृषि यांत्रिकीकरण अंतर्गत येत असल्यामुळे खालील प्रमुख अटी व्यतिरिक्त इतर सर्व अटी ट्रॅक्टर कर्जाप्रमाणे असाव्या असे ठरले.

१. कर्जदाराकडे स्वतःची अथवा कमी पडत असल्यास कुटुंबातील मिळून १५ एकर ओलिताखालील शेती तारणांत द्यावी लागेल.

२. हारवेस्टर मशिन कुठल्याही प्रांतातून अथवा इतर जिल्ह्यातून खरेदी करावयाची असली तरी त्याचे पंजीकरण हे नागपूर परिवहन कार्यालयातून च करावे लागेल.

३. हारवेस्टर पुरविणाऱ्या कंपनीला बँक गॅरंटी लेटरवर प्रथम मालाचा पुरवठा करावा लागेल. यथासदास आर.टी.ओ. कार्यवाही पूर्ण करुन मालाचा पुरवठा झाल्याची खात्री झाल्यानंतरच बिलानुसार डिमांड ड्राफ्टद्वारे पेमेंट करावे लागेल.

४. हारवेस्टरचा उपयोग हा संबंधित शेतकऱ्यास नागपूर जिल्ह्याचे कार्यक्षेत्रात करावा लागेल. इतर कामानिमित्त ते इतर जिल्ह्यांत किंवा प्रांतात बँकेच्या परवानगीशिवाय नेता येणार नाही.

५. सदर कर्जनिर्गति पोटी जमीनीवरील बोझा व्यतिरिक्त अर्जदारास त्याची इतरही स्थावी व जंगम मालमत्ता बँकेचे गहाणांत द्यावी लागेल.

६. हारवेस्टर करिता हारवेस्टरच्या निव्वळ किंमतीच्या ८०% पर्यंत किंवा

जास्तीत जास्त रुपये ७५० लाख पर्यंत कर्ज उपलब्ध करुन देता येईल. ४०% प्रमाणे स्वगुंतवणूक किंवा कर्ज व कोटेशनमधील फरकाची रक्कम सभासदास प्रथमतः बँकेत भरावी लागेल.

७. हारवेस्टर ह्या यंत्राचा उपयोग संपूर्णता शेतमालाचे हारवेस्टींग मळणी करण्याकरिता करावयाचा असल्याने स्वतःचे काम झाल्यानंतर इतर शेतकऱ्यांच्या शेतातील मालाचे हारवेस्टींग करणेकरिता भाड्याने देऊन भाड्यापोटी मिळालेली संपूर्ण रक्कम अर्जदारास कर्जापोटी जमा करावी लागेल.

हारवेस्टर कर्ज संबंधीच्या वरील प्रमाणे अटी व इतर अटी व शर्ती ह्या कृषि अभियांत्रिकी ट्रॅक्टर कर्ज प्रमाणेच राहतील. जे सभासद व संस्था सर्व अटींची पूर्तता करतील त्यांना धोरणानुसार हारवेस्टर करिता कर्ज वाटप करण्यास मंजूरी देण्याबाबत संचालक मंडळाने निर्णय घेऊन ठरावास मंजूरी दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४२(१६) – बॅरि. शेषराव वानखेडे शेतकरी सहकारी सूत गिरणीचे प्रकल्प उभारणी करिता आलेल्या रुपये २१७१.०० लाख मुदती कर्ज मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ४२(१६) – मा॰ अध्यक्ष यांनी सभेला माहिती देताना सांगितले की, सूतगिरणीने दिलेल्या माहितीनुसार सूतगिरणीचा २५२०० चाती क्षमतेचा मूळ प्रकल्प रुपये ६०६७.०० लाखाचा असून हा प्रकल्प महाराष्ट्र स्टेट कोऑप. स्पिनींग मील फेडरेशनने तयार केलेला आहे. तथापी प्रकल्प राबविण्यास विलंब झाल्यामुळे व त्या अनुषंगाने नाबार्डने सुचविल्यानुसार सदर सूतगिरणीच्या प्रकल्पाचे अप्रायजल डी.के.टी.ई. ह्या ख्यातनाम संस्थेच्या टेक्सटाईल्स व इंजिनियरींग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी यांचेकडून करुन घेण्यात आले आहे व त्यानुसार सूतगिरणीच्या सुधारीत प्रकल्प रुपये ६३४२.०० लाखाचा झाला असून त्यापोटी १:१ डेट इक्विटी रेशोनुसार रुपये २१७१.०० लाखाचा कर्ज मागणी प्रस्ताव गिरणीने आपल्या बँकेकडे सादर केला आहे.

प्रकल्प अहवालानुसार एकूण प्रकल्प खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (लाखांत) |
|---|---|---|
| १. | जमीन व जमीन विकास | रु. ४२.५० |
| २. | इमारत व बांधकाम | रु. ७५६.३६ |
| ३. | प्लान्ट व मशिनरी | रु. २२२०.२० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मशिनरी स्टोअर व स्पेअर्स | रु. | ४५.२० |
| ५. | इतर स्थायी संपत्ती | रु. | ४६६.५० |
| ६. | सुरुवातीचा खर्च | रु. | ३५.०० |
| ७. | कॉन्टीजन्सीज | रु. | २६७.१७ |
| ८. | खेळते भांडवलाकरिता मार्जीन मनी | रु. | ३९७.६० |
| | | एकूण रु. | ८३८१.८३ |
| | | समजा | ८३८२.०० |

सुत गिरणीने प्रकल्पाने सदर खर्चाकरिता भांडवलाची तरतुद खालीलप्रमाणे विचारात घेतलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सभासद भाग भांडवल | रुपये २१७.०७ लाख |
| २. | शासकीय भाग भांडवल | रुपये १५४३.९० लाख |
| ३. | बँकेकडून मुदती कर्ज | रुपये २५७१.०० लाख |
| | एकूण | रुपये ८३८२.०० लाख |

वरील तरतुदीचे अनुषंगाने संस्थेनी केलेली पुर्तता व होणे असलेल्या पुर्ततेची संस्थेने दिलेली माहिती पुढील प्रमाणे :-

| अ.क्र. | तपशिल | केलेली पुर्तता (रक्कम लाखात) | होणे असलेली (रक्कम लाखांत) |
|---|---|---|---|
| १. | सभासद भाग भांडवल | रु. १०२.३५ | रु. ११४.७२ |
| २. | शासकीय भाग भांडवल | रु. ४००.०० | रु. ११४३.९० |
| ३. | कर्ज उभारणी | -- | रु. २५७१.०० |
| | | रु. ५०२.३५ | रु. ३८२९.६२ |

गिरणीला प्राप्त झालेल्या सभासद व शासनाचे भाग भांडवलातून व इतर उसनवारीतून खालीलप्रमाणे प्रकल्प उभारणीसाठी खर्च केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जमिन व जमीन विकास | रु. ३.५० लाख |
| २. | इमारत बांधकाम | रु. ३८६.८० लाख |
| ३. | मशिनरी खरेदी ॲडव्हान्स | रु. १६१.३८ लाख |
| | | रुपये ५५१.६७ लाख |

उर्वरित कामे पूर्ण करण्याकरिता संस्थेला भांडवलाची आवश्यकता असल्याने बँकेकडे कर्ज मंजूरी साठी अर्ज केलेला आहे. संस्थेने बँकेकडे सादर केलेल्या प्रकल्प अहवालाची छाननी (अप्रायजल) बँकेच्या पॅनेलवरील चार्टर्ड अकाऊंटंट श्री. पी. एस. ठाकरे यांनी केलेली असून प्रकल्प आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या सक्षम असल्याचे करून प्रकल्पात दाखविलेला डेट इक्वीटी रेशो १:१ विचारात घेऊन ~~सुतगिरणी~~ सुतगिरणीला रुपये २५७१.०० लाख मुदती कर्ज मंजूर करण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे. बँकेची दिनांक ३१.२.२०००ची

एक्सपोजर लिमिट रुपये ४६७८.७२ लाख आहे.

याबर सभेत विचार विनिमय होऊन सुतगिरणीला गिरणी उभारणीकरिता रुपये २१८७.०० लाख मुदती कर्ज रुपये सवलतीच्या कार्य विचारांत घेऊन ७ समान वार्षिक हप्ते परतफेडीचे कालावधीने द.सा.द.शे.१५% व्याजदराने खालील अटीवर मंजूर करण्यांत आले.

अट —

१. मंजूर कर्जास तारण म्हणून सुतगिरणीच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर प्रथम श्रेणीचे गहाणखत (कर्ज उचल करण्यापूर्वी सुतगिरणीला स्वखर्चाने करून द्यावे लागेल.

२. मंजूर कर्ज व त्यावरील व्याजाचे परतफेडीसाठी सुतगिरणीच्या संचालकांनी वैयक्तिक व सामुहिक जबाबदारी स्विकारली पाहिजे. तदवतच या अनुषंगाने आवश्यक करार पत्रे कर्ज उचलीपूर्वी बँकेत सादर करावे लागेल.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

व्यवस्थापक — अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लिमि., नागपूर.

अविश्वास ठराव बाबतची विशेष सभा

स्थळ-ना.जि.म.स.बँक सभागृह दि.२२-१-२००९ वेळ ठिक दुपारी ३-०० वाजता.

मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
नागपूर विभाग नागपूर यांनी त्यांचे कार्यालयीन जा.क्र.
विसनि/विनियम/जिमसबँक/७३(१)डी/३५८/२००९
दि. ११ जाने २००९ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधि-
नियम १९६० चे कलम ७३ (१) डी तथा महाराष्ट्र
सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ५७ अ
अंतर्गत बँकेच्या विद्यमान उपाध्यक्षा सौ. आशाताई
चैतूजी महाजन रा. जागनाथ बुधवारी, नागपूर यांचे
विरुध्द अविश्वासाचा ठराव मांडण्यासाठी संचालक
मंडळाची विशेष सभा आज दि. २२ जानेवारी २००९
रोजी दुपारी ठिक ३-०० वाजता नागपूर जिल्हा मध्यवर्ती
सहकारी बँक मर्या. नागपूर या बँकेच्या सभागृहात
माझे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली.
ठिक तिन वाजता सभेस सुरुवात करण्यात आली
बँकेचे व्यवस्थापक श्री. के. एन. चौधरी हे
स्वतः सभेला हजर राहुन संचालक मंडळाच्या
सभेच्या इतिवृत्ताची नोंदवही समक्ष मला सुपूर्त
केली. नियमाप्रमाणे सभा सुरु झाल्या बाबत
घोषणा करण्यात आली. सभेला श्री. व्ही. एच.
कारगीरवार विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य
सहकारी बँक, मर्या. मुंबई विभागीय कार्यालय
नागपूर हे हजर होते. सभा सुरु झाल्याची
दुपारी ठिक तिन वाजता घोषणा केल्या नंतर
तिन वाजता अविश्वासाचा ठराव प्रस्ताव ज्या
संचालकांनी मा. विभागीय सह निबंधक, सह.
संस्था, नागपूर यांचेकडे दाखल केला ते व
बँकेचे इतर संचालकां पैकी अन्य कोणीही सभा-
गृहात उपस्थित राहिले नाहीत. दुपारी तिन ते
तिन वाजुन तिस मिनीटापर्यंत सभेसाठी सभा-
गृहात कोणीही संचालक हजर राहिले नाहीत. त्यामुळे
महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ५७-अ (७)(ब)(२) मधील

तरतूदी प्रमाणे सदर अविश्वास ठराव मांडला गेला नाही व त्यावर सविस्तर चर्चा होवू शकली नाही म्हणून नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान उपाध्यक्षा श्रीमती आशाताई चैंदुजी महाजन रा. जगनाथ बुधवारी नागपूर यांच्या विरुद्ध प्रस्तावीत करण्यात आलेला अविश्वासाचा ठराव नामंजूर झाल्याचे मी याद्वारे घोषीत करुन त्याबाबतचीही नोंद बँकेच्या — संचालक मंडळाच्या सभेच्या इतिवृत नोंदवहीत घेत आहे.

सभेपुढील विषय

विषय क्र.१ :- श्रीमती आशाताई चैंदूजी महाजन उपाध्यक्षा, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. नागपूर यांचे विरुद्ध (सादर) दाखल करण्यात आलेल्या अविश्वास ठरावावर निर्णय घेणे.

सभेला संचालक मंडळ सदस्या पैकी कोणीही हजर न राहिल्याने व ठरावावर नियमा प्रमाणे सविस्तर चर्चा न होवू शकल्यामुळे नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान उपाध्यक्षा श्रीमती आशाताई चैंदुजी महाजन यांच्या विरुद्ध प्रस्तावीत करण्यात आलेला अविश्वासाचा ठराव नामंजूर झाल्याचे सभागृहात घोषीत करण्यात आले.

सभेतील उपस्थितांची नावे. सही -

१ श्री. व्ही. एल. कारगीरवार, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सह. बँक म. मुंबई. विभागीय कार्यालय, नागपूर — V.L.Kargirwar 22/1/2001

२. श्री. बी. एन. चौधरी व्यवस्थापक, नागपूर जिल्हा मध्य. सह. बँक, नागपूर. — [signature] 22/1/2001

वरील प्रमाणे श्रीमती:

नमुना ~~क्रमांक~~ म – 19

[नियम 57 अ [7] पहा]

## नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, नागपूरचे व्यवस्थापक समितीच्या विशेष सभा बोलाविण्यासंबंधीच्या व अविश्वासाच्या मागणीच्या निवेदनाबद्दल प्रमाणपत्र

मी, श्री.एस.बी.पाटील, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, नागपूरच्या व्यवस्थापन समितीच्या विशेष सभेच्या मागणीसाठीचे सभा या दिवशी दिनांक 22/1/2001 भरली. याबाबतचे प्रमाणपत्र देत आहे.

पुढील ठराव या सभेमध्ये चर्चिले गेले :–

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान उपाध्यक्षा सौ. आशाताई चंदुजी महाजन यांचे विरुद्ध प्रस्तावीत अविश्वास ठरावावर निर्णय देण्यासाठी बँकेच्या संचालक मंडळातील एकही संचालक या विशेष सभेला हजर न राहील्यामुळे, सदरचा अविश्वासाचा ठराव "नामंजूर" झाल्याचे घोषित करण्यात आले. [नियम- 57- अ (८) (जी) (७)]

"अविश्वासाचा ठराव नामंजूर"

हे प्रमाणपत्र मी या दिनांक 22/1/2001 दिवशी ना.जि.म.सह.बँकेचे सभागृह नागपूर या ठिकाणी दिले.

[एस.बी.पाटील]
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नागपूर
तथा अध्यक्षीय अधिकारी.

आशाताई चेंडुजी महाजन, उपाध्यक्षा, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक म. नागपूर यांचे विरुध्द दाखल झालेल्या अविश्वास ठरावावर निर्णय घेण्यासाठी बोलाविलेल्या नागपूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, मर्या. नागपूरच्या संचालक मंडळाच्या विशेष सभेचे कामकाज पारपाडण्यात आले व श्रीमती आशाताई चेंडुजी महाजन उपाध्यक्षा नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. नागपूर यांचे विरुध्द अविश्वास ठरावावरील प्रस्ताव बाबत निर्णय घेवून सभेचे कामकाज संपल्याचे घोषित करण्यात आले.

२२/१/२००१

स्थळ :- नागपूर जिल्हा मध्य. बँकेचे सभागृह नागपूर

दि. २२ जानेवारी २००१

वेळ. दुपारी ३-०० वाजता.

(एस. बी. पाटील)
सभाध्यक्ष तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर